सालअखेर ॥ ॥ १८
किरकोळ अंकास ........................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .......०।

Single copy..............................1as

Advertisement
Below 10 lines...2 R
per line over10... 4 as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XXVII AKOLA MONDAY 4 SEPTEMBER 1893 NO35

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख ४ माहे सप्टेंबरसन १८९३ इ० अंक ३५

नोटीस.

नोटीस बेशमी मोतीराम तुळाराम या नांवाची दुकान मालक बिसनदयाल अज्ञान पालन करणार ताराबाई नवजे मोतीराम दुकान उमरावती.

खालीं सही करणार यानकडून कळविण्यांत येतें कीं, उमरावती येथील भाजी-बाजारांतील दुकाना आमचे मालकीच्या तुह्मीं विकत घेतल्या त्याचें खरीदखत करून घेण्याचे संबंधानें आपणास नोटीस दिली होती त्याचा जबाब तारीख २०।८।९३ रोजीं मिळाला.

(१) दुकाना विकत दिल्या त्यावेळेस हल्लीं आपण ज्या हरकती नोटिशींत लिहिल्या आहेत त्याचा निकाल आपणास करून दिला होता व त्या संबंधीच्या जबाबाच्या आपण कबूल करून घेतल्या.

(२) ह्या सर्व गोष्टींचा निकाल झाल्यावर आपण सवदा पक्का करून इसाराचे रुपये दिले. व पावती घेतली.

(३) खरेदीखत करून घेतांना आमचे आपसातील कारकतीच्या संबंधानें आपण संशय काढल्या वरून त्या गोष्टीचाही निकाल आह्मी आपणास आमचे आपसातील झालेले लेखदाखवून करून दिला त्यावेळीं आपण सांगितलें कीं ताराबाई येथें नाहींत नागपूरास गेल्या आहेत त्या आल्यावर खरेदीखत करून घेऊं.

(४) हल्लीं आपण खरेदीखत करून घेण्यास ज्या हरकती लिहिल्या त्या बरोबर नाहींत. नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत खरेदीखत करून घेऊन रुपये १७१० व त्याचें व्याज दरमहा दरशेंकडा २ रुपये प्रमाणें खरेदिखताचे तारखेपासूनचे द्यावें. तसें न केल्यास दुकाना दुसऱ्यास विकून जी किंमत कमी येईल ती व्याजासुद्धां आपणापासून घेतां येईल.

सही.
रामराव कृष्णराव जहागीर-
दार बाभूळगांव तर्फे मुखत्यार वामन खंडेराव
दस्तूर खुद्द.

---

नोटीस.

राजश्री गौरी शंकर चंदीप्रसाद राहणार हिवरखेड तालुके आकोट यासी खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे कडून आह्मास आजमितीपर्यंत एकंदर रुपये १४८२।= शिवाय व्याज येणें आहेत तें बहुत वेळां तुह्मास मागितलें परंतु दिलें नाहीं कारितां हल्लीं ही नोटीस दिली आहे- ती पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आमचे सर्व रुपये आमचे आकोट येथील दुकानांत जमा करावें तसें न केल्यास कोर्टमार्फत वसूल करू. कळावे ता० २६-८-९३

सही.
लालारामसहाय जगन्नाथ का-
मटीवाले यांचे सांगण्या
वरून व्यंकटराव देसाई
वकील.

---

## शिक्षण पद्धति

(एका अनुभवी शिक्षकाचा धडा)
(मागील अंकावरून पुढें चालूं.)

गु०— पण हें ठोकळ प्रमाण झालें. आगगाडीचें प्रत्येक स्टेशन दुसऱ्या स्टेशना पासून जितकें दुर असेल, त्या प्रमाणानें भाड्याचे दर ठरविले आहेत. तिसऱ्या क्लासच्या गाडीला दर मैलास २॥ पै दर आहे येथुन मुंबई पर्यंत ९ रु. पडतात या वरून मुंबई ३८० मैल असली पाहिजे असें होते.

वि०— समुद्रकांठच्या गांवांत पाण्याचा सुकाळ असेल तेथल्या लोकांस विहिरींची कांहीं जरूरी नाहीं!

गु०—(हसून)—समुद्राचें पाणी खारें असतें तें पिण्याच्या उपयोगीं पडत नाहीं म्हणुन समुद्र कांठच्या गांवीं विहीरींचेंही पाणी खारें असतें. कारण त्या विहिरींत कांहीं खाऱ्या पाण्याचे झरे मिळालेले असतात, परंतु बागबगीच्या करितां लोक विहिरी खणतात. गोड्या पाण्याच्या विहीरी डोंगराच्या पायथ्याशीं म्हणजे समुद्रा पासून दूर असतात.

वि—समुद्रांतून आगबोटीनें प्रवास करणाऱ्या लोकांचें गोड्या पाण्याचें काम कसें होतें.

गु०—पूर्वी गलबतावर गोड्या पाण्यानें टांकीं भरून घेण्याची चाल होती, व अद्याप ही ल्हान सहान गलबतांवर गोड्या पाण्याचें सांठवण असतें. परंतु आगबोटीवर या तजविजीचें कारण पडत नाहीं. कां तें तुला सांगतो. पाण्याची उष्णतेनें वाफ होते, आणि वाफेला थंड हवेचा योग झाला असतां तिचे पुन्हां पाणी होतें हें तुला माहीत आहे ना?

वि०— होय भाजी शिजत असतां, वर झांकण न ठेविलें, तर वाफ निघुन जाऊन आंतील पाणी लवकर आटून जातें. परंतु वर थंड पाण्यानें भरलेलें भांडें झांकण ठेविलें, तर वरच्या भांड्याच्या बुडाला वाफ लागून आंतल्या थंड पाण्याच्या योगानें त्या वाफेचें पाणी होऊन, तें पुन्हां भाजींत मिसळतें, आणि आंतलें पाणी लवकर आटत नाहीं.

गु०— घाणेरडे पाणी किंवा गढूळ पाणी किंवा खारें पाणी तापविलें, तर त्याची वाफ होतें. परंतु त्या वाफेचें पुन्हां पाणी केलें असतां तें पहिल्या सारखें गढूळ, खारें किंवा घाणेरडें होत नाहीं. तें निर्मळ गोडें होतें, असें आढळल्या वरून समुद्रांतल्या खाऱ्या पाण्याची वाफ करून तिच्या पासून गोडें पाणी करण्याचीं यंत्रें तयार केलीं आहेत. म्हणून आतां समुद्रांत गोडे पाण्याचें सांठवण नसतांही पुष्कळ दिवस पर्यंत प्रवास करितां येतो. असो मुला, समुद्र प्रत्यक्ष नदाखवितां त्याची जितकी माहिती तुला देतां आली, तितकी दिली आहे. तूं मोठा झाल्यावर समुद्र पाहून तुला त्याचें यथार्थ ज्ञान होईल.

वि०— पण, गुरुजी, समुद्राच्या संबंधाच्या आणिक एक दोन गोष्टी मला विचारावयाच्या आहेत, त्या परवानगी होईल तर विचारितों.

गु०— खुशाल विचार. मला जें माहित आहे तें मी तुला मोठ्या आनंदानें सांगेन.

वि०— एका भांड्यांत पाणी भरून ठेविलें. आणि दर आठवड्यास त्यांतलें जितकें पाणी कमी होईल तितकें त्यांत नवें पाणी टाकीत गेलें तरी कांहीं दिवसांनीं तें पाणी नासून जाईल किंवा नाहीं?

गु०— नासून जाईल, यांत संशय नाहीं.

वि०— तर मग समुद्राचें पाणी नासून समुद्र कांठची हवा वाईट होत असेल!

गु०— लोणच्यांत मीठ कमी झालें, किंवा मुळींच घातलें नाहीं, तर तें नासतें. परंतु मीठ बेताचें किंवा अधिक घातलें तर तें नासत नाहीं, हें तुला ठाऊक आहेच.

आतां समुद्राचें पाणी खारें लागण्याचें कारण, त्यांत मीठ आहे, हें होय. मिठाच्या योगानें समुद्राचें पाणी वर्षानुवर्ष जशाचें तसेंच राहतें. ईश्वरेच्छेनें समुद्राचें पाणी खारें आहे, ह्मणून बरें आहे. नाहीं तर, तें पाणी नासुन हवा बिघडली असती, आणि पृथ्वीवर राहणें कठीण पडतें. नाना प्रकारचे रोग होऊन सर्व प्राणी एकदम मरून जाते. परंतु ईश्वर दयाळू आहे. त्यानें असा परिणाम होऊं नये ह्मणुन आधींच तजवीज केली आहे. समुद्राचें पाणी न बिघडण्याचें दुसरें एक कारण आहे, तें असें की, वाऱ्याचा प्रवाह समुद्राच्या पृष्टभागावरून वाहत असतां पाण्याच्या लाटा उसळतात, त्यास कोणी लहरीही ह्मणतात तळ्यांतलें पाणी किंवा नदीच्या डोहांतलें पाणी देखील वाऱ्याच्या योगानें एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे धांवतांना दिसतें. परंतु नदींत किंवा तळ्यांत थोडें पाणी असल्यामुळें, त्याच्या लहरी ल्हान असतात. समुद्राच्या लाटा वारा तुफान असतां कधीं कधीं घरा इतक्या उंच उसळतात.

वि०— मग त्यांतून आगबोटी कशा जातात?

गु०— वारा तुफान असतां गलबतांत बसून प्रवास करणें मोठें धोक्याचें आहे. शेंकडों गलबतें तुफानांत सांपडून त्यांचा चूर होऊन, हजारों माणसें मृत्युमुखीं पडतात.

वि०—.गलबतांत बसून जाण्यांत मौज आहे असें मला वाटत होतें, तें व्यर्थच तरमग.

गु०— नेहमीं वारा तुफान नसतो. व असे अपघात नेहमीं होत नाहींत. असें होतें, तर एका देशाचा दुसऱ्या देशाशीं व्यापार वाढताना आणि आपण आज जें सुख भोगीत आहोंत, तें आपणांस मिळतेंना. शिवाय पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें नाविकाविद्या हें एक शास्त्र बनलें आहे. त्याच्या अभ्यासानें, तुफान होण्याच्या पूर्वीं तुफान होणार असें कांहीं चिन्हावरून समजतें. तसेंच तुफानांत सांपडलें असतां, काय केलें ह्मणजे बचाव होण्याचा संभव आहे, हें ही नांवाड्यांस चांगलें समजलें असतें. ह्मणून गलबतांत बसून जाण्यांत जितका धोका आहे ह्मणून आपणांस वाटतें, तितका आतां नाहीं.

वि०— गुरुजी, आपण नकाशा ह्मणजे काय, येथून आरंभ करून आजपर्यंत जी मला माहिती सांगितली, त्यानें मला पुष्कळ गोष्टींचें ज्ञान प्राप्त झालें आहे. हे आपले उपकार मी कधीं विसरणार नाहीं.

---

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ९ शके १८१५

## पिटिशन पेपर

(वऱ्हाड सरकारचा अर्जीचा कागद— किंमत पैसा १)

सन १८९२ सालीं सप्तेंबर महिन्यांत वऱ्हाड प्रांतांतील कोर्टांच्या उपयोगासाठीं एक अर्जीचा निराळा कागद काढण्यांत. आला. या कागदाच्या उपयोगा विषयीं आकोला जिल्ह्यांत कडक व सक्तीचा हुकूम निघाला होता सप्तेंबर पासून गेल्या मार्च अखेर प्रत्येक जिल्ह्या निहाय या अर्जीच्या कागदाची विक्री सन १८९२।९३ च्या रिपोर्टांत दिली आहे त्या वरून आकोला जिल्ह्याचें उत्पन्न या कागदा संबंधानें फारच फार ह्मणजे रुपये ६४१-१२ आणे असून उमरावती सदर जिल्ह्याचें ठिकाण असूनही तेथें फक्त रुपये १९२-७ आणे उत्पन्न आहे. एकंदर उत्पन्न रुपये १६३६-३-३ आहे. कप्तान मारिस यांनीं आपल्या एका हुकुमान हें उत्पन्न वाढाविलें आणि तो हुकूम स्टेटसक्रेटरीच्या आज्ञेबाहेर होता ह्मणा किंवा त्याची अमलबावरी मूळाच्या मर्यादेला सोडून झाली ह्मणा; परिणामीं आकोला जिल्ह्यांत हा अर्जीचा कागद उपयोगांत आणण्यास फार

सक्ती झाली. आकोल्या जिल्ह्याचें उत्पन्न पाहून कर्नल लेन साहेब ह्मणतात कीं उमरावती जिल्ह्यांत या कागदाचा उपयोग आकोल्या इतकाही नाहीं हें स्पष्ट आहे. असें मुद्दाम नमूद करण्याचा हेतू उमरावतीच्या अधिकाऱ्यांचें लक्ष्य वळविण्यासाठीं नसेल तर दुसरा काय असणार आहे! आमचें असें ह्मणणें नाहीं कीं, सरकारी अर्जीच्या कागदाचा उपयोग होऊं नये पण कायती तक्रार एवढीच कीं त्याच कागदांच्या उपयोगा विषयीं जबरी न करितां राजीखुषीचा मामला ठेवावा.

## खुषीचा मामला

या कागदाचा उपयोग करणें ज्याच्या त्याच्या खुषीवर आहे. सरकारी हुकुमा प्रमाणें कोणावर त्या बद्दल जबरी चालणार नाहीं. आणि मुख्य वरिष्ट सरकारच्या हुकुमा पलीकडे एखाद्या जिल्ह्याच्या डेपुटी कमिशनरानें हुकूम केला असेल तर तो गैर कायदा मानून मोडण्यांतही कोणी गुन्हेगार होणार नाहीं. हा नवीन कागद मोहोरेदार, जाड, व टिकाऊ असा आहे. याचा एक ताव अर्ध्या फुल्सक्याप एवढा आहे. तशाच फुल्सक्यापच्या रिमांतील कागदास ४।९ रुपये पडतील तर तेवढ्याच अर्जीच्या कागदास १९ पंधरा रुपये पडतील. हा अर्जीचा कागद लोकांस महाग पडतो ह्मणून कित्येक गृहस्थ तो उपयोगांत आणण्यास नाखूष आहेत. या कागदाच्या उपयोगा विषयीं सरकारी ठराव काय आहे तेवढा आह्मी खालीं पुन्हा एकवार देतो आणि तो दिला ह्मणजे आमच्या लिहिण्याचा हेतू लोकांस कळला असें आह्मी समजतों. या नव्या अर्जीच्या कागदाचा उपयोग कोर्टफीचीं टिकिटें लाविलीं जाणाऱ्या कागदाच्या ठिकाणीं करावा आणि जेथें स्टांप लागत नाहीं अशा फिर्यादी व अर्जी या कागदावर कराव्या. स्टांप म्यानुअलमध्यें अशीहि डेपुटी कमिशनरास सूचना आहे कीं या कागदाचा उपयोग त्यांनीं होईल तितका वाढवावा परंतु याच कागदावर जर कोणी फिर्याद अगर अर्ज न करील तर त्या मनुष्यावर चांगली टिकाऊ कागद वापरण्या विषयीं सक्ती करावी.

## शिक्षकाची छडी

सर एडविन आरनोल्ड हे एक इंग्लंडचे प्रसिद्ध विद्वान् व कवी आहेत. यांचा परिचय इंडियांतील कांहीं विद्यार्थ्यांस पूर्वीं घडलेला आहे. हे कांहीं वर्षांपूर्वीं पुणें येथील डेक्कन कालेजचे प्रिन्सिपाल होते. आक्सफोर्ड कालेजांत अभ्यास संपल्या नंतर आणि इंडियांत येण्यापूर्वीं कांहीं दिवस हे बर्मिंगहाम येथील शाळेंत मास्तर होते. त्या वेळची आत्मचरित्रांतील त्यांनीं एक चमत्कारिक गोष्ट नुकतीच प्रसिद्ध केली. ही गोष्ट शिक्षक मंडळीनीं विशेषें करून लक्ष्यांत घेण्यासारखी आहे. ते मास्तर होते खरे पण त्यांची वागणूक इतर सामान्य शिक्षक वर्गाहून निराळी होती. छात्रसमूह त्यांस फार चहात असे कांकीं ते त्यांच्यामध्यें मिळून मिसळून असत. शिष्य मंडळीची शिकलेल्या धड्यापासून करमणूक करावी असा त्यांचा नेहेमीं उद्योग असे. शिक्षकानें छडी उपयोगांत आणिली ह्मणजे त्यास आवडत नसे आणि त्यांस छडी हातांत घेण्याचो पाळीहि आली नसती कोणाही मास्तराचा सरंजाम ह्मटला ह्मणजे टेबलावर दऊतटांक असतो तेथें क्याटलाग जनिक वेताची छडीहि असावयाचीच. त्या नियमा प्रमाणें आरनोल्ड साहेबांच्या टेबलावरही एक वेताची छडी होती. कर्मधर्मसंयोगानें असें घडलें कीं एका विद्यार्थ्यानें जवळच्या सोबत्याला चोरून एका कठिण वाक्याचा अर्थ विचारला पण तो सोबती कांहीं सांगेना तेव्हां त्याला प्रश्न विचारणारानें सडकून एक ठोसा मारला. त्या सरशी तो सोबती एका बाजूस पडला आणि त्यानें रागाच्या आवेशांत थोडा दंगा केला. आरनोल्ड साहेब थोडे कंटाळल्या सारखे होते इतक्यांत असा प्रकार झाला तेव्हां होतीच जनिक छडी. ती त्यांनीं सपाटून त्या सोबत्याच्या पाठीवर ओढली. शेक्सपीअर एके ठिकाणीं लिहितात कीं वाईट काम करण्यास साधनें जवळ दिसलीं ह्मणजे वाईट काम झटकन घडून येतें. ही गोष्ट त्याचा मासला होय. मुलगा तोंडानें बोलेकीं वाटेल तर मला मारा पण मी कांहीं गुन्हा केला नाहीं. थोडासा वेळ गेल्या नंतर आरनोल्ड साहेबांस आपली चूक उमगली. लागलींच त्यांनीं आपला वर्ग बोलावला आणि ते त्या मारलेल्या विद्यार्थ्यांस उद्देशून बोलले कीं तूं गुन्हेगार नसून मीच दुहेरी तुझा गुन्हेगार आहे. हे शद्ब ऐकतांच सर्वजण चपापले आणि दुसरे वर्ग व शिक्षक लोक पुढें काय होते हें पाहण्यास सर्वजण स्तब्ध व तटस्थ झाले. क्षणभर सर्वांचे डोळे आरनोल्ड साहेबाकडे लागले. ते ह्मणाले कीं मुला ही छडी घे आणि मी जितक्या जोरानें मारली तितक्याच जोरानें तूं मला मार. विद्यार्थी बोलला कीं छे, छे, मी कांहीं मारणार नाहीं आणि मला तितका जोरानें मारही बसला नाहीं. आरनोल्ड साहेब कांहीं ऐकेनात आणि छडी परत मारण्यासाठीं त्यांनीं आग्रहच घेतला. ते निक्षून म्हणाले कीं तूं हुकूम मानलाच पाहिजे, हुकूम अमान्य केलास तर तुला एक धडा तीनवेळ सुटी होण्या पूर्वीं लिहून द्यावा लागेल. ती वेळ सुटी होण्याची होती म्हणून सर्वांचें लक्ष खेळाकडे वेधलें होतें तेव्हां सुट्टीला विलंब होणें कोणास पसंत नव्हतें आणि शिक्षकाला मारण्याचा डाव साधण्यास हीच वेळ कित्येकांस फार बरी वाटली. या दोन कारणामुळें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें म्हणा त्या विद्यार्थ्यानें आपली छडी लागलेली पाठ चोळण्याचें सोडून छडी हातांत उचलली आणि आरनोल्ड साहेब लिहितात कीं त्यानें माझ्या समजुतीसाठीं उगीच हळू छडी मारली नाहीं तर मोठ्या आवेशानें व जोरानें माझ्या पाठीवर छडी चमचम करीत साडकन बसली त्या बरोबर विंचवाच्या दंशा प्रमाणें वेदना झाल्या तरी पाठ चोळीत चोळीत त्यांनीं त्या विद्यार्थ्याचे आभार मानले आणि ती चांडाळ दुष्ट छडी गुडघ्यावर मोडून खिडकी बाहेर फेंकून देण्यास त्यांनीं त्याच मुलाला सांगितलें.

सर्व हिंदुस्थान देशांत त्या बर्मिंगहाममच्या तोडीचा विद्यार्थी कोणी सांपडेल असें आम्हास वाटत नाहीं मारकट मास्तराची थोरपणी लोक थट्टा करितात पण गुरूच्या ठायीं पूज्यभाव आमच्या विद्यार्थ्यांत मोठा असतो गुरुगृहीं वास करून विद्या संपादण्याचे मार्ग हल्लीं नाहींत आणि त्या मानानें पितृस्थानाची उपमा शिक्षकाला देतां येणार नाहीं तरी सव्याज जोरानें छडी मारण्यास प्रवृत्त कोणी होईल असें अगदींच विरळा! असें आरनोल्ड साहेबा सारखें उदार मन थोड्याचें आणि त्यांच्या त्या कृतीला शहाणपणाची कृति असेंही म्हणणारे थोडेच लोक आढळतील. छडी शिवाय विद्या शिकविणें तर कित्येकांच्या मतानें असाध्यच आहे आणि ह्मणून असले शिक्षक मोठ्या गौरवानें ह्मणत असतात कीं छडी वाजे छमछम विद्या येई घमघम! वरील उदाहरण प्रत्यक्ष त्यांच्या संबंधानें घडलें त्यांनींच आपल्या आठवणींनें तें प्रसिद्ध केलें आहे तेव्हां खऱ्या खोटेपणाचा वाद मिटला. आह्मी आशा करितों कीं वरील दाखल्या वरून निदान कांहीं शिक्षक तरी छडीचा उपयोग होता होईल तितका कमी करतील आणि शिक्षा करितें वेळीं आपली न्याय बुद्धिही जागृत ठेवतील.

## देवीखातें

(१८९२–९३ चा रिपोर्ट)

वऱ्हाडांत देवीखातें सन १८६९ सालीं सुरू झालें त्यास आज पंचवीस वर्षे झालीं. या पाव शतकाच्या काळांत देवीखात्यानें लोकांचा केवढा उपयोग केला आहे हें त्या खात्याच्या लोकप्रियते वरून समजेल देवी काढण्याची युक्ति रूढींत येण्या पूर्वीं पुष्कळ लोक देवीच्या आजारा मुळें मृत्यु मुखीं पडत असत. कित्येक विद्रूप व शितांफळाच्या आकृती प्रमाणें कुरूप असे होत आणि देवीच्या मुळें अंगात आलेली कडकी कित्येकांच्या प्रकृतींत आमरण राहून इतर रोगांचें ठाणें देवी आलेल्या मनुष्याच्या देहांत होत असे. असे अनर्थ स्वाभाविक ज्या देवी येतात त्या पासून शेंकडा ९० हून अधिक उदाहरणांत होत असल्याचें आढळतें. कृत्रिम देवी ह्मणजे देवीखातें गाईच्या लशीनें ज्या देवी काढतें त्या होत. या कृत्रिम देवींनीं स्वाभाविक देवी येण्यापासून होणारे अपकार टळतात आणि कृत्रिम देवी काढल्या ह्मणजे बहुतकरून स्वाभाविक देवी थोड्या येतात आणि त्या आल्या तरी फार कमजोराच्या असतात. देवी काढण्याच्या पद्धती व हत्यारें फार सोयस्कर व सुखावह आहेत. सन १८६९ सालीं देवी काढल्या नंतर त्या चांगल्या फुगून त्यांचा दाणा उत्तम वठूनही देवीची भिती राहिली असें, १०० जणास देवी काढल्या ह्मणजे ६१.२ जणा संबंधानें घडत असें. हें प्रमाण १८८१ मध्यें ८६.७ होतें. आणि गुदस्ता व यंदा ते ९४।९९ आहे. या आकड्या वरून देवी किती कसोशीनें, उत्तम लशीनें, व चांगल्या शस्त्रानें काढतात याची सहज कल्पना होईल. सन १८६९ त ज्या इसमांस देवी काढल्या त्या पैकीं ८१२३ जणांच्या चांगल्या दाणेदार आल्या ह्मणजे लोकसंख्येच्या मानानें एक हजारामागें ३ इसमांचें देवी पासून संरक्षण झालें. १८८१ त ७४३०३ इसमांस काढलेल्या देवी चांगल्या आल्या आणि हजारामागें २८.२ लोकांचा स्वाभाविक देवी येण्या पासून बचाव झाला. मध्यंतरीं १८८३ सालीं जितक्या देवी काढल्या अशा पूर्वीं व अद्याप पर्यंत कधींच काढल्या नाहींत. देवी काढल्या वर ज्यांच्या अंगावर त्या नीटपणें उमटल्या असे लोक १००७६९ होते. असे देवी काढलेले लोक १८९३ त ९६३०६ असून एक हजार लोकवस्ती मागें ३७ जणांचें देवी पासून संरक्षण झालें. देवी काढण्याचा हा विलक्षण फैलाव व विस्तार लक्ष्यांत आणिला ह्मणजे देवी खात्याचा अत्यंत उपयोग व त्याचें महत्व सहजी कळेल.

देवीखात्याच्या उपयोगाच्या मानानें जेवढी या खात्याची लोकप्रियता पाहिजे तेवढी नाहीं हेंही वारंवार कळविलें पाहिजे. मारवाडी व मुसलमान लोकांमध्यें देवी काढण्यास फार विघ्नें येतात. हें लोकांस सहसा आपलीं मुलें देवी डाक्टराकडे आणित नहींत. त्यांना दादा बाबा करून युक्ती प्रयुक्तीनें वळवावें लागतें आणि तेव्हां देखील त्यांच्या मुलांना देवी काढण्यास डाक्टरांना फार प्रयास पडतो. मेळघाट तालुक्याकडे देवी काढण्याचा नुकताच प्रघात पडत चालला आहे. व तिकडील लोक राजीखुषीनें बिनबोभाट आपलीं मुलें देवी काढण्यासाठीं हजर करतात. कां कीं देवी काढण्याचा उपयोग त्यांना पक्का कळून चुकला आहे. आणि त्यांच्यामध्यें धर्माच्या वेड्या समजुती देवी काढण्या विरूद्ध कांहीं नाहींत. रेसिडेंट साहेबांचें ह्मणणें असें कीं मुसलमान लोकांकडून जो व्यत्यय येतो तो त्यांच्या गोषाच्या पद्धतीमुळें येतो मुसलमानलोक फार अडथळा आणितात असें रिपोर्टांतील आकड्यावरून दिसत नाहीं तथापि गोषाच्या चाली पासून अडथळा होतो तो मुसलमान डाक्टर नेमल्या पासून दूर होण्या सारखा आहे परंतु हिंदु जातींतील लोकांची गोष्ट मात्र तशी नाहीं देवी काढण्या संबंधानें हिंदु लोकांच्या धर्म भोळ्या समजुती व्यत्यय कारक आहेत देवी स्वाभाविकपणें येणें ही ईश्वरी गोष्ट आहे तेव्हां तिचा प्रतिकार कृत्रिम देवी काढून करणें मनुष्यास निषिद्ध आहे अशा समजुतीच्या लोकांत देवी काढण्यांचा फैलाव करणें दुर्घट आहे. उत्तरोत्तर लोकांच्या या गैर समजुती शिक्षणानें दूर होतील. आणि देवी काढल्या पासून शरिराला जो मोठा लाभ होतो. तो कळत गेला ह्मणजे ही गोष्ट साधण्या सारखी आहे.

अलीकडे कांहीं वर्षां पासून देवी काढण्याचा प्रयोग दुबार करण्याचा परिपाठ पडत चालला आहे. कित्येकांच्या मते देवी दाहा बारा वर्षांनीं पुन्हा काढून घेतल्या ह्मणजे इतर रोगांची बाधा सहसा होत नाहीं आणि गांवांत देवीची साथ आली असतां कित्येकांस देवी काढल्या नंतरही पुन्हां संभव असतो तो बरेच वर कांहीं कांहीं वर्षांच्या आळी पाळीनें देवी पुन्हां काढल्या पासून दूर होतो. रिपोर्टाच्या वर्षीं दुबार देवी काढलेले इसम ४४१०८ आहेत हीं संख्या बरीच मोठी आहे. आणि तिजवरून पुष्कळ लोकांस दुबार देवी काढल्या पासून मोठा

फायदा होत असावा असें दिसतें. अनेक वेळ देवी काढणें फायदेशीर आहे किंवा नाहीं हें आह्मी कांहीं सांगू शकत नाहीं किंवा एखाद्या चांगल्या विद्वान् डाक्तराचा अभिप्राय प्रसिद्ध करण्या सारखा आह्मा पाशीं नाहीं. सानिटरी कमिशनर डाक्टर स्वेन हे या विषयीं इतकेंच लिहितात कीं देवी काढण्या पासून ताप येतो व थोडे दिवस कामधंदा करितां येत नाहीं ह्मणून कोणी पुन्हां देवी काढून घेण्याच्या खटपटींत पडत नाहीं. आमच्या मतें या कारणा शिवाय देवी दुबार काढण्याच्या उपयोगा विषयीं लोकांस बहुतकरून कांहींच माहिती नाहीं हेंच मुख्य कारण होय.

देवी खात्यांत मुख्य सानिटरी कमिशनर, ७ नेटीव सुपरिंटेंडंट, ४९ देवी डाक्टर, ६ उमेदवार व ७ पट्टेवाले असे पगारदार लोक असून सालिना १७। हजार रुपयांचा खर्च आहे. या खर्चाच्या मानानें ज्यास देवी काढल्यावर त्या चांगल्या उमटतात अशा प्रत्येक इसमामागें २ आणे ७ पै खर्च पडतो. हा खर्च सर्व इंपिरियल फंडांतून होत असतो. वऱ्हाडांत एक देवी डाक्टर सरासरी ३३१६ जणांस देवी काढतो. बंगाल्याकडे हें प्रमाण फार कमी ह्मणजे ६२९ आहे. कर्नल मेकेंझी साहेबांनीं वऱ्हाडची तुलना इतर नऊ प्रांतांशीं करून असें काढलें आहे कीं काढलेल्या देवी चांगल्या रुजणेदार येण्याचें प्रमाण बंगाल, मध्यप्रांत, मुंबई, व पंजाब यांच्या खालच्या प्रतीचें वऱ्हाड प्रांतांतील आहे. देवी पासून बचाव लोकसंख्येच्या ज्या प्रमाणानें होतो त्यांत मध्यप्रांत पहिल्या नंबरचा असून वऱ्हाडचा दुसरा नंबर आहे. ही तुलना मोठी उपयुक्त असून वऱ्हाडच्या देवी खात्याच्या वर्णनीय कामाचें दर्शक आहे. डाक्टर लिटल साहेबा प्रमाणें डाक्टर स्वेन साहेबांचें कामही चांगलें वाखणण्या सारखें आहे. रा. रा. बापुराव यादव सुपरिंटेंडेंट यांनीं आफिसाचें काम सर्वोत्कृष्ट केलें ह्मणून त्यांची मुद्दाम शिफारस करण्यांत आली आहे. त्याच प्रमाणें सुपरिंटेंडेंट रा. रा. रामरत्न यांनीं सानिटरी कमिशनर यांस दौऱ्या मध्यें रजिस्टर तपासण्यांत चांगली मदत दिली. खालील देवीडाक्टरांनीं उतम व बक्षीस देण्यालायक काम केलें ह्मणून प्रत्येकीं तीस रुपयांचें इनाम मिळण्यासाठीं सूचना झाली आहे:—

रावजी विष्णु, हायतखान, हसन महमद, शेर महमद, व गोविंद विनायक हे पांचजण उमरावती जिल्ह्यांतले असून रावजी गोविंद बुलढाणा जिल्ह्यांतले आहत.

देवी खात्याच्या कामाला ज्या सरकारी नोकरांनीं मोठी मदत दिली त्यामध्यें वाशिम जिल्ह्यांतील पाटील लोक आहेत. हें अभिनंदनीय आहे. खानगी लोकांपैकीं दोनच गृहस्थांचीं नांवें दाखल केली आहेत ते मुल्ला महमद याकूब दर्यापूर व हस्सूबाबा आनररी माजिस्ट्रेट आकोट हे होत.

---

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER, 4, 1893

## PROGRESSIVE STATE.

A bare observation of actual occurences brings us if it were not for the clouding disposition of selfishness or of a true philosophy of society wrongly applied to a position, that a society can only pursue its normal course by means of a certain progression of changes and that these changes can only be initiated by individuals or very small groups of individuals. The progressive tendency can only be a tendency, it can only work its way through the inevitable obstructions around it, by means of persons who are possessed by the special progressive idea. Such ideas do not spring up uncaused and unconditioned in vacant space. They have had a difinite origin and ordered antecedents. They are in direct relation with the past. They present themselves to one person or to little group of persons rather than to another, because circumstances or the accident of a superior faculty of penetration, have placed the person or group in the way of such ideas. In matters of social improvement the most common reason why one hits upon a point of progress and not another is that the one happens to be more directly touched than the other by the unimproved practice. Or he is one of those rare intelligences, active, alert, inventive which by constitution or training find their chief happiness in thinking in a disciplined and serious manner how things can be better done. In all cases the possession of a new idea, whether practical or speculative, only raises into definite speech what others have needed without being able to make their need articulate. This is the principle on which experience shows us that fame and popularity are distributed. A man does not become celebrated in proportion to his general capacity, but because he does or says something which happened to need doing or saying at the moment.

This brings us directly into a variety of reflections. Such a man is the holder of a trust. It is upon him and those who are like him that the advance of a community depends. If he is silent, then repair is checked, and the hurtful elements of worn-out beliefs and waste institutions remain to enfeeble the society, just as the retention of waste product enfeebles or poisons the body. If in a spirit of modesty which is often genuine, though it is often only a veil for love of ease, he asks why he rather than another should speak, why he before others should refuse compliance and abstain from conformity, the answer is that though the many are ultimately moved, it is always one who is first to leave the old encampment. If his maxim were sound, it ought to be capable of universal application. Nobody has a right to make an apology for himself in this matter, which he will not allow to be valid for others. If one has a right to conceal his true opinions and to practise equivocal conformities, then all have a right. One plea for exemption is in this case as good as another, and no better. That he has married a wife, that he has a bought yoke of oxen and must prove them, that he has bidden guests to a feast——one excuse lies on the same level with the rest. All are equally worthless as answers to the generous solicitation of enlightened conscience. Suppose, then, that each man on whom in turn the new ideas dawned were to borrow such man's pleas and imitate his example. Every one knows what would happen. The exploit in which no one would go first ever remains unachieved. You wait until there are persons enough agreeing with you to form an effective party. But how are the members of the band to know one another if all are to keep their dissent from the old and their adherence to the new rigorously private? and how many members constitute the innovating band an effective force!

Say such a sacred band consists of one tenth of the real population or say one hundredth. Conceive the additions which this caution has made to the moral integrity of the community in the meantime. Measure the enormous hindrances that will have been placed in the way of truth and improvement, when the day at last arrives on which when this man and his one hundredths take heart to say that falsehood and abuse have now reached their final term, and must at length be thrown away into the other darkness. Consider how much more terrible the shock of change will be when such a declaration comes from the people who waited to make their action, a preconcerted action a sort of military onward marching phalanx! What sort of confidence will then people have! What an injury to their susceptibilities! Instead of pursuation the action would look a deliberate step to overthrow every thing that suited the fabric of society for ages and ages!

Perhaps such a man shrinks not because he fears to march alone, but because he thinks that the time is not yet come for his progressive ideas, and for whose triumph one day he confidently hopes. This plea admits of two wholly different states. Ask a wise statesman what reforms and innovations he has made. He will answer he has made such as would answer the requirements of the people and not as he fancied they ought to be. This grave and sober wisdom has its own reward. A contrary step not only that it does not advance but it on the contrary retards progress. If time is not come for propagating, elaborating and enforcing the new idea and strenuously doing all that one can to bring as many people as possible to state of theory which will at last permit the requisite change in practise to be made with safety and success, it is better the first champions be men of unflinching heroism and martyrdom. Every noble and generous progressive change has its own pedigree of saints and martyrs. It has a distinct hierarchy of its own. To sacrifice or rather to elude into it poor, unthinking credulous victims unable to withstand the mad fury of prejudice and popular hatred, equally unable to draw some solid consolation for themselves out of the exsisting public chagrin on them and still more powerfully unable to go on properly with the boisterous and inflamed world is an incredible and inconceivable mischief that is being wrought to our Indian humanity!

They say the time has always come and the season is never unripe, for the announcement of any fruitful idea. Nothing can be more ridiculous than such a profession. It suits lunacy, vanity, and false and presumptuous self-conceit. Have pure, empty, and naked announcements ever wrought any congenial result? Need instances be cited of the mischief they have wrought? They have simply brought misery on those who put faith into such base pioneers and levellers, and who had the madness to follow such hypocrites. No principle has ever yet been established in this world unless it had its own generous sacrificers. We have ever admired the indomitable spirit of sacrifice which the Irish have ever manifested to the cause of liberty and freedom. Could mere announcements so much boasted of here have availed the Irish anything? Pure announcements unbacked by any unshrinking spirit of sacrifice may in vain inflame the people, separate them into different schisms, work abundant mischief but will be absolutely impotent for any good.

---

## वऱ्हाड.

हवामान— या आठवड्यांतही पाऊस पुष्कळ पडला. हवा सर्द व रोगट झाली आहे आणि त्यामुळें किरकोळ रोग बळावले आहेत.

आज तारखेपासून उमरावतीस वकिलीची परीक्षा सुरूं होईल.

आडगांव येथील हेडमास्तर व असि० मास्तर या उभयतांमध्यें तंटा असल्यामुळें रा० रा० दामोदर कृष्ण टिळक सब डेपुटी इन्स्पेक्टर चौकशी करितां आले आहेत. हेडमास्तराविषयीं अप्रियता उत्पन्न झाल्यामुळें गांवकरी लोकांनीं गांवठी शाळा स्थापित करून आपलीं मुलें त्या शाळेंत घातलीं आहेत असें एक बातमीदार कळवितो.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ मिसल. नंबर १७

———

१८९३

डेपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव— खुशालबाई

जवंज सोनासंगई तर्फे मु. पदासंगई राहणार अंजनगांव ता० दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांस मयत

सोनासंगई बापाचें नांव अभयसंगई राहणार अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टीफिकीट मिळावें ह्मणून सदहू अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज करितां सदहु मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता. २० माहे सप्टेंबर सन १८९३ इ० रोजीं सदहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी. ता. २८ माहे ८ सन १८९३ इ.

Shamsuddin Alikhan

Officiating Deputy Commissioner
Ellichpur District.

---

## वर्तमानसार.

मृत्यु—लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं, आनरेबल जस्टिस काशिनाथ तेलंग यांस गेल्या गुरुवार रात्रौ देवाज्ञा झाली. ईश्वरेच्छे पुढें इलाज नाहीं.

प्रोफेसर जॉर्ज मूर नांवाच्या अमेरिकन शोधकानें एक पोलादाचा मनुष्य तयार केला आहे तो वाफेच्या योगानें चालतो. त्याची उंची सहा फूट आहे. तो चिलखत घातलेल्या मध्ययुगांतील योद्धयाप्रमाणें दिसतो त्याच्या डोकीवर बंब आहे तो त्याच्या डोकीवरच्या मुगुटाच्या खालीं झांकलेला आहे आणि त्याच्या तोंडांत चिरुटाप्रमाणें एक नळी असून ती वाफ जाण्याकरिता केलेली आहे त्याच्या शरिरांत भट्टी आहे, बॉयलर आहे, व यंत्रेंही आहेत व त्याच्या हातापायांत चालायला येईल अशी कृति केलेली आहे या मनुष्याचा उपयोग गाडी ओढण्याच्या कामी चांगला होतो व तो दरतासास पांच मैल प्रमाणें चालतो.

पासिफिक युनिअन रेल्वेवर रालिंग शहरी थोड्या वर्षांपूर्वी एक 'सोडा' क्षारांचें सरोवर सांपडलें आहे. त्याचा घेर कित्येक मैल आहे. आणि त्यापासून दरसाल ६१,००० टन सोडा उत्पन्न होतो. क. णू.

गेल्या ता॥ २६ रोजीं रात्रीं नऊ वाजतां ठाण्याचे कलेक्टर मि. सिंक्लियर हे गांवांत फिरावयास निघाले असतां ठाण्याच्या हिंदूच्या वेगळाल्या तीन देवळांत युरोपियन लोकांनीं जेथें जाऊं नये अशा ठिकाणीं गेले होतें असें समजतें व ते त्यांणी अगदीं अयोग्य केलें, याकरतां सरकारानें याचा विचार करावा. यांच्या बरोबर तरवार, बंदुक वगैरे होती त्यामुळें लोकांकडून त्यांस हरकत झाली नसावी असें वाटतें, पण तें कसेंही असलें तरी सरकारानें त्याचा विचार केलाच पाहिजे.

मुंबई शहराकरतां हल्लीं जितके पोलीस लोक आहेत त्यांत २९० लोक जास्त वाढविण्यास स्टेट सेक्रेटरीची मंजुरी झाली व त्याप्रमाणें सरकारचा ठराव लवकरच प्रसिद्ध होईल.

मुंबईच्या बंदोबस्त करणाऱ्या एका गोऱ्या शिपायानें ट्रामवे गाडीवाल्याचें घड्याळ चोरलें ह्मणून माजिस्त्रेटानें त्यास एक वर्षाची शिक्षा दिली.

मद्रास सरकारानें एक नवे लॉ कालेज सुरू करण्याचें ठरवून त्याकरतां ३॥ लाख रुपये मंजूर केलें आहेत.

वेल्स प्रांतांतल्या मजुरांनीं काम सोडलें व पोलिसाशीं सामना होऊन बरेंच पोलिस घायाळ झाले. दुसऱ्या एका ठिकाणच्या मजुरांनींही असाच कट करून पोलिसाशीं सामना करून रोटीवाल्याचीं दुकानेंही लुटलीं.

गोपाल खिंडीच्या पलीकडे कजुरी कच्छ ह्मणून एक ठिकाण असून तेथें इंग्रजांची छावणी आहे व त्यास मागच्या शुक्रवारीं आग लागून सर्व सामान सुमान, दाणा, गवत. वगैरे जळून गेलें.

वेन्नस प्रांतांतील १०,००० मजुरांनीं कट करून काम करण्याचें बंद केलें आहे व दुसऱ्या मजुरांस काम बंद करण्याची सक्ती करीत आहेत बंदोबस्ताकरतां ४,००० लष्करी लोक बोलावले आहेत.

रशियाच्या टाकसाळेंत पुढल्या महिन्यापासून चांदीचें नाणें पाडण्याचें बंद होणार आहे.

एका इटालियन माणसास फ्रेंचांनीं ठार केल्यामुळें रोम येथें मोठी गडबड झाली आहे. ठा० अ०

मद्रास पत्रामध्यें वाचण्यांत आलें कीं तिकडील पोलिस कमिशनर साहेबांनीं डिटेक्टिव्ह खात्यांत कांहीं स्त्रिया घुसडल्या. पुरुषपेक्षां बायकांच्या अंगानें बातम्याची बाजू अधिक फैलावेल पण त्या किसपत भरंवशाच्या मानाव्या हा एक मोठा प्रश्न आहे.

रशिया व इंग्लंड यांच्यांत व्यापार संबंधानें तह झाल्याचें कळतें.

रशियन सरकारनें हुकूम सोडला कीं, आपल्या राज्यांत चीनचे नाण्याशिवाय इतर नाणें चालू नये.

शेतकी कान्फरन्स येत्या महिन्यांत भरणार त्यावेळीं पुष्कळ अनुभवी अशा लोकांस माहिती कळविण्या साठीं पाचारण होणार आहे.

आपल्या सर्वांच्या माहितीं मधील मि० क्राफर्ड सा० यास निजाम हैद्राबादचें नबाब याच्या मुख्य सेक्रेटरीच्या कामीं आणणार ह्मणतात. म० मि०

विलायतेस पेनशन घेऊन गेलेले लष्करी अंमलदारांस हिंदुस्थानांत पुनः नोकरीस बोलाविण्याची वेळ आल्यास त्यांणीं आलें पाहिजे, असा सरकारानें हल्लीं ठराव केला आहे त्यांला येण्या जाण्याचा खर्च मिळेल व नोकरीची जरूर नाहींशी होईल तेव्हां ३ महिन्यांचा पगार व भत्ता देण्याचें ठरलें आहे.

कत्तल— अचीन प्रांतांत डायमंड पाइंट जवळ चाचे लोकांनीं एका आगबोटीवर हल्ला करून २ युरोपियन आफिसर व २२ उतारूंची कत्तल केली. त्यावेळीं आणखी १८ लोक बुडून मेले व १२ जखमी झालें असें इंग्लिश पत्रांवरून समजतें. स. शो.

कोल्हापूरचे राजेसाहेब वयांत आले असल्यामुळें त्यांना राज्यकारभारा विषयीं मुखत्यारी लवकरच मिळणार आहे असें समजतें ही फार आनंदाची गोष्ट होत आहे.

सार्थे व रानींग फ्रेंच लोकांनीं नाईम्स येथें इटालियन मजुरांचें खून केल्यामुळें इटालींत जिकडे तिकडे फ्रेंचांच्या विरुद्ध उठाव झाला आहे. फ्रेंच कान्सल व फ्रेंच ऍंबसी ही लष्करच्या संरक्षणाखालीं आहेत.

गेल्या बकरीइदच्या दिवशीं अजमगड व त्याचे आसपास घोसी गोरखपूर, वगैरे प्रदेशांत गोवध संबंधानें हिंदु व मुसलमान लोकांची मोठी मारमार झाली. सुमारें १०००० हिंदु आसपासच्या खेड्यांतून मैदानांत येऊन त्यांनीं मुसलमान वस्तीवर हल्ला केला व त्यांच्यापासून बकरीईदीच्या दिवशीं गोवध न करण्याचा करार लिहून घेतला. ह्या रणांत उभयपक्षांचे कांहीं इसम ठार झाले व कित्येक जखमीं झाले. ह्या हिंदुजनांना तेथील बड्या गोरक्षक मंडळीचें पाठबळ असावें अशी वदंता आहे. सु. प.

भोपाळ पासून उज्जनी पर्यंत मोठ्या रुंदीचा आगगाडीचा रस्ता बांधण्याची स्टेट सेक्रेटरी यांणी मंजुरी दिली आहे असें समजतें.

आकाशांतील "दुग्धमार्गी"चा प्रो० व नींडे यांनीं नुकताच एक फोटो काढिला आहे. यावरून त्यांत ५० कोट सूर्य व तितक्याच सूर्यमंडळें असावी असा अजमास करण्यांत आला आहे. आजपर्यंत दोन कोटी सूर्य आहेत असा समज होता.

मेटफर्ड बंदुक चांगली असा अनुभव आल्यावरून ती आतां हिंदुस्थानांतील लष्करी लोकास देण्याचा विचार चालला आहे. त्या बंदुकीची गोळी हाडांत घुसून फूट फूट लांब हाडाचा तात्काळ चुराडा करून टाकिते. न्यायसुधा.

हिंदुस्थान सरकारानें नुकताच एक ठराव प्रसिद्ध केला आहे, त्यांत सिव्हिल आणि मिलिटरी खात्यांतील कामगारांची नुकसानी भरून देण्यासाठीं नियम करून त्यांस काय द्यावें हें ठरविलें आहे. ही नुकसानी तारीख १ एप्रील सन १८९२ पासून द्यावी असें ठरविलें आहे. सिव्हिल आणि मिलिटरी खात्यांत असणारे युरोपियन आणि युरेशियन कामगार हिंदुस्थानांत राहत नसतील त्यांस दरसाल १००० पौंड विलायतेस पाठवावे लागतातच असें एकसट्टा ठरविलें आहे. हे हजार पौंड एक शिलिंग सहा पेन्सचा एक रुपया ह्या भावानें पाठविण्याची सवड दिली आहे. फर्लोचा पगार ह्याच भावानें त्यांस विलायतेस देण्याचें ठरविलें आहे. हें आमच्या वाचकांच्या चांगलें लक्षांत येण्यासाठीं आह्मी स्पष्ट उलगडा करितों. एका कामगारास हजार पौंड विलायतेस पाठवावयाचे आहेत. हल्लीं रुपयाचा भाव एक शिलिंग ४ पेन्स असा सरकारानें ठरविला आहे. ह्या भावानें १००० पौंडाचे १५००० रुपये होतात. एक शिलिंग सहा पेन्सचा एक रुपया ह्या भावानें १००० पौंडांचे १३३३३ $\frac{1}{3}$ रुपये होतात. हे १५००० रुपयांत वजा दिले असतां १६६६ $\frac{2}{3}$ रुपये नुकसान युरोपियन कामगारांस द्यावयाचें असें ठरविलें आहे. रुपयाचा भाव जितका उतरेल तितकें युरोपियन कामगारांस नुकसान जास्त मिळावयाचें असें ठरविलें आहे. ही नुकसानी बारा महिन्यावर वांटून नुकसानी दरमहाच्या दरमहा पगाराबरोबर द्यावयाची रुपयाचा भाव किती उतरला किती चढला या बद्दल सरकार त्रैमासिक पत्रकें प्रसिद्ध करणार व त्याप्रमाणें नुकसानी भरून देणार. हजार पौंड प्रत्येक कामगार पाठवितो कीं नाहीं, कमी पाठवितो, जास्ती पाठवितो, किंवा मुळींच पाठवीत नाहीं हें कांहीं एक पहावयाचें नाहीं. कोणीकडून सिव्हिल आणि मिलिटरी कामगारांच्या पदरांत नुकसानी बद्दल दांड तोडा ओतावयाचा एवढाच काय तो मुख्य मुद्दा आहे.

नुसते सिव्हिलियन ९६० आहेत, व मिलिटरी किती आहेत याची याद तूर्त आमच्यापुढें नाहीं. पण ती संख्या अतिशय मोठी आहे. इतक्या प्रचंड कामगार संख्येस पगाराची नुकसानी ह्मणून १६६६ रुपये द्यावयास निदान एक कोट रुपये ही पुरावयाचे नाहींत शिवाय मागल्या सतरा महिन्यांची नुकसानी आज एकदम द्यावयाची ह्मणजे किती कोट रुपयांचा फन्ना उडेल, व रयतेवर करांचें केवढें प्रचंड नवे ओझें बसेल ह्याचा विचार करतांना प्रजाजनांचें अंग थरथर कांपूं लागेल यांत संशय नाहीं.

कामगारांची दिवाळी सरकारानें केली हें ठीक झालें, पण आतां नव्या करानें प्रजेस सिमगा करावा लागेल ह्याचा हिंदुस्थान सरकारानें, स्टेट सेक्रेटरी यांनीं अगर कोणीच विचार केला नाहीं हें पाहून या इंग्रजी राज्यांतही कायदेशीर लूट चालली आहे असें प्रजेनें ह्मटल्यास तिच्याकडे दोष येईल काय? खचित येणार नाहीं. "बाप पाहुणा आला तरी रेडा दूध देणार नाहीं." ही गोष्ट सरकारच्या ध्यानीं मनीही नाहीं असें अलबत ह्मटलें पाहिजे.

आतां माणूसपट्टी, हात झुराई, हवेवर कर, पाण्यावर कर बसवून उत्पन्न वाढविण्याचा सरकारचा विचार असला पाहिजे हें उघड आहे. ब्रिटिश सरकारचा अम्मल सुखकर आहे कीं उलट आहे ह्याची चौकशी सरकार करील तर बरें असें आह्मांस वाटतें. लोकहो नव्या करास तयार व्हा!

स्टेट सेक्रेटरीचा पोर खेळ— हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीच्या मान्यतेनें हिंदुस्थान सरकारानें एका रुपायाची किंमत एक शिलिंग ४ पेन्स ठरविली आहे, आतां स्टेट सेक्रेटरी साहेब कौन्सिल बिलें एक शिलिंग ३ $\frac{1}{4}$ पेन्सच्या भावानें विकतात, हा पोर खेळ नव्हे तर ह्यास काय नांव द्यावें? ज्यांनीं नियम करावयाचा त्यांनींच जर तो अमलात आणिला नाहीं तर प्रजेचा विश्वास तरी कोठें व कसा बसावा? अशानें रुपयाची किंमत आणखीच उतरून हिंदुस्थानांतील युरोपियन व्यापारांच्या व हिंदुस्थानच्या खजिन्याच्या टाळकणाची साल नाहींशी होईल याचा कोण विचार करितो. हिंदुस्थानचा धनीच कोणी नाहीं तेव्हां विचार तरी करणार कोण?

महापूर आणि दुष्काळ — उत्तर चिनामध्यें महापूर आणि दुष्काळ येऊन रयतेची अन्नान्न दशा झाली आहे,

प्रचंड गंगाजळी — युनायटेडस्टेटस संस्थानच्या खजिन्यात १० कोटी पेक्षां जास्त सोन्याचें नाणें शिल्लक आहे. शु. सू.

भरतपूर येथें मोहरमचे डोले जाण्याचा मार्ग रेलवे सडकेवरून आहे. डोले फाटकाजवळ जातात तोंच रेलवे इनस्पेक्टरचें लाडिस येत असल्यामुळें चौकीवाल्यानें अंमळ फाटक बंद केलें. बस्स, मुसलमानाचें पित्त खवळलें. चौकीवाल्यास यथेच्छ खाऊ दिला. इतक्यांत इनस्पेक्टर साहेबांचें लाडिसही आलें. त्याच्यावर नागव्या तरवारीचा हल्ला झाला, पण इनस्पेक्टर साहेब जीव वांचवुन पळून गेले. असेंही सांगतात कीं, त्या लोकांनीं रेलवेची कांहीं सडकही उध्वस्त करून काटली. काय या लोकांच्या डोक्यांत शिरलें आहे न कळे. क. त.

प्रशियन सरकारानें (अप्पर शिलेशिया) भागांत अवघ्या जगांत अतिशयच खोल असें पृथ्व्युदरांत एक भोंक खोदण्याचें काम चालविलें आहे. हें भोंक पृथ्व्युदरांत ६६६५ फूट खोल गेलें असून तें आणखी खोदण्याचें काम चालू आहे. जगांत अतिशय उंच असा प्यारिसचा ऐफेल नांवाचा लोखंडी मनोरा आहे त्याचे साडेसहापट खोल असें हे पृथ्वीचे पोटांत भोंक खोदलें आहे व हें केवळ भूगर्भशास्त्र शोधनार्थच काम चाललें आहे. केवढा हा प्रचंड उद्योग! न्या.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर " ७ " १॥८

किरकोळ अंकास ........................४

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०।०६

दुसरे खेपेस ........०।

Six monthly............3 " 8 as.

Single copy..............................4as,

Advertisement

Below 10 lines...2 Rs.

per line over10... 4 as.

Repetition per line 3as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XVII AKOLA MONDAY 11 SEPTEMBER 1893 NO36

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख ११ माहे सप्टेंबरसन १८९३ इ० अंक ३६

नोटीस.

मि. नारायण शामराव उद्योगी वकील राहणार पातुरडे तालुके जळगांव यास नोटीस देणार बालाप्रसाद रामदत्त परदेशी ब्राह्मण राहणार खेकडी तालुके अकोला यांजकडून नोटिसीनें कळविलें जातें कीं, आमचे वडील नामे रामदत्त विसनदत्त याणी तुह्मांस खातेची जमीन एकर १७ गुंठे १७ अगर येथील. रुपये ( २०० ) दोनशेंस ताबेगहाण दिली त्याची शर्त अशी कीं, सदहू शेतीत जे उत्पन्न होईल त्यांत सरकारी पैसा दरवर्षांस रुपये ३४८७ देऊन बाकीचे रुपये सदहू २०० रुपयाच्या फेडीत जमा करीत जावे. व सदरहू दोनशे २०० रुपयेस व्याज दर शेंकडा रुपये एकप्रमाणें द्यावे. व शेतास जी लागवड लागेल ती उत्पन्नांतून वजा करावी. अशा करारानें शेती आमच्या वडीलाच्या खातेची तुह्मांस ताबेगहाण दिली त्यांस आजमासें आज पंधरा वर्षें झाली. आज सुमारें तीन आठवडे झाले तुह्मी हिशोब दाखविलास करून त्यांत हिशोबी रुपये ( ५६० ) आमच्यावर घेणें दाखविलें व पंधरा वर्षांत कायते रुपये ८० जमा दाखविले. व मज पासून थाप देऊन नवीन दस्तऐवज रुपये ( ३२५ ) चा करून घेतला. आतां तुह्मांस ह्या नोटिसीनें असें कळविलें जातें कीं. नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत मजला १५ वर्षांचा हिशोब दाखवावा. व मजपासून रुपये ( ३२५ ) चा दस्तऐवज करून घेतलेला मजला कोणच्याही प्रकारानें कबूल नाहीं. आपण माझें सर्व हरण करणेंचे इच्छेनें केलें तर मनला आपले कोणचेच करणें कबूल नाहीं. तुह्मी १५ वर्षांचा हिशोब चार पंचा समोर दाखवून खात्री करावी. तुमचें देणें निघाल्यास मी देणेंस तयार आहे माझें निघाल्यास आपण द्यावें असें झालें नाहीं तर ह्या नोटीसीच्या खर्चा सुद्धां अखेर निकाल होई पर्यंत जो खर्च व नुकसान होईल ते सर्व भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस तारीख ७ माहे सप्टेंबर सन १८९३ इ०

सही.

बालाप्रसाद वल्लद रामदत्त परदेशी

ब्राह्मण राहणार खेकडी

दस्तूर खुद.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध १ शके १८१५

## राजा प्रजा आणि तिचें शिक्षण.

निरनिराळे समाज कसे झाले, नानाविध राष्ट्रें कशीं बनलीं या विषयीं आज आह्मांला विचार करावयाचा नाहीं. तसेंच देशामध्यें एक प्रभुसत्तात्मक राज्य असावें, किंवा अल्प जनसत्तात्मक राज्य असावें अथवा प्रजासत्तात्मक राज्य असावें या संबंधानेंही आज उहापोह करावयाचा नाहीं. त्या प्रमाणेंच वर जे राज्यतंत्रांचे प्रकार सांगितले त्या प्रत्येकाचे अधिकार काय आहेत व त्या प्रत्येकानें कोणतीं कर्तव्यकर्में बजाविलीं पाहिजेत या विषयींही आज भवतिनभवति करण्याची जरूर नाहीं. राज्यशासनपद्धति देशामध्यें कोणतेहि असो तिचे अधिकार कोणतेही असोत, तिची कर्तव्यता कांहींही असो पण तिच्या मध्यें हें एक मूळतत्व असतेंच. तें कोणतें, तर देशाचें राज्य ज्याच्या किंवा ज्यांच्या हातीं असेल त्यानें किंवा त्यांनीं आपल्या प्रजेच्या शिक्षणाकडे लक्ष देणें त्या संबंधानें काळजी घेणें, हें उचित होय. इतकेंच नव्हे तर हें त्यांच्या अधिकारां पैकींच एक आहे, व त्यांच्या कर्तव्यकर्म पैकींच एक आहे राजा ह्मणजे काय, याचे अधिकार काय, त्याचें काम काय याच्या जितक्या ह्मणून व्याख्या असतील त्या प्रत्येकीं मध्यें वरील सिद्धांत गर्भितच आहे. आतां राजाधिकार काय असावेत, त्यांचें प्रमाण किती असावें या संबंधानें चतुर जे राजनीतिशास्त्रज्ञ आहेत त्यांमध्यें बराच मतभेद आहे. कोणी असें ह्मणतात कीं राजानें आपल्या प्रजेच्या सर्व गोष्टीमध्यें हात घालावा हा त्याचा अधिकार आहे. कांहीं सवलती देऊन व कांहीं नियम घालून त्यानेंच देशाच्या व्यापाराची व्यवस्था लावावी. आयात निर्यात विषयक कायदे करून त्यानेंच देशाच्या खर्चावर देखरेख ठेवावी. नीतिशास्त्र्यांची योजना करून त्यानेंच प्रजेच्या शिक्षणाकडे बघावें. व धर्मविचारणसभा स्थापून तिच्या मार्फतच प्रजेच्या धर्म विषयक गोष्टींचा त्यानेंच विचार करावा. कित्येकांचें याच्या अगदीं उलट ह्मणणें पडतें. ते राजाचे अधिकार अगदींच संपुष्टांत आणतात पण त्या संपुष्टांत आमचा जो वर सांगितलेला शिक्षणा संबंधाचा सिद्धांत आहे तो येतोच! या मुद्या संबंधानें सर्व वादी प्रतिवादींचें एक मत आहे. निदान ते सर्व एक मतानें हें कबूल करतात कीं "प्रजेच्या मालमत्तेचें व तिच्या जिवाचें संरक्षण करणें हें राजाचें काम आहे व हा त्याचा अधिकार आहे." एवढी गोष्ट आमच्या सिद्धांताचा खरेपणा दाखविण्याला पुष्कळ आहे. वरील गोष्ट जर सर्वांना कबूल असेल तर मग आमचा सिद्धांतही त्यांना कबूल करावा लागेल. तो कसा? असा सहज प्रश्न होतो. "प्रजेच्या मालमत्तेचें व तिच्या जिवाचें राजानें संरक्षण करावें हें त्यांचें कर्तव्य होय" असें जर आहे तर हें कर्तव्य बजाविण्याला "राजानें प्रजेला शिक्षण द्यावें" या सारखा सुलभ व रामबाण उपाय तो कोणता आहे बरें! या विषयीं आह्मांला जास्त कांहीं सांगण्याची जरूरी नाहीं. आडामस्मिथ सारखे आज शेंकडों राजव्यवहारशास्त्रनिपुण झाले असतील. तेच याचा उलगडा करतील. त्या पैकीं कांहींचें मत असें आहे कीं "प्रजेच्या शिक्षणा संबंधानें" प्रजेनेंच व्यवस्था लावावी. पण अशांची संख्या फारच थोडी आहे. मुळींच नाहीं ह्मटली तरी चालेल. शिवाय त्यांचें हें मत चुकीचें असावें असें आह्मांला वाटतें. कारण जों पर्यंत प्रजा अज्ञान आहे तों पर्यंत ती साधारण रानटी स्थितींतच आहे तों पर्यंत निदान प्रजेला सज्ञान करण्याचें राजावरच सोंपाविणें इष्ट आहे. पुढें जसजशी प्रजा सुशीक्षित होत जाईल तसतशी तीच आपल्या शिक्षणाचें काम आपल्या अंगावर घेईलच. याला एक दाखला देऊं. मुलें जों पर्यंत लहान असतात तों पर्यंत त्यांची सर्व प्रकारची जोपासना त्यांच्या आई बापाकडेच असते. त्यांच्या शरिराची काळजी घेणें, त्यांना शिकविणें, त्यांना सुमार्गाला लावणें हें त्याचेंच काम असतें. नव्हे काय? त्या प्रमाणेंच राजा हा प्रजेचा पालन कर्ता, शास्ता होय. तर मग प्रजेच्या शिक्षणाचा भार त्याच्याच माथीं पडतो. नाहीं काय? असो आतां कित्येकांचें मत काय आहे कीं राजानें जेवढी श्रीमंत प्रजा असेल तिच्या शिक्षणाचा बोजा आपल्या शिरावर घेणें हें त्याचें काम नाहीं. हें त्या श्रीमंत प्रजेचेंच काम होय. पण सामान्य व गरीब स्थितींत जी प्रजा आहे तिच्या शिक्षणाची सर्व जोखीम राजानें आपल्या अंगावर घेतली पाहिजे. यांच्या ह्मणण्याचा अर्थ इतकाच कीं राजानें श्रीमंतांच्या शिक्षण खात्याकडे कांहीं खर्च करूं नये. त्याचा खर्च श्रीमंतानींच भागवावा. यांच्या ह्मणण्याचें सार हें कीं "राजानें गरीब प्रजेच्या शिक्षणाकडे लक्ष पुरविणें हें जास्त महत्वाचें आहे" हें मत बरेंच संयुक्तिक दिसतें! ह्या लोकांच्या मता प्रमाणें प्रजे पैकीं श्रीमंत लोकांचा भाग गळतो खरा; पण देशांतील गरीब प्रजेची संख्या लक्षांत आणली! ह्मणजे श्रीमंत लोकांचा भाग वगळला न वगळला सारखाच; सारांश काय कीं राजानें प्रजेच्या शिक्षणाकडे सर्व प्रकारें लक्ष पुरवावें हें त्याचें कर्तव्यकर्म होय. कारण एखाद्या ग्रामाधिकाऱ्यानें शहरांतील लोकांमध्यें महारोग न होण्याविषयीं खबरदारी ठेवणें हें जसें त्याचें काम आहे तसेंच, देशांतील प्रजेमध्यें अनीति, दुर्व्यसन, दुराचार इत्यादिकांचा प्रवेश न होण्याविषयीं सदासर्वदा काळजी घेणें हें राजाचें कर्तव्य होय. आणि अनीति व अज्ञान या मध्यें केवढें जवर प्रेम आहे हें सर्वांना ठाऊकच असेल. आतां अनिति जर नाहींशी करावयाची असेल तर अज्ञानाचा बीमोड झाला पाहिजे हें उघड आहे. प्रजेच्या शिक्षणा संबंधानें जर राजानें हयगय केली, हलगर्जीपणा दाखविला व बेपर्वाई बाळगली तर देशांमध्यें शांतात कधींच राहणार नाहीं. हें खूप समजा. देशांतील जनसमूह जर अशिक्षित ठेविला तर धर्मसंबंधीं परस्परां मधला वैरभाव दिवसानुदिवस वाढत जाऊन तो विकोपाला पोंहचेल व त्यामुळें देशांमध्यें सगळीच अव्यवस्था होईल व अंधार पुंडाई माजेल यांत काडी इतका संशय नाहीं. या आमच्या ह्मणण्याला इतिहासांतून हवीं तितकीं उदाहरणें देतां येतील. इसवी सन १८५७ सालचे बंडाचें उदाहरण घ्या. हें बंड मूळ उद्भवण्याला धर्मांचें कारण झालें हें खरें; व तसेंच परकी धर्माचे व परदेशचे लोक आमच्यावर बळजोरीनें राज्य करतात हें लोकांना सहन झालें नाहीं ह्मणूनही हें बंड उद्भवलें असेल. पण याचें खरें कारण आमच्या मतें बंडवाल्यांचें अज्ञान हें होय. पहा, तेच बंडवाले शिपाई जर चांगले शिकलेले सवरलेले असते, त्यांचीं मनें सुसंस्कृत झालेलीं असती तर असले प्रसंग गुदरले असते काय? व त्या बंडांत जे हजारों लोकांचें बळी पडले, अगणित रक्तपात झाले, देशाच्या कानाकोपऱ्यांतूनही अतोनात दंगेधोपे झाले ह्या सर्व गोष्टी झाल्या असत्या काय? कधींही झाल्या नसत्या. असो. ही आमच्या हिंदुस्थानाविषयीं एक गोष्ट झाली. आतां आमच्या राज्यकर्त्यांच्या देशाचें उदाहरण घेऊं. सन १७८० सालीं "नो पोपरी" या नावानें प्रसिद्ध असें इंग्लंडामध्यें मोठें थोरलें बंड झालें तें इतिहासज्ञांस महाशूरच आहे. कांहीं कारण नसतांना केवळ एका विक्षिप्त व उन्मत्त मनुष्याच्या चिथावणीवरून लाखों लोकांनीं बंडाला प्रवृत्त व्हावें काय? एका आठवड्याच्या अवकाशांत मोठमोठ्या व सुधारलेल्या शहरांत जिकडे तिकडे लूटींगपातशाई माजावी! पार्लमेंटाच्या इमारती भोंवतीं बंडखोरांचा वेढा पडावा. ज्याला त्याला आपल्या जिवाची धास्ती वाटावी. धर्माधिकाऱ्यानीं भीतीस्तव घराच्या कौलारावर पळ काढावा. बडे बडे व कुलीन अशा अमीर उमरावांना बंडवाल्यांनीं त्यांच्या घरांतून त्यांनीं ओढून काढावें. न्यायाधिशांचीं घरें जमीनदोस्त व्हावी! तुरुंग दंगेखोरांनीं फोडून आंतील कैद्यांना मोकळे सोडावें! आपली सुटका झाली ह्मणून लुटारू, घरफोडे, दरोडेखोर, खूनकरणारे, यांनीं बंडवाल्यांस सामील व्हावें! एकाच वेळीं लंडन शहरांत ३६ ठि-

कार्णी आग लागल्या असा अनर्थ कशानें झाला बरें! बरें हें एकीकडे राहो! हें बंड मोडण्यास ठीं जो प्रतीकार केला त्यानें काय निष्पन्न झालें याचा विचार करा. कित्येक बंडवाल्यांना तोफेच्या तोंडीं दिलें. कित्येकांना फांशीच्या शिक्षा ठोठावल्या. कित्येकांनां सुळावर चढविलें! कित्येकांना घोडे, बैल यांच्या पायाशीं बांधून तुडवून यमसदनीं पाठविलें. कित्येकांना दारूच्या पिपांत दडपून धारातीर्थी धाडलें. हर हर! या योगानें जितक्यांचें ह्मणून बळी पडले असतील इतके एखाद्या रणघोर लढाईत सुद्धां पडले नसतील. महा अग्निप्रलय व महामारी प्रलय अशीं जीं दोन अरिष्टें लंडन शहरांवर ओढवलीं होतीं त्यांच्याच तोडीचें हें सन १७८० सालचें अरिष्ट कशानें आढवलें बरें! दुसरें कशानें! लोकांचें पूर्ण अज्ञानानें विचार करा! ज्या देशामध्यें मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणारे जे लोक आहेत ते जर चांगले शिकलेले असतील, त्यांचीं मनें संस्कृत झालीं असतील, मानसोन्नति करून घेण्या मध्येंच जर त्याना सुख वाटत असेल, निखिल जगाचा चालक जो ईश्वर त्यांविषयींची पूज्यबुद्धि त्यांच्यामध्यें वसत असेल, अधिकारी जे आहेत त्यांना मान द्यावा हें जर त्यांना कळत असेल व आपलीं जीं दुःखें आहेत तीं राजाच्या कानावर शांततेनें व व्यवस्थेनें घालून त्यां पासून आपली सुटका कशी करून घ्यावी हें तत्व जर त्यांनां पूर्णपणें अवगत असेल, तर मग आमच्या देशावर वर निर्दिष्ट केलेल्या संकटांप्रमाणें संकटें स्वप्नांत तरी येतील काय? ह्मणून आमचा मुद्दा हाच आहे, कीं प्रजेच्या जीविताचें व तिच्या मालमत्तेचें संरक्षण सरकारानें करणें रास्त आहे. व प्रजेच्या जीविताचें व तिच्या मालमत्तेचें नुकसान होण्याचें भय मुख्य जनसमूहाचें ढोबळ अज्ञान हें होय. आणि ह्मणून आपली प्रजा अशिक्षित रहाणार नाहीं या बद्दल सरकारानें नेहेमीं दक्ष राहिलें पाहिजे. या शिवाय दुसरें गत्यंतरच नाहीं. बरें, प्रजेच्या मालमत्तेचें व तिच्या जीविताचें रक्षण करणें हें सरकारचें काम आहे हें जो तो कबूल करतो. आतां प्रजेला शिक्षण जर दिलें नाहीं तर मग प्रजेच्या मालमत्तेचें व तिच्या जीविताचें रक्षणार्थ दुसरा कोणता उपाय रहातो बरें? जरूर पडेल त्या प्रमाणें अपराध्यांना कडक शिक्षा देण्याचा हाच उपाय नव्हे काय? पण या योगानें बिचारे जे निरपराधी असतील त्यांचा ही चुराडा होईल. गोळी घालून ठार मारणें, तोफेच्या तोंडीं देणें, खांबाला बांधून फटके देणें, हत्तींच्या पायांखालीं तुडविणें, अंधार कोठडी दाखविणें, काळ्या पाण्यावर पाठविणें, सुळावर चढविणें असे एकंदर चौदावे रत्नाचेच उपाय सरकार अमलांत आणणार ना! सारांश एवढाच कीं, आपली कामगिरी बजाविण्याला सरकारला दोन उपाय आहेत. एक उपाय जर योजिला तर प्रजा दिवसानुदिवस सुधारत जाणार आहे, शहाणी होणार आहे व सुखामध्यें राहणार आहे. दुसऱ्या उपायाची जर अंमल बजावणी केली तर तीच प्रजा रानटी बनेल, अक्षर शून्य होईल व कष्टामध्यें व दुर्दशेमध्यें आपले दिवस घालवील. या दोन उपायांपैकीं सरकारनें कोणता उपाय स्वीकारावा हें आणखी निराळें सांगितलें पाहिजे काय! जे महात्मे व उदारधी राज्यव्यवहारशास्त्रज्ञ "राजानें प्रजेला शिक्षा करणें योग्य होय" असलें तत्व मोठ्या गंभीरतेनें प्रतिपादन करतात त्यानींच "राजानें प्रजेला शिक्षण देणें रास्त आहे" हें तत्व प्रतिपादन करूं नये ह्मणजे मोठ्या दिलगिरीची व मोठ्या आश्चर्याचीच गोष्ट नव्हे काय! खरोखर असें संभवेल तरी कसें! आमच्या मतें ज्याला एक अधिकार आहे त्याला दुसराही अधिकार असावा. सुधारलेलीं ह्मणून जेवढीं राष्ट्रें असतील त्या मध्यें वर निर्दिष्ट केलेल्या शिक्षांची जर अंमलबजावणी होत असेल तर ती गोष्ट आमच्या त्या त्या राष्ट्राला काळीमा लावणारी व लज्जास्पद आहे खरोखर अशा शिक्षा जर त्या राष्ट्रांत चालू असतील तर त्या राष्ट्रांत प्रत्यक्ष 'नरकासुरच' अवतरला आहे असें ह्मणणें भाग येतें व जेवढे लोक त्या शिक्षांचे पायीं प्राणास मुकले असतील तेवढ्यांचें पाप त्या राष्ट्रांतील सरकारच्या पदरांत पडत नाहीं काय! त्याच लोकांना जर सरकारनें उत्तम शिक्षण दिलें असतें तर ते आज आपला संसार चालवितें, इहलोकींच्या सुखाचा आस्वाद घेतें, व कदाचित स्वदेशाचें कल्याणही करतें व त्यामुळें त्या त्या राष्ट्राची आणखी केवढी थोरवी झाली असती बरें! ह्मणून सरकार असण्याचा जो मूळ हेतु तो सफळ होण्याला "प्रजेला चांगलें सुशिक्षित करणें" हा उपाय आहे नुसता ऊपाय आहे असें नाहीं हाच उत्तम उपाय आहे! अशी जर वस्तुस्थिति आहे तर मग सरकारनें प्रजेच्या शिक्षणामध्यें मुळींच हात घालूं नये असें कांहींना वाटतें तें कसें तें ईश्वर जाणे! आह्माला निदान समजत नाहीं (पुढें चालू)

---

गेल्या ९ वे तारखेस सायंकाळीं येथील लायब्ररींत रा. रा. रामचंद्र गणेश मुंडले बी. ए.एल.एल.बी. यांचें 'सांप्रतची शिक्षणपद्धति' या विषयावर इंग्रजींत व्याख्यान झालें. वर्षोत्सव व्याख्यानमालेंतलें हें पांचवें व्याख्यान होय. कप्तान मारिस डेपुटी कमिशनर हे संकेता प्रमाणें आले होते श्रोतृसमाज बराच मोठा जमला असून राव बहादूर जठार, दांडेकर, महाजनी, भागवत, आदि करून मोठमोठे गृहस्थ जमले होते. रेव्हरंड मि. फुलर अमेरिकन मिशनरी मंडळीचे मुख्य हेही हजर होते व्याख्यानाचा विषय अति महत्वाचा व विस्तृत व्यापकतेचा होता तरी व्याख्यात्यांनीं त्या विषयाची चर्चा दोन्ही दृष्टीनें उत्तम प्रकारची केली. आद्य शिक्षणा संबंधानें त्यांनी ज्या कित्येक सूचना जिल्हा बोर्डस व मुनिसिपालिट्या यांस केल्या आहेत त्या अवश्य मनन केल्या पाहिजेत. मध्यंतरी मि. मारिस हे तेवढ्याच विवेचना पुरते चार शब्द बोलून चालते झाले. नंतर मध्यम प्रतीच्या व उच्च प्रतीच्या शिक्षणा संबंधानें व्याख्यात्यांनीं सूचविलें कीं सध्यांच्या शिक्षणक्रमांत अनेक फेरफार केले पाहिजेत. प्रत्येक शाळेस बागबगीचा जोडलेला असावा व तो विद्यार्थ्यांनीं राखला पाहिजे. तसेंच धंदे शिक्षणाच्या व सुतारकीच्या वगैरे सोयी ठिकठिकाणीं नवीन काढण्याचा काल समीप आला आहे असें राजश्री मुंडले यांनीं सुरस रितीनें प्रतिपादित केलें. शाळेंतील मुलां साठीं भोजनगृहें व वसतिगृहें कोणत्या तत्वावर निघालीं पाहिजेत आणि त्यांची व्यवस्था विद्यार्थिदशेला मनोहर कसकशी होत गेली पाहिजे हें व्याख्यात्यांनीं जोरदार व खुबीदार भाषणानें व्यक्त केलें. स्त्रीशिक्षणा संबंधानें येत असलेले अडथळे सांगितल्यावर ते कसे दूर होतील हें संक्षेपानें कळवून हळदी कुंकू, आवळी भोजन व मंगळागौर इत्यादि नित्याच्या गोष्टी मधून चांगल्या शिकलेल्या सवरलेल्या बायांनीं परस्पर बोलण्यानें व दळणवळणानें इतर मुलींस शिक्षणाची गोडी कशी लावावी हें त्यांनीं दर्शविलें.

व्याख्यान रसाळ असून विचारांनीं परिपूर्ण व मनें आकर्षण होतील असें होतें. हें व्याख्यान आटोपल्यावर रेव्हरंड फुलर हे कांहीं वेळ बोलले. हल्लीं शेवटील दर्ज्याच्या शिक्षक लोकांस जो पगार मिळतो तो अत्यंत हीनत्व दर्शक व गृहस्थपणाच्या स्थितीला अपुरा असा असतो. पगार निदान दहा रुपयांच्या खालीं नसावा असें त्यांचें फारफार म्हणणें होतें. त्या म्हणण्यास राव बहादूर जठार यांनीं आपलें अनुमोदन दिलें इतकेंच नाहीं तर ते म्हणाले कीं अखेरच्या दर्ज्यास ५० रुपयांचा किंवा निदान २५ रुपयांचा शिक्षक तरी असला पाहिजे हें खरे पण पैसा आणावा कोठून हा मूळ प्रश्न आहे. आणि दाहा बारा रुपयांस म्याट्रीक्युलेटेड मनुष्य मिळतो तर इतर शिक्षक होऊं इच्छिणाऱ्या गृहस्थास किती पगार द्यावा हें श्रोत्यांनींच ठरवावें नंतर त्यांनीं व्याख्यात्याचें फारफार आभार मानले आणि सभा विसर्जित केली.

---

जनरल सर हेनरी नारमन जी. सी. बी जी. सी. एम जी. सी आय इ. गव्हरनर कुइन्सलान्ड हे लार्ड लान्सडौन यांच्या मागून हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल होणार असल्या विषयीं पक्क्या बातम्या आल्या आहेत जनरल नारमन यांची नेमणूक झाल्या पासून इंग्रजी पत्रें सध्याच्या प्रधानमंडळावर कडक टीका करूं लागलें आहेत. त्यांच्या ओरडा ओरडींत कांहीं तथ्य आहे असें आह्मास कांहींच पक्के पणी ह्मणवत नाहीं.

---

'औद्योगिक परिषदेची तिसरी बैठक गेल्या आठवड्यांत चार दिवस बसली होती. अध्यक्षस्थान नामदार फजुल अली विश्राम भाई यांनीं स्वीकारलें होतें. उत्तरोत्तर या परिषदेची अभिवृद्धि होत आहे आणि महाराष्ट्रातील लोकांनीं या स्तुत्य व देशहिताच्या कार्यांत पुढारीपण पतकरलें आहे. हें त्यांस भूषणास्पद आहे. या सभेची हकीकत यथावकाशें आह्मी प्रसिद्ध करूं. प्रस्तुत या सभेचा समारंभ उत्तम प्रकारें झाला हें कळविणें भाग आहे. या वर्षी कित्येक नेटिव संस्थानांनीं या सभेस आपला आश्रय दिला ही संतोषकारक गोष्ट होय.

---

## The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER, 11, 1893

The significant and suggestive remarks of the Judicial Commissioner and the Resident on the present administration of Civil and Criminal justice have well pointed out that the judicial work needs separation from the revenue and that the present system of alloting judicial work needs a careful and discriminating division of labour in connection with the civil and criminal branches of the judicial line. The Resident has attempted to chalk out a line in which the new move of reform should run but we are of opinion that besides such a move the administration requires a new guide as regards appointments in the Commission. The material being rough and unworkable no gaudy paint will produce a good picture. The Resident's remarks are however welcome to us as they propose a few practical and limited hints. They are as follows:—

"The general impression which the facts recorded in the section of the report which deals with appellate Jurisdiction leave on the Resident's mind is that, looking at the povincial average, the duration of appeals is too long, that the quality of the work in the court of the Civil and Sessions Judge is much better than that of the other district courts, that the Civil and Sessions Judge, taking all his duties into consideration, has rather more work than he can manage, and that the Judicial Commissioner, now that the arrears have been reduced, has a comparatively easy time so far as court work is concerned. The uncertain duration of the criminal sessions over which the Civil and Sessions Judge has to preside is a principle reason why his file of civil appeals is apt to fall into arrear. For the last two years the sessions work has been particularly heavy, and the remedy which the Resident thinks might be usefully applied is that an Additional Sessions Judge might be appointed *ad hoc* as occasion may require, so as to enable the Civil and Sessions Judge to devote a larger portion of his time exclusively to civil appellate business. On the question of what system should be adopted for disposing of the civil judicial business of the province, the Resident approves the plan of keeping one officer in each district primarily, and as far as possible exclusively for civil Judicial work. In the memoranda regulating the distribution of civil business drawn up in 1889 to meet the requirements of the Hydrabad Courts Law, the principle of this plan is distinctly laid down. The practical difficulty which has hitherto opposed itself, that the province has not had a sufficient number of qualified officers, has now almost disappeared. The Resident thinks that in the case of senior Extra Assistant Commissioners in particular it ought to be possible now to ensure their retention in the same stations and their employment mainly on civil judicial work."

---

7—9—93 Mangrul

It is an universal truth that the prosperity of a king depends upon the well status of his subjects. The king is to sway over them. So the first object, he must have in view, to the exclusion of others, is to try his best to ameliorate their condition—the firm basis of his kingdom. Being too much after wealth, greedy for extending his dominions and establishing his supremacy over the neighbouring kingdoms, he becomes, as a matter of fact, blind to his principal duties towards his subjects. Money is the chief thing required to gratify the lust of his own and that of his inmates, to satisfy his thirst for wealth, and to have his high hopes and aspirations realized. The treasury balance being short to cover so much extravagant expenses 's

wants to incur, he now and then imposes taxes after taxes on them and squeezes out money required for the time being. The selfishness becomes predominant and the sense of duty dormant. So he takes little care to see whether they would bear so much load of taxation or not. Thus his shortsighted actions spread discontent among his subjects, lower down his prestige and ultimately bring on ruin to his kingdom.

We shall now turn to a particular province. Our Berar is an Assigned province under the British rule. The agriculturists form a majority of the Berar populace. If we throw a glance towards their condition we cannot but feel pity for them. Their inherent profession has no doubt made them bodily strong. But mentally they are weak. They are obliging, simple, illiterate, innocent and easily to be prevailed upon. They are most loyal and obedient to their Sarkars owing to the enlargement of their families, to the unnecessary expense they incur, to the failure of crops and to such other causes they are over head and ears in debt. Though their only comfort lies in bread, salt and blanket, they actually live from hand to mouth nay they are doomed to subsist occsionally on roots and fruits. Hard is time to them. They are closely connected with Sawkars and Sarkars—the horrible and forcible drains that are pumping out money out of them ( agriculturists ). How they can attain success in checking these mighty drains—the Sawkars being intelligent, moneyed closefisted men and Sarkars being the monarchs of all they survey —Had they been destined to have their connection with any other class of men it would have been next to impossible to have such a deplorable state of things to their lot. Under the urgent demands of necessity they cant quit their connection with Sawkars. When they are once found into the sharklike clutches of Sawkars, on account of the extraordinary and unparallel transactions, there is little or no hope of being freed from debts even though they lose all what they have. With these changes the Rayatwari system is undergoing a change. From the statistics of the Registration Department it will be seen that the system is going into abeyance as almost all the lands have gone into the hands of a particular class of men—the Sawkars who are now the landlords of Berar.

Like Sawkars, Sarkars do not show even the slightest leniency in recovering land revenues though they are aware that the agriculturists are sunk in poverty and ruin Though the agriculturists are the props of the province they are not allowed even to touch fire wood without paying Government dues. They are to pay for grazing their herds of cattle. Thus they are hemmed in on all sides. To say the truth they are working hard simply to fill up the ever empty bags of Sawkars and Sarkars. The Sarkars are pleased to grant loans. But as they are not granted timely and are granted to particular purposes the agricultursits do not derive any great advantage. There are some other purposes that badly necessitate them to implore the assistance from Sawkars who as soon as they are aware of the fact that loans are granted, stop at once any payment and take rapid steps to recover previous debts Thus though the act of granting loans is a benevolent one it on the contrary adds to the difficulties they are beset with. Sooner the Swakars take steps to alleviate the existing state the better We think if the following suggestions be paid attention to there is every hope of having a change for the better.

The Sarkars should make the grants of loans applicable to all purposes; they should make it a rule that no agriculturists' immovable property be liable to attachment under the Civil P. C. They should make the assessment a permanent one They should keep aside grazing lands sufficient for grazing purposes. They should impart education liberally and on the whole they should set up Government Agricultural banks.

## वऱ्हाड.

मि. आर. ए. सिम्पसन असि. कमिशनर, वाशिम यांस दुसरे वर्ग असि. कमिशनरचे अधिकार आणि शंभर रुपये पर्यंत दिवाणी दावे चालविण्याचे अधिकार देण्यांत आले.

वाशिम येथील मुनसिपालिटीचे चेअरमनचे जागीं मि. हेअर डेपुटी कमिशनर यांची निवड झाली.

इलिचपूर मुनसिपालिटींतील खालील तीन सभासद आपले कामाची मुदत संपल्यामुळें सभासदपणा सोडणार होते पण त्यांचीच निवड पुन्हा लोक मतानें पसंत ठरली:—नबाब सय्यद दौलतअली, मि पुरुषोत्तम भगवंत राव देशपांडे, आणि मि. महमद पन्ना शेखचांद

मि. फ्रेजर पोलीस सुपरिन्टेंडेंट, बुलढाणा हे नोव्हेंबर ९ वे तारखेपर्यंत हक्काच्या रजवर आहेत तोपर्यंत मि. कूड आसि० सुपरिन्टेंडेंट हे त्यांचें काम पाहतील.

रा. रा. विष्णु हरी तहशीलदार इलिचपूर, हे तीन महिन्याच्या रजेवर गेले असल्याचें कळतें.

अकोट मुनसिपालिटींतील सभासदांनीं तेथील तहशीलदार मि. सुब्बापलू नायडू यांची आपले अध्यक्षाचे जागीं योजना केली आणि तिला आलि. रेसिडेंट साहेबांची संमती मिळाली.

वणी तालुका बोर्डांत तेथील तहशीलदार सभासद होते ते बदलल्यामुळें त्यांचे जागीं नवीन तहशीलदार रा. रा. वामन गणेश देशपांडे यांची नेमणूक झाली.

रा. रा. भैरव प्रसाद आफि. तहशीलदार यांस यवतमाळ तालुका बोर्डाचे सभासद नेमिलें.

रावसाहेब फकीरचंद असिस्टंट इंजिनीअर वर्ग १ पूर्व वऱ्हाड यांस गेल्या आगष्ट महिन्या पासून एक वर्षाची आजारी पणाची रजा मिळाली आहे.

मि. हाशमत अली अव्वाची उमरावती यांची बदली पुसदास होऊन तेथील मि. सी. भीमराव अव्वाची यांस उमरावतीस बदलल्याचें कळतें.

यंदाच्या वकिलीच्या परीक्षेंत खालील तीन विद्यार्थी पसार झालें असल्या विषयीं समजतें:— धोंडो मोरेश्वर खरे, विश्वनाथ सदाशिव आणेकर, आणि केशव भिकाजी परचुरे.

### नोटीस.

नोटीस— भगवान वल्द एको पाटील राहणार मानेगांव तालुके नळगांव जिल्हा अकोला यासीं

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तारीख ७ माहे सप्टेंबर सन १८९३ इसवी रोजीं मलकापूर येथें असिष्टंट कमिशनर साहेब बहादूर कोर्ट मलकापूर यांचे कडेस पोळ्याचें दिवशीं घिरणी येथें तंटा होऊं नये ह्मणून अर्ज देण्यास आलों तेथें तुम्ही अह्मास एक दिवस ठेऊन घेऊन मजला फसवून लबाडीच्या थापा वगैरे देऊन तारीख ८ माहे सप्टेंबर सन १८९३ इसवी रोजीं तुह्मी आमचे तर्फे कुलमुखत्यारपत्र लिहून घेतलें व तें तारीख मिनहु रोजीं मलकापुरास रजिस्टर कचेरीत नोंदलेलें आहे तें मुखत्यार पत्र आम्ही तुमच्या गैर वर्तणुकी मुळें आणि मजला कळल्या वरून मी तुमचे मुखत्यार पत्र रद्द केले आहे करितां तुम्ही दिलेल्या मुखत्यार पत्रा वरून कोणत्याही कोर्टांत कोणत्याही बाबदींत कोणता ही अर्ज वगैरे आमचे तर्फे करूं नये व दस्तैवज लिहून देउं नये व लिहून घेऊं नये आणि आमचे नांवे पैसा वगैरेचे बाबतीत हात घालूं नये. तसें न केल्यास कोणत्या ही बाबतींत मी जबाबदार नाहीं इतक्यावर तुम्हीं कराल तर तुमचेवर फौजदारी केली जाईल व शिवाय रुपये पंचवीस तुम्ही रोख नेले आहेत ते परत देऊन पावती द्यावी कळावें तारीख ९ माहे सप्टेंबर सन १८९३ इसवी.

(सही)

बक्तु वल्लद संभाजी पाटील घिरणीकर निशाणी खुद्द रंघ दस्तुर केशव बापुजी हिंगे.

### नोटीस.

हैदर अली वल्लद जाफरजी बोहरी, व इस्मायलजी हैदर अली बोहरी दुकान तालुके खामगांस जि० आकोले यांस

गणपतराव संभाजी पाटील घिरणीकर दुकान मलकापूर व खामगांव या दुकानचे मालक रखमाबाई मर्द गणपतराव पाटील राहाणार मौजे घिरणी तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणे तर्फे मुखत्यार भाउराव बाबाजी जपे याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी पोष्ट मार्फत नोटीस आह्मास दिली ती तारीख १ माहे सपटेंबर सन १८९३ इसवी रोजी पावली त्याचें उत्तर तुह्मास देण्यांत येतें कीं तुह्मी नोटीशींत जो मजकूर लिहिला तो सर्व तुमचा लबाडीचा आहे. आह्मी खामगांव येथील कोळ्याची जागा दिवाणी मुकदमा नंबर २७ सन १८८३ दरखास्त नंबर ६ सन १८८८ इसवी हारासांत घेतलेली आहे त्याजबद्दल सरटिफिकिट मिळालेलें आहे. तीच जागा आह्मी तुह्मास ४५०० साडेचार हजार रुपयास तारीख २९ माहे अक्टोबर सन १८९१ इसवी खरेदी सरटिफिकेटा प्रमाणें देऊन ताबाही जागेचा दिलेला आहे. सदर्हू रकमेंत रोख रुपये एक हजार देऊन बाकीचे साडेतीन हजार रुपयाबद्दल सदर्हू जागेचे ताबे गहाणखत तारीख २९ माहे अक्टोबर सन १८९१ इसवी रोजी तुह्मी सालबंदी बद्दल दिलेंले आहे. आह्मी जें खरेदीखत दिलें त्यांत अशी शर्त घातलेली आहे कीं त्या जागेवर आमचे कोणी वारस अगर भाऊबंद दावा करतील तर तो दावा रद्द आहे. त्याची जबाबदारी मी करीन, तुह्मास तोषीस लागू देणार नाहीं अशी आहे. त्या शर्ती कडेस तुह्मी लक्ष दिलें नाहीं असें वाटते करितां तुह्मास नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं तुमचेवर लक्ष्मणदास माधोदास मारवाडी शेवाराम मारवाडी दुकान खामगांव याणीं फिर्याद करून हुकूमनामा मिळविलेला आहे वगैरे मजकूर तुह्मी लिहिला त्याजबद्दल आह्मी कोणत्याही प्रकारचे जबाबदार नाहीं व आह्माशीं कोणत ही संबंध नाहीं, दुसरें तुह्मी दिलेले सालबंदी सातेचे ताबे गहाणखत प्रत्येक सालबंदीस रुपये पांचशे प्रमाणें देण्याबद्दल लिहून दिलेले त्या प्रमाणें तारीख १ जुलै सन १८९२ इसवी रोजी रुपये पाचशे तुमचे कडून येणे असून ते तारीख २४ मार्च सन १८९३ इसवी रोजी राजश्री नरसिंग दासजी शेट दुकान खामगांव यांचे मार्फत मिळालें परंतु ते मुदतीवर न मिळतां नंतर ८॥। पावणे नऊ महिन्यानीं मिळाले यास्तव दस्तैवजांतील शर्तीं प्रमाणें व्याजाचे रुपये ८७॥ साडे सत्यांशी येणे बाकी आहेत व ती हली सन १८९३ चे साल बंदीचा करार गुजरून गेला ते रुपये पांचशें ५०० आणि सदरचे मुदतीवर सवादोन माहेने झाले त्याचे व्याज रुपये २२॥ साडेबावीस एकूण रुपये साल मजकूरचे ५२२॥ पांचशे साडे बावीस आणि गुदस्त सालचे फक्त व्याजाबद्दल रुपये ८७॥ साडे सत्यांशी एकूण रुपये ६१० सहाशे दहा तुमचे कडे येणें आहेत ते नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसाचे आंत मलकापूर येथें आणून देऊन आमची पावती द्यावी तसे न केल्यास त्याबद्दल तुमचेवर दिवाणींत दावा करून या नोटिशीचे खर्चासह रकम भरून घेतली जाईल हें पक्के लक्षांत ठेवावें कळावें तारीख ९ माहे सपटेंबर सन १८९३ इ०

(सही) रुखमाबाई मर्द गणपतराव संभाजी पाटील तर्फे मुखत्यार भाऊराव बाबाजी जपे दुकान मलकापूर व खामगांव दस्तुर खुद्द.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस विनय पूर्वक खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं आह्मी भगवान वल्लद एको पाटील राहणार मानेगांव तालुका जळगांव जिल्हा आकोला याजला तारीख ८ माहे सपटेंबर सन १८९३ इसवी रोजी आमचे तर्फे कुलमुखत्यार पत्र करून दिलें होतें परंतु सदरील भगवान वल्लद एको पाटील हे मुखत्यारपत्राच्या योग्य नसल्या मुळें सदरचे करून दिलेलें मुखत्यारपत्र आह्मी रद्द केलें आहे यास्तव भगवान मजकूर याजला कोणत्याही बाबतींत पैसा अगर दस्तैवज वगैरे करून कोणीही देऊं नये अगर घेऊं नये. दिल्यास अगर घेतल्यास तो इकडून मान्य न होता नुकसानीचे जबाबदार आह्मी होणार नाहीं हें सर्वांस जाहिर होण्या करिता कळविलें आहे. कळावें तारीख ९ माहे सपटेंबर सन १८९३ इ० दस्तुर केशव बापूजी हिंगे.

सही-

बक्तु वल्लद संभाजी पाटील घिरणीकर निशाणी खुद्द रंघ.

## वर्तमानसार.

अमीरी दंड — काबुलाकडील एक व्यापारी राळेच्या थैल्यांत पुष्कळ जवाहीर घालून गुप्तपणें तें हिंदुस्थानांत आणित होता. पण त्याच्या दुर्दैवानें अमिरास ती बातमी कळून त्यानें त्यास पकडून काबूलास नेलें आणि त्यापासून ५०,००० रुपये दंड घेतला असें इंग्रजी पत्रांवरून समजतें.

टोळ — हे शेतांचा फडशा पाडून माणसांचा नाश करितात हें सर्व प्रसिद्ध आहे. पण नव्या अनुभावावरून ते अत्यंत विषारी आहेत असें समजतें. ते ज्या जमिनिवर बसतात ती जमीन विषारी होते, व तिच्यावरून गुरें गेलीं असतां त्यांस प्रथम ढास, नंतर हगवण लागते. आणि त्यापुढें त्यांचा शक्तिपात होतो असें मुझफरगडच्या डेप्युटी कमिशनरनें जी चौकशी आणि शोध केला, व त्याच्याच जवळच्या डेरा इस्माइलखान जिल्ह्यांतील लोकांस जो अनुभव आला त्यावरून स्पष्ट सिद्ध होतें.

राशिया हिरात घेणार अशी कंडी—राशियन सरकार पेंजदेह, साराक्स, आणि पुली खातूम ह्या ठिकाणांची तटबंदी करीत आहे, कारण त्याच्या मनांतून हिरात आपल्या ताब्यांत घ्यावयाचें आहे अशी समरकंद येथील तार व्हियेना येथील एका वजनदार पत्रांत प्रसिद्ध झाली आहे असें लंडनच्या तारेवरून समजतें.

सर्कीचें तेल, पेंड, व सर्पण— तीस वर्षांपूर्वीं दक्षिण अमेरिकेंत सरकी फुकट जात असत. पण अलीकडे सरक्यांचें तेल काढूं लागल्यापासून अमेरिकेंतील लोकांस अतिशय फायदा होत आहे. सर्कीच्या तेलाची १,६०,००,००० डालर, व पेंडीची ८०,००,००० डालर किंमत येते. याशिवाय सर्कीच्या टरफलांचें मुबलक सर्पण होतें. सर्कीची पेंड गुरांस खावयास फार पौष्टिक असून शिवाय ती खतासही अतिशय उपयोगी पडते. कापसांच्या झाडांचा आतां जाळण्याकडे उपयोग होतो, पण त्याचे कागद उत्तम होतात असें नव्या शोधांत ठरलें आहे. ह्या प्रमाणें शोधानें, उद्योगानें, आणि शहाणपणानें अमेरिकन लोक आपला फायदा करून घेत आहेत, आणि आमचे लोक आळसानें, हेंगलपणानें, आणि अविचारानें आपलें सर्वस्वी नुकसान करून घेत आहेत. दुर्दैवानें आह्मांस अशी मगरमिठी मारली आहे. शु. स.,

म्याट्रिक्युलेशन परीक्षेचे यंदाचे परीक्षकः—इंग्रजी—मेसर्स मॅक्मिलन, रेक्स, शार्प आणि वर्धांहि; संस्कृत— मि. धृव परशिअन— मि. मेहेरबान आगा; फ्रेंच— डाव्हर; गुजराथी—ऑ. मि. सेटलवाड; मराठी— मि. महाजनी; सिंदी—मि. — सेंटलूर; गणीत—मेसर्स दलाल, अपटे, नेने व संजाना; इतिहास भुगोल—मेसर्स पाध्ये व पादशाहा आणि सायन्स—मेसर्स भांडारकर व पेज.

—स्कूल फायनलचे परीक्षकः—इंग्रजी—मेसर्स राबर्टसन. ना. वि. गोखले व लेथिंग; गुजराथी—मेसर्स जमियतराम नानाभाई व दामूभाई डाह्याभाई मेहेता; मराठी—मेसर्स—रांघेकर व आगरकर; सिंधी—मि. मनसुखानी; बॉटनी—डा. कीर्तीकर व धारगळकर; फिजिक्स व केमिस्ट्री—मेसर्स दस्तूर व सेटना, गणीत—मेसर्स आठवले व करकरे, आणि इतिहास भुगोल मेसर्स करकऱ्या आणि पादशाहा.

जे हिंदुलोक दुग्यांत पकडले होते त्यांजपैकीं ९१ कैद्यांची चौकशी मि. वेब सेकंड प्रसिडेन्सी माजिस्ट्रेट यांजपुढें होऊन ते एकेक रुपया दंडावर सुटले.

गोरकपुरा कडील हिंदु लोकांना हत्यारें बाळगण्याचे परवाने होते ते रद्द करण्यांत आले.

नुकतेच अझमगड जवळील महमदाबाद येथें सुमारें शंभर हिंदु गृहस्थ भगवतगीतेचा पाठ ऐकत असता एक मुसलमान तहशिलदार जवळ आला, व त्यांना तुह्मी दंगेखोर मंडळी पैकीं आहां अशी धमकी दिली. आणि पुढील गोष्ट पुष्कळांस खरीही वाटणार नाहीं कीं, त्यानें त्यापैकीं कांहींना प्रत्येकीं पांच रुपये प्रमाणें दंड केला व बाकीच्यांना तीन तीन महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा दिली. सु. प

मुंबईचे गव्हरनरसाहेब दोन घोड्यांच्या गाडींत पत्नीसह बसून शहरांत चहूंकडे व विशेषें करून दंगा झालेल्या रस्त्यांनें फिरले व त्यावेळीं त्यांची गाडी रस्त्यानें जात असतां रस्त्यांत चहूंकडे हिंदु व मुसलमान या लोकांच्या झुंडीच्या झुंडी उभ्या असून त्यांणीं गव्हरनरांच्या गाडीवर पुष्पांचा वर्षाव करण्याचा झपाटा चालविला होता. रस्त्यावरच्या घरांतून व खिडक्यांतून बायका मुलेंही फुलें फेंकीत होती कित्येक ठिकाणीं तर गव्हरनरांच्या गाडीस उभी करून गव्हरनरांच्या गळ्यांत लोकांनीं माळाही घातल्या. एकंदरीनें त्यांच्या गाडीवर फुलांचा इतका वर्षाव झाला कीं गाडी वर फुलांनीं अगदीं भरून गेली.

पंधरा दिवसापूर्वीं जेथें हजारों लोकांची मोठ्या कडाक्याची मारामारी चालली असून हाडवैऱ्या प्रमाणें एकमेकांची डोकी फोडण्याचें काम चाललें होतें त्याच ठिकाणीं आज तेंच हिंदु व मुसलमानलोक अगदीं एकत्रपणानें एकमेकांत मिसळून दंग्याची शांतता झाल्याचा आनंद प्रदर्शित करण्याकरतां अशा रीतीनें आपल्यावर पुष्पवृष्टी करीत आहेत हें पाहून पाहाणारास व स्वता गव्हरनरांसही फार मोठा आनंद झाला.

मुंबईतल्या दंगेखोरांस शासन करण्याचा विधी आतां पुढील प्रमाणें चालूं झाला आहे:—

१. जुमामशिदीजवळ त्या शुक्रवारीं दंग्याचा आरंभ करणाऱ्या सहा मुसलमानांस कालच्या मागील शुक्रवारीं दोन दोन वर्षांची कैद झाली.

२. मेंडीबाजारातल्या दंगेखोरांतल्या १३ मुसलमानांस दोन दोन वर्षे कैद झाली. हे हिंदु देवळावर हल्ला करणारे होते. दुसऱ्या सातांस हिंदूस मारहाण केल्याबद्दल १८ महिने प्रमाणें शिक्षा झाली. व दुसऱ्या १७ स ६ महिने प्रमाणें झाली. मिळून शुक्रवारीं ४५ मुसलमान तुरुगांत गेले.

मुंबईच्या पोलिसाच्या खर्चापैकीं शेंकडा २५ टके सरकारनें व बाकी ७५ टके म्युनिसिपालिटीनें द्यावे असें स्टेट सेक्रेटरी यांनीं ठरविलें आहे. आतां जे २९० पोलिस जास्त ठेवण्याचें ठरलें त्यांत एक सुपरिंटेंडेंट एक इन्स्पेक्टर, तीन गोरे कान्स्टेबल, ३ जमादार, ११ हवालदार व २७१ शिपायी याप्रमाणें भरावयाचें आहेत.

८०० रुपये पगारापासूनचे पोलिस सुपरिंटेंन्डेन्ट हे सिविल सनदी नव्हत थर्ड क्लास सिविल आफिसर आहेत असें ठरविण्यात आले आहे.

आफ्रिकेंत जी एक इंग्रजी कंपनी गली आहे ती तिकडच्या एका राजाशी लढाई करण्याच्या बेतांत असून त्याकरतां पन्नास लाख रुपये खर्च होईल अता अदमास आहे ही रकम विलायत सरकाराकडून मिळावी. असे त्या कंपनीचें ह्मणणें आहे.

विलायतच्या शेतकीस धक्का बसल्यामुळें या सालीं त्या देशांत गव्हाची खरेदी जास्त होणार आहे. हिंदुस्थानच्या लोकांनीं पोटास पट्टा बांधून गहू न खाण्याचा निश्चय केला पाहिजे.

इंग्रजसरकार भुमध्य समुद्रांतील आपली लढाऊ सामोग्री जास्त वाढवीत आहे.

न्यूयार्कची ३ची तार सांगत्ये कीं, सोमवारीं मोठें तुफान होउन सुमारें ५०० माणसें पार झाली व किनाऱ्याचा पुष्कळ प्रांत उध्वस्त झाला.

फ्रेंचमजूर व इटालियनमजूर यांच्यात बेबनाव झाला आहे. ठा० अ०

गोरक्षणसभाचे मुसलमान सभासद—गोरक्षण संबंधानें बंगाल्यांत जी चळवळ चालू आहे ती पुष्कळ मुसलमानांना योग्य अशी वाटून ते त्या सभेचे सभासद होत आहेत हें ऐकून आम्हांस अतिशय आनंद होत आहे गोरक्षण करण्यांत जसें हिंदूंचें तसेंच मुसलमान शेतकऱ्यांचें अतिशय कल्याण आहे. टाइम्स् आफ् इंडिया सारख्या छांदिष्ट पत्रकर्त्यास ही बातमी ऐकून मरणप्राय दुःख होईल पण याला कोणाचा उपाय!

ईश्वरी चमत्कार—विलासपुराहून कांहीं अंतरावर एक लहानसें रान आहे. त्या रानांत एक झाड असून त्याच्या तीन फांद्या जवळ जवळ गेल्या आहेत. व त्यावर एक दगडी ठेविलली असून त्या दगडींत नेहमीं स्वच्छ पाणी भरलेलें असतें कोणी हा जाऊन तें पाणी पिऊन उरलेलें फेंकून दगडी ठेवतांक्षणींच पुन्हः ती स्वच्छ पाण्यानें भरून जातें. या प्रमाणें दिवसभर किती ही जरी पाणी सांडलें तरी दगडी तेथें ठेविली असतां पाणी येत जातें. ( श्रीदत्तात्रयाची कृपा दुसरें काय! ) याच प्रमाणें जेथें जेथें श्री० गु० द० यांचें स्थान आहे तेथें तेथें पाण्याचा मुळींच तोटा नाहीं.

गवत आणणार—आस्ट्रेलियांतील गवताची काडी बरीच जाड असते व कडक उन्हाळ्या मध्यें सुद्धां त्यांतून एक प्रकारचा गोड रस निघतो असें म्हणतात, म्हणून तिकडचें गवत हिंदुस्थानांत आणण्याचा विचार आहे न्या० सिं०

मि. एम्. पी. नाईटिंगेल ह्यांनीं अफू ओढण्याच्या संबंधाचा आपला एक वर्षाचा अनुभव एशिआटिक क्वार्टर्ली रिव्ह्यूंत लिहिला आहे. ते ह्मणतात जोहोर येथें चिनी लोकांत मी वागलों व मला असें दिसून आलें कीं, इस्पितळांतील शंभर उदाहरणें तपासल्यास अफू ओढण्यापासून त्यांना कांहीं इजा झाली नव्हती. उलट ह्या ओढण्यापासून ताप वगैरे इतर रोगांचा ही अमल त्या व्यसनी मनुष्यांवर चालत नाहीं व चिनांतील मजूर कडक उन्हांत जें इतर कोणाला होणार नाहीं असें काम करतात तें या वल्लीच्याच योगानें. अफूचा दम जास्त झाला तर झोंप लागते व पुनः जागा होतांच नवा दम अंगांत येतो. नाईटिंगेल ह्मणतात अफूबाज भांडखोर असतात हें खोटें. पुष्कळ दुःख झालें तरी तें त्याला सहन होतें व त्या वल्लीच्या आनंदांत त्यांना ब्रह्मानंद वाटतो.

मुंबई दंगे चालू आहेत. जिन्नस उधार देत नाहीं ह्मटल्याबद्दल एका वाण्याचें नाक एका मुसलमानानें कापलें. एक विड्या विकणारी औरत रस्त्यानें चालली असतां कांहीं लोकांनीं तिजवर हल्ला केला व बेशुद्ध स्थितींत तिला घरांत उचलून नेऊन तिची येथेच्छ विटंबना करून पुनः रस्त्यांत आणून टाकली ह्मणतात.

माश्यांच्या योगानें रोगाचा प्रसार फार होतो अशी समज आहे. माशा एका रोग्याच्या अंगावर बसल्या ह्मणजे त्यांच्या पायांस व पंखांस त्या रोगाचा स्पर्श होऊन कांहीं कण चिकटतात व त्या दुसऱ्या माणसाच्या अंगावर गेल्या ह्मणजे त्यास तो रोग होण्याचा संभव आहे.

टांकसाळींत रुप्याचें नाणें पाडण्याचें बंद केल्यानंतर सर्व बँकांचें मिळून दोन कोटी तीस लक्ष रुपयें किंमतीचें रुपें या देशांत आलें.

बटाटे जर कोणी पिकवील तर त्यांस सरकारांतून मदत मिळेल असें समजतें. मदतीकरितां ह्मणून पाच हजारांची रकम काढली आहे ह्मणतात.

सी. डी. आक्ट—पार्लमेंटचा ठराव झाल्यानंतर हिंदुस्थानांत चालू ठेवला याबद्दल लार्ड राबर्ट्स यांना पार्लमेंट जबाबदार धरणार आहे असें म्हणतात नाहींतर जे कोणी अपराधी असतील त्यांना दाखवून त्यांना चांगली कडक शिक्षा झाली पाहिजे.

साखरेवरील करोडागिरींत फेरफार मोगलाईतून इंग्रजींत जाणाऱ्या एकशेंवीस शेरांचे एक पल्ला बुरा, शौबाली, मगदुमी साखरेस पूर्वीं अनुक्रम ३।, ३, १। रुपया पडत असे तो आतां २, १।।।, १ रुपये याप्रमाणें व इंग्रजीतून मोगलाईत येणारे सफेत, व मैली साखरेस ५।।, ३। रुपये पडत असत, ते आतां २, १।।। याप्रमाणें करोडागिरी घेण्याचा ठराव झाल्याचें समजतें.

गोदावरीचे तटाकीं वसलेलें नासिक पुण्य क्षेत्र ही हिंदुस्थानची राजधानी करण्याजोगें शहर आहे. कारण, त्या ठिकाणीं बहुतेक सर्व ऋतूंत हवा चांगली असून पाण्याला कमतरता नाहीं व हवी तेवढी जागा तेथें असून हवा निर्दोष आहे. ह्या संबंधानें चौकशीच्या विचारांत औरंगजेब बादशाहा असतांना त्याचीही दृष्टी इकडेच वळली होती, असें सर जार्ज कॅम्बेल ह्मणतात.

हौस आफ कामन्स मध्यें ऐरिश होमरूल बिलाचें तिसरें वाचन होऊन तें पास झालें.

पुणें येथील सुताच्या व रेशमाच्या गिरणीच्या चिमणीचे आवाजानें आपल्यास त्रास होतो अशी मि. शटलवर्थ यांनीं फिर्याद केली होती त्या फिर्यादीची चौकशी सि. म्या. मि. डंकट. यांजपुढें होऊन गिरणीच्या म्यानेजरांस पांच रुपये दंड झाल्याचें समजतें!

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर " ० " १॥८
किरकोळ अंकास ..........................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .......०।

Single copy..................................4as

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over10... 4 as.
Repetition per line 3as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XVII AKOLA MONDAY 18 SEPTEMBER 1893 NO 37

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख १८ माहे सप्टेंबर सन १८९३ इ० अंक ३७

नोटीस.

नोटीस बेशमी सेखइस्माल वा। सेख कासम जात पादेशी पिंजारी राहणार मौजे पथरोट तालुके व जिल्हा इलिचपूर यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी माझा साक्षांत सासरा असतां तुमचा मुलगा नामे शेखअन्नु यासी तुह्मी माझें लग्न करून आज सरासरी १५ पंधरा सोळा वर्षें झालीं. त्यांत मी तुमचे घरीं सुमारें ३ तीन ४ चार वर्षें राहिलें. त्यानंतर तुह्मी व तुमचा मुलगा शेखअन्नु आपसांत बापलेंक मिळून सक्त भांडण केलें त्यामुळें तुमचा मुलगा कोणीकडे प्रवासांत निघून गेला ह्मणून तुह्मी मला माझे आईबापाचे स्वाधीन केलें. ते बिचारे गरीब असल्या मुळें त्यांच्याच खाण्यापिण्याची पंचाईत पडत असे. त्यांत तुह्मी मला काळांत १३ तेरावा महिना अणून घातले. असें करणें तुमच्या शिलास उचित नव्हतें, मग येथें आज सरासरी पूर्ण १० दहा वर्षें झालीं आहेत. माझा साक्षांत बंधु नामे शेखच्यांद ह्यानीं मजकरितां तुमचे नांवावर लोकांचें कर्ज काढून आज पर्यंत उदर निर्वाह करित आहे. माझे खाणेंपिणें वस्त्र वगैरे बद्दल दरसाल रुपये ५० लागतात. एकंदर दहा १० वर्षांचे खर्चा बद्दल रुपये ५०० झाले. ते आपण ज्यांचे त्यांना देऊन माझे नांदणुकीची व्यवस्था करून आपले घरीं घेऊन जावें. मी तुमच्या मुलास कोठें पाहात फिरूं! माझ्या आईबापानीं तर तुह्मालाच पाहून दिले ना. मला सुख सोहळा नाहीं. तर तुमच्या घरास काय आग लाऊ माझ्या नांदणुकीबद्दल मौजे पथरोट व कसबे अंजनगांव ब्राह्मणवाडा थडी ह्या ह्या ठिकाणीं कांहीं पंच लोक मिळून पंचाईत केली परंतु तुह्मी देवळीतलें बाघ कधींच पंचांत येऊन बसला नाहीं, व मनमोकळें भाषण केलें नाहीं. असें करणें तुह्माला शोभत नाहीं. ह्या बद्दलचे पंचनाम्याचे कागद माझा भाऊ नामे सेखच्यांद याजन जवळ लिहिलेले तारीख १२ आगष्ट सन १८९३ इ० चे आहेत. त्याबद्दल तुह्मीं आमची पुढें येत्या उरूसांत इलिचपूर येथें दुल्हारहेमानच्या दर्ग्यांत अखेर पंचाईत करणें आहे तर तुह्मी तेथें आलेच पाहिजे.

सांपत ही नोटीस पावल्या दिवसा पासून पंधरा १५ दिवसाचें आंत मुक्काम धूगांव तालुके उमरावती येथें सेखच्यांद पिंजारी याचे घरीं रुपये पांचशें ५०० व तुमचा मुलगा नामे सेखअन्नु यास घेऊन यावे. नंतर मला तुह्मी आपले घरीं घेऊन जावे. असें न झाल्यास मजकडे खर्च झालेली रकम देण्या पुरती माझे आई किंवा बंधू यांना तवढें सामर्थ्य नाहीं, आपण सर्वपरी जाणतें आहा; वर लिहिलेलें रुपये व माझा भ्रतार नामे सेखअन्नु याला आणलेच पाहिजे जर असें केलें नाहीं तर नोटिशीची मुदत संपल्यावर मी आपला दुसरा घरठाव करीन. मग मजवर तुमचा सासरेपणाचा हक्क व शेखअन्नूचा नवेरपणाचा हक्क बिलकूल राहणार नाहीं, व ह्या नोटिशीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख १०-९-९३ इ० दस्तुर जनार्दन गोपाळ गुरव राहणार धूगांव कसबें तालुके व जिल्हा उमरावती.

सही.
सहीची निशाणी मासुमबी मर्द
सेखअन्नु जात पिंजारी राहणार अंजनगाव हल्लीं
मुक्काम धूगांव ता०
उमरावती हिच्या
हातची बांगाडी
केली असे.

## जाहिरात

अकोले म्युनिसिपल कमेटीनें वऱ्हाड म्युनिसिपल कायदा १८८६ यांतील कलम ११६ (१) (ई) व (ग) आणि (२) अन्वयें स्पेशल सभेमध्यें धर्मशाळा, कसई बाजार, भाजीबाजार आणि प्रेतें पुरण्याच्या आणि जाळण्याच्या जागा यांची व्यवस्था आणि देखरेख ठेवण्या करितां केलेले नियम सदर्हू कलमांतील पोटकलम ३ प्रमाणें आलिशान रेसिडेंट साहेब यांणीं मंजूर केले आहेत ते म्युनिसिपल नियम ४८ प्रमाणें सर्वांच्या माहिती करितां प्रसिद्ध केले आहेत.

B. M. Sathe
आकोला ता. १२ सप्टेंबर १८९३ — सेक्रेटरी म्यु. कमिटी आकोला.

## धर्मशाळा

(१) कमिटीचे ताब्यांत असलेल्या सार्वजनिक धर्मशाळेचा उपयोग जे खरोखर प्रवाशी असतील त्या लोकांनींच करावा.

(२) मे. चेअरमन अथवा व्हाईस चेअरमन किंवा त्यांचे गैरहजरींत मे. कांसरव्हन्सी सुपरिंटेंडेंट अथवा सेक्रेटरी यांचे परवानगी वांचून प्रवाशांनीं धर्म शाळेंत ७२ तासापेक्षां ज्यास्तवेळ राहूंनये. वर सांगितलेल्या अधिकाऱ्यांनीं कमिटीचे मान्यतेवर योग्य अशा अटीवर सदर्हू धर्मशाळांचा ७२ तासांपेक्षां अधिक वेळ उपयोग करूं द्यावा.

(३) सदर्हू धर्मशाळा बंद करणें किंवा दुसऱ्या कामाकरितां त्यांचा उपयोग करणें या बद्दलचा अधिकार कमिटीनें आपलेकडेस ठेविला आहे.

(४) सांसर्गिक रोगानें व्याप्त किंवा वाईट रीतीनें वर्तन करणाऱ्या मनुष्यास मे. कान्सरव्हन्सी सुपरिंटेंडेंट यांच्या हुकूमाव रून का. इन्स्पेक्टर यांनीं सार्वजनीक धर्मशाळांतून काढून द्यावें.

(५) कमिटीच्या ताब्यांत असलेल्या धर्मशाळा कांन्सरव्हन्सी सुपरिंटेंडेंट यांच्या ताब्यांत रहातील आणि सदर्हु धर्मशाळेच्या स्वच्छतेबद्दल व्यवस्थे बद्दल आणि ह्या नियमाचे योग्य अंमलबारी बद्दल त्यांना मुख्यत्वें करून जबाबदार धरलें जाईल.

(६) धर्मशाळेंत जे कोणी घाण करतील किंवा बुद्ध्या कमिटीचे सामानाचें नुकसानी करतील ते त्यांच्यावर गुन्हा शाबीत झाल्यास पुढें दिलेल्या शिक्षेस पात्र होतील.

## कसई बाजार

१ मे. दिपुटी कमिशनर साहेब यांचे मंजुरातीनें कमिटीनें कसई बाजाराकरितां एक किंवा अधिक जागा वेळोवेळीं मुक्रर कराव्या.

२ सदर्हु बाजारांत खालीं दिलेले पदार्थ विक्रीकरितां आणावे.

(१) मनुष्य भक्षणास योग्य असें जनावरांचें मांस

(२) मासे. ताजे किंवा सुके

जे पदार्थ विक्रीकरितां योजिले नसतील ते बाजारांत आणूं नयेत.

३ बाजारांतील जागा दुकानदारांस नमूद करून दिल्या जातील. सदर्हू नमूद केलेल्या जागेंत दुकानदारानें आपलें दुकान लावावें कमिटीचे परवानगी वांचून चबुत्रा किंवा कोणतेही तऱ्हेचें बांधकाम करूं नये.

४ सकाळचें ४वाजे पासून रात्रीचे ९ वाजे पर्यंत कसई बाजार उघडे रहातील. व नंतर बंद केले जातील.

५ सांसर्गिक रोगांनें पीडलेले, भीक मागणारे किंवा वाईट रीतीनें वर्तन करणारे लोकांस कमिटीचे नोकरानें किंवा अंमलदारानें कसई बाजारांतून काढून द्यावें.

६ बाजारांत घाण करणारे किंवा कमिटीचे सामानाची नुकसानी जे कोणी मुद्दाम करितील ते त्यांचे विरुद्ध गुन्हा शाबीत झाल्यास पुढें दिलेल्या शिक्षेस पात्र होतील.

७ अकोले येथील सिविल सर्जन साहेब किंवा दवाखान्याचे मेडिकल आफिसर जे पदार्थ मनुष्य भक्षणास योग्य नाहींसे ठरवितील असे पदार्थ बाजारांत विक्री करितां आणल्यास ते जप्त केले जातील. व ते कमिटीचे अमलदारांचे हुकुमावरून नाश केले जातील किंवा त्यांची दुसरी योग्य व्यवस्था केली जाईल.

८ कसईबाजार कानसरव्हनसी सुपरिंटेंडेंट यांचे व्यवस्थे खालीं व व देखरेखे खालीं राहतील. व त्यांचे व्यवस्थे बद्दल स्वच्छते बद्दल आणि सदर्हू नियमाचे योग्य अमलबारी बद्दल त्यांना मुख्यत्वेंकरून जबाबदार धरलें जाईल.

## भाजीबाजार

१ मे. डेपूटी कमिशनर साहेब यांचे मंजुरातीनें कमिटीनें भाजीपाला फळफळावळ व फुलें विकण्याच्या जागा मुक्रर कराव्या

२ सर्दहू बाजारात फक्त खाली दिलेले पदार्थ विक्रीकरिता आणावे

(१) भाजी ताजी अथवा सुकी
(२) फळें व मुळें सदर
(३) केळीचीं व इतरपानें
(४) फुलें.

जे पदार्थ विक्रीकरितां योजिले नाहींत ते पदार्थ बाजारांत आणूं नयेत.

३ सदर्हू बाजारांतील जागा दुकानदारास नमूद करून दिल्या जातील. सदर्हू प्रमाणें मुक्रर केलेल्या जागेंत दुकानदारानें आपले दुकान लावावें. कमिटीचे परवानगी वांचून चबुत्रा किंवा कोणतेंही तऱ्हेचें बांधकाम करूं नये.

४ सकाळचे ४ वाजे पासून रात्रीचे ९ वाजे पर्यंत भाजीबाजार उघडे राहतील व नंतर बंद केले जातील.

५ सांक्रामिक रोगानें पीडलेले, भीक मागणारे किंवा वाईट रीतीनें वर्तन करणारे लोकांस सदर्हु बाजारांतुन कमिटीचे नोकरानें किंवा अंमलदारानें काढून द्यावें.

६ बाजारांत घाण करणारे किंवा कमिटीचे सामानाची नुकसानी जे कोणी मुद्दाम करितील ते तसें शाबीत झाल्यास पुढें दिलेल्या शिक्षेस पात्र होतील.

७ अकोले येथील सिवील सरजन साहेब किंवा धर्मार्थ दवाखान्यांतील मेडिकल आफिसर जे पदार्थ मनुष्याचे भक्षणास योग्य नाहींतसे ठरवितील ते पदार्थ बाजारांत विक्रीकरिता आणल्यास जप्त केले जातील व कमिटीचे अंमलदाराचे हुकुमा वरून नाश केले जातील किंवा दुसरी त्याची योग्य व्यवस्था केली जाईल.

८ भाजी बाजार कान्सरव्हन्सी सुपरिंटेंडंट यांचे व्यवस्थे खालीं व देखरेखी. खालीं रहातील व त्याचे व्यवस्थे बद्दल व स्वच्छते बद्दल आणि सर्द्ह नियमाचे योग्य अमलबारी बद्दल मुख्यत्वें करून त्यांना जबाबदार धरलें जाईल.

## प्रेतें पुरण्याच्या व जाळण्याच्या जागा.-

१ प्रेतें पुरण्याच्या आणि जाळण्याच्या सार्वजानिक जागा मे. डेपुटी कमिशनर साहेब यांचे मंजुरातीनें म्युनिसिपाल कमिटीनें वेळोवेळीं नमूद कराव्या.

२ म्युनिसिपाल कमिटीचे विशेष परवानगी वांचून नमूद केलेल्या जागे खेरीज इ;

तर कोणत्याही ठिकाणीं प्रेतें कोणीही पुरूं नयेत किंवा जाळूं नयेत.

३ प्रत्येक पुरलेलें प्रेत ६ फुटापेक्षां कमी नाहीं इतकें खोल पुरून तें पूर्णपणें मातीनें आच्छादिलें पाहिजे. अथवा जाळेंल तर राख होई पर्यंत जाळलें पाहिजे.

४ सार्वजानिक स्मशानभूमीचे हद्दींत कमिटीचें परवानगीं वांचुन एखादें थडगें किंवा स्मारक करण्याची मनाई आहे.

५ अशा जमिनीवर जे कोणी वाण करतील किंवा ती वरील कमिटीची प्रापर्टी, थडगें अथवा स्मारकाचें नुकसान कारतील ते अशाबद्दल माजिस्ट्रेट पुढें दोषीठरल्यास पुढे दिलेल्या शिक्षेस पात्र होतील.

६ स्मशानभूमी वरील देखरेख आणि व्यवस्था कान्सरव्हन्सी सुपारिटेंडेंट यांचे नजरे खालीं राहील. व ते सदर्हू जमिनीचे स्वच्छते बद्दल आणि ह्या नियमांचे अमलबारी बद्दल मुख्यत्वें करून जबाबदार धरले जातील.

## शिक्षा

सराई, कसाईबाजार, भाजीबाजार आणि प्रेतें पुरण्याच्या आणि जाळण्याच्या जागा या संबंधीं वर जे नियम सांगितले त्या प्रमाणें जे वागणार नाहींत ते तसें शाबीत झाल्यास ५० रुपये पर्यंत दंडास पात्र होतील

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध ८ शके १८१५

## स्टांप खात्याचा रिपोर्ट

सन १८९२।९३ सालच्या स्टांप खात्याकडील रिपोर्टाची एक प्रत आमचे कडेस दरसाल प्रमाणें आली आहे त्याबद्दल आह्मी आभारी आहों. मेहेरबान कर्नल लेन साहेब हेच ह्या वर्षींही स्टांप खात्याचे मुख्य अधिकारी होते. त्यांचे अनुभवा बद्दल व कार्यदक्षते बद्दल नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. आमचे वऱ्हाडांत इतर सुधारलेल्या प्रांता प्रमाणेंच नोंदणी, स्टॅंप, व जेलखात्यांतील कामें जीं आज मितीस सुरळीत व व्यवस्थित रीतीनें चालत आहेत तीं सर्व मे. लेन साहेब यांच्या कर्तबगारीची व कार्यपटुत्वाची साक्ष देत आहेत.

सन १८९२।९३ सालांत जनरल कोर्ट फी, हुंडी, पावती, नक्कल वगैरे सर्व स्टांपाचें उत्पन्न रकम रुपये ४३६७६०८९ झालें यांत फक्त कोर्टफीचें उत्पन्न ८८७१४६ ॥।= ३ आहे. या पैकीं एकंदर खर्च रुपये ९३३१३॥।= १ वजा जाता बाकीं निव्वळ सरकारचे तिजोरींत रकम रुपये ७८३४४६ ८=॥२ पडले. गुदस्त साल पेक्षां या सालीं सरकारास रकम रुपये ९३०९४ जास्त नफा आहे. दरसाल उत्पन्नाचें प्रमाण चढतें आहे. या सालीं गुदस्ता पेक्षां जनरल स्टांपाचें उत्पन्न सरासरी ६००० रुपयांनीं कमी आहे परंतु ती तूट कोर्टफी स्टांपानें भरून काढून सरकारास जास्त फायदा करून दिला आहे. जनरल स्टांपाची विक्री या सालीं कमी होण्याचें कारण विकपाणी चांगलें नसल्या मुळें लोकांस्थिती असावी तशी नव्हती; असें कारण मे० लेन साहेब यांणीं दिलें आहे पण तें अगदीं बरोबरच आहे असें आह्मांस वाटत नाहीं.

आकोला जिल्हा खेरीज करून इतर सर्व जिल्ह्यांत पावती स्टांपाची विक्री गुदस्ता पेक्षा कमी झाली; परंतु आकोला जिल्ह्यांत या स्टांपाचा फार खप झाल्या मुळें गेले सालापेक्षाही थोडेंसें उत्पन्न जास्तच झालें. या सालांत निव्वळ पावती स्टांपाचें उत्पन्न रुपये २२१६७॥ आहे हें पावतीचें उत्पन्न आकोला जिल्ह्यांत जास्त होण्याचें कारण सद्याचे व्यापारांत इसारा बद्दल जी रकम दिली जाते त्या करारास स्टांप लावलाच पाहिजे असें अ सल्यावरून जास्त झालें आहे. उमरावती जिल्ह्यांत अशा करारास तिकीट लावण्याकडेस बरेंच दुर्लक्ष झालें आहे. मे. लेन साहेब यांणीं स्वतः बाजारांत व पेठेंत जाऊन सदर्हु तिकिटें लावण्या बद्दल लोकांचा गैर समज झाला आहे किंवा कसें या बद्दल चौकशी करून सदर्हु कर कांहीं लोक मुद्दाम टाळतात असें शाबीत केलें आहे. तेथील कलेक्टर यांणीं योग्य कायदेशीर मार्गांचा उपयोग केला नाहीं या बद्दल त्यांस साधारणपणें दोष दिला आहे. खुद्द उमरावती येथील दिवाणी कोर्टांतही अशा प्रकारचें करार तिकीट लावल्या शिवाय दाखल होत असत व ते इन्स्पेक्टर जनरल साहेब सूचना करी पर्यंत अटकाविले जात नसत अशा बद्दल खुद्द रेसिडेंट साहेब यांणींही टिका केली आहे.

चालू सालांत हुंडी स्टांपाचें उत्पन्न रकम रुपये १५९९७॥= आहे. गुदस्तपेक्षां १६३५ रुपयांनीं कमी उत्पन्न असल्याचें कारण केवळ हंगाम वाईट व कापसाचे व धान्याचे व्यापाराची मंदी या शिवाय कांहीं दिसत नाहीं.

कोर्ट फी स्टांपाचें उत्पन्न रकम रुपये ४५२६७७॥।= आहे. गुदस्ता पेक्षां सदर्हु उत्पन्न ५६३१४ ॥।. जास्त आहे. फक्त एलिचपूर जिल्हा खेरीज करून इतर सर्व जिल्ह्यांत कोर्ट फी स्टांपाच्या विक्रीचें वाढतेंच प्रमाण आहे. उमरावती जिल्ह्यांत तर सदरहु उत्पन्न गुदस्त पेक्षा ३६३०६ रुपयांनीं जास्त आहे. हें कोर्टफी स्टांपाचें उत्पन्न वाढलें याचें कारण उमरावती व इतर जिल्ह्यांत दिवाणी फिर्यादी चालू सालांत फार दाखल झाल्या. सदर्हु आंकड्या वरून आह्मांस लोकांस तूर्त इतकेंच दाखविण्याचें आहे कीं आपण आपले कुळावर फिर्यादी करून सरकारच्या पिशव्या मात्र भरीत आहात व आपल्या पैशाचा चन्ना उडवीत आहात. लोकांनीं आपसांत आपले व्यवहाराचा निकाल केला असतां त्यांस कोर्टाची पायरी चढून त्रास सोसावा लागणार नाहीं व निरर्थक खर्च ही करावा लागणार नाहीं व येणें करून ते आ पसरून बसलेल्या पुष्कळ वाकिलांच्या कचाट्यांतून बचावले जातील व आपले व आपल्या देशबांधवांचेही हित करण्याचें श्रय घेतील. शिवाय सरकारासही या प्रसंगीं आम्हास इतकेंच सुचविणें आहे कीं त्यांस खरोखर आपल्या प्रजेच्या हिताची व कल्याणाची कळकळ असल्यास त्यांणीं लवाद कोर्टें स्थापन करून त्या मार्फत प्रजेस न्याय मिळण्या विषयींची तजवीज करावी व हें करणें सरकारच्या नीतीस व न्यायमत्तेस फारच भूषणावह होईल.

अर्जीचे कागदाचें उत्पन्न चालू सालांत रुपये १६३६ आहे या बद्दल आम्ही आपले विचार पूर्वींच कळविले आहेत करितां त्या बद्दल आवा जास्त उल्लेख या स्थळीं करण्याची आवश्यकता नाहीं.

मेहरबान लेन साहेब यांणीं वेळोवेळी स्टांप डिपो तपासले व लोकांस होणाऱ्या गैर सोयी पुष्कळ दूर केल्या या बद्दल प्रांतांतील सर्व प्रजा त्यांची फार ऋणी आहे.

---

(लिहून आलेला मजकूर)

संसार हा क्षणभंगुर, नश्वर, व दुखःमय आहे असें सर्वजण म्हणतात मात्र. परंतु त्यांची कृति उलट साक्ष देते. मनुष्य असा वागतो कीं तो जणू चिरकाल वाचणार आहे, त्याचा व्यापार शाश्वत स्वरूपाचा असतो आणि त्याची सुखाविषयीं अशा एवढी बळकट कीं जणू कांहीं दुःखाचा जगांतून अस्त होणार आहे. भगवद्भक्त कानीं कपाळीं आरडतात कीं जग हें मिथ्या आहे, संसार म्हणजे पाण्याचा बुडबुडा आहे आणि आयुष्य हें एक कांचेचें भांडें आहे. आणि आपण तर मिथ्या जगांतच अनुपम इंद्रियसुखें प्रत्यक्ष भोगतों, वर्षांचीं वर्षें संसारांत नांदतों, आणि महान विघ्नें आलीं व लढायांतून शस्त्रप्रहार, झाले बंदुकीचे गोळीबार लागले, आणि हाल्हाल यातना झाल्या तरी कांहीं काल पावेतो आपण भक्कम, मजबूत, व अभंग राहतो. तेव्हां आपण ऐकतो एक व कृतीनें दाखवितो निराळें. असा विपर्यास कां होतो बरें!

मनुष्यमात्र मर्त्य आहे तरी मरणाचा काल अनिश्चित असून आपल्या सत्ते बाहेर आहे. आज मरणें असंभवनीय नाहीं तसें आणखी शंभर पन्नास वर्षें जगणेंही असंभवनीय नाहीं. मार्कंडेय ऋषि घरदार न बांधता क्षणभंगुर संसार ह्मणून भविष्य कालची तजवीज न करितां जन्मल्या पासून युगांची युगें पहात आले तसें आपण कां वागूं नये; रिकामा खटाटोप कां करावा? मोरोपंतांनीं सांगितलेली वैकुंठ पेठ मोठी आहे तेव्हां तिचाच रस्ता कां धरू नये! म्हणजे क्षणांभगुरपणांतून आत्महत्येनें स्वतांस सोडवून घेऊन परमेश्वराच्या नांवानीं हुंडी आपण त्या पेठेंत कां पटवून घेऊं नये बरें! 'अजित नाम वदो भक्त्या मिसें' या वामन वाक्यावर विश्वास ठेवून आपण कितीही हीन, दीन, व खट असलो तरी खात्रीनें पापा पासून मुक्त होऊं आणि खात्रीनें आपली हुंडी पटवूं आणि मग आपण सायुज्यसदन कां न बवावें!

वरील कोड्याचा आम्हास एकाच मार्गानें उलगडा करण्याचे ठाऊक आहे. पुष्कळजण चुकतात ते असें कीं नश्वर भाग व शाश्वत भाग या दोहोंचा भेदाभेद फारसा लक्षांत घेतला जात नाहीं. उदाहरणार्थ, मातीचे हत्ती घोडे वगैरे करून शालिवाहना प्रमाणें आपण सैन्य तयार केलें आणि सृष्टीतील नियम प्रमाणें हत्ती घोडे वगैरें सर्व नाश पावले तरी त्यांचे मातीचें पूर्वरूप कांहीं नाहींसें होत नाहीं. त्या प्रमाणें ब्रह्म सत्य आहे आणि जगत् मिथ्या आहे असें ह्मणतात आणि त्याला रज्जु व सर्प यांचा दृष्टांत देतात परतु तो विचार बरोबर नाहीं. जगत् मिथ्या आहे म्हणजे एवढेंच कीं तें नाशिवत आहे ब्रह्मस्वरूपांत विकृति होऊन जगत हें निर्माण झालें तर हा विवर्त (रूपान्तर) लयास गेला तरी मूळ कारण जें ब्रह्म आहे तें कांहीं लयास जाऊं शकत नाहीं. तेव्हां जग हें कांहीं खोटें नाहीं. तें दृश्यमान आहे. इंद्रियगोचर वस्तुमात्र कांहीं कालानें रूपान्तर पावणार आहे म्हणून तें प्रस्तुत स्थितींत उपभोगक्षम नाहीं असें मानणें चुकीचें होय तद्वत् आपला संसार अस्तंगत होण्यास पात्र आहे म्हणून तो अस्तित्वांत आहे तो पावेतों आपणास त्याचा अनुभव घेतां येत नाहीं असें नाहीं. पदार्थमात्र कालानें विलय पावतात म्हणून त्यांचा उपयोग करू नये असें शहाणपण कोण सांगेल! घुशी, उंदीर, मुंगसें वगैरे बिळें करून घर जमीनदोस्त करितील म्हणून मोरोपंत कवीचा आम्ही हा प्रश्न करितों 'कां न सदन बांधावें?'

सारांश, संसार ही एक ईश्वरी अद्भुत देणगी आहे. तिचा यथावकाश, यथाशक्ति, व यथानुकूल्य आपण चांगला उपभोग घेतला पाहिजे. आणि आपल्या उपभोगाची दिशा अशी सन्मार्गानें असली पाहिजे कीं जेणें करून आपल्या देणगी देणाऱ्याचा म्हणजे त्या ईश्वराचा महिमा वाढेल आणि त्याची ती देणगी शाश्वतपणें जगावर राहील आणि हेंच मनुष्यमात्राचें मुख्य कर्तव्य आहे.

---

## राजा प्रजा आणि तिचें शिक्षण

(मागील अं. ब. पुढें चालूं)

आज पर्यंत हजारों शतकें लोटलीं असतील, पण तितक्या अवधींत पृथ्वीवर जेवढीं राष्ट्रें आहेत त्यां सर्वांमध्यें जेवढे ह्मणून नामांकित मनुकार होऊन गेले, जेवढे ह्मणून मोठाले मुत्सद्दी उत्पन्न झाले, जेवढे ह्मणून प्रचंड राजव्यवहारविशारद निर्माण झाले तेवढ्यांचेंही आमच्या मता प्रमाणेंच मत आहे असें लक्षांत आलें ह्मणजे आमच्या मताला दुजोरा आल्या सारखें वाटतें. रोम देशाचा इतिहास वाचून पहा ह्मणजे त्यामध्यें हेंच आढळून येईल. रोमचे ज्या वेळेस भरभराटीचे दिवस होते त्या वेळेस तेथल्या सरकारानें लोकांना शिक्षण देण्यासाठीं मोठाल्या तत्वज्ञानी उपदेशकांची योजना केली होती. बरें, इंग्लंडच्या इतिहासाकडे वळून पहा! त्यांत तरी हेंच आहे. ज्यांनीं आपला देश व आपले देशबांधव सोडून दिले, जे अफाट महासागर ओलांडून गेले, ज्यांनीं त्या सुखाच्या व आनंदाच्या स्थितीला लाथ मारली, जे अगदीं अनोळखी अशा अमेरिका खंडांत जाऊन तेथें रानांमध्यें जंगलां मध्यें, हिंस्त्र पशूंचे भय न बाळगतां वसाहती करून राहिले त्या बहादर प्युरिटन लोकांची गोष्ट ध्यानांत आणा. त्यांचें सर्वदां ह्मणणें हेंच असे कीं राजानें प्रजेला उत्तम शिक्षण दिलें पाहिजे. जग हें ईश्वराचें अवाढव्य घर आहे, असें त्यांना वाटत असे. व त्या घरात राहून त्याच्या समक्ष जर एखादें पाप आपल्या हातून घडलें तर

आपलें जिणें व्यर्थ असें तें समजत असत अहाहा! किती पोक्त व थोर विचार हे! त्याच प्युरिटन् लोकांनीं अमेरिकेंत वसाहती केल्यावर व तिकडे तिकडे स्थिरस्थावर झाल्यावर काय केलें? जसजशी प्रजोत्पत्ति वाढूं लागली तसतसा त्या प्रजेला शिक्षण देण्याचा त्यांनीं सपाटा चालविला. व त्याचेंच फळ आज जें पृथ्वीवर गाजत आहे तें 'युनाटेड् स्टेटस्' नांवाचें अमेरिकेंतलें राष्ट्र हें होय. ज्यानें एक निराळीच वसाहत स्थापन केली त्या पेन नांवाच्या सद्गृहस्थाचा लोकांना शिक्षण द्या हाच वारवार उपदेश असे. ज्यानें आपल्या देशाची परचक्रापासून सुटका केली त्या सुप्रसिद्ध वाशिंगटनानें लोकांना शिक्षण द्या हेंच आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेविलें होतें. लोकांना शिक्षण द्या हेंच त्या नामांकित जेफरसन नांवाच्या महात्म्यानें कंठशोष करून सांगणें असे. याच्या पेक्षां जास्त सबळ पुरावा कसला पाहिजे! फार कशाला आजपर्यंत हजारों युगें लोटलीं, शेकडोंशा उलाढाली झाल्या पण वर जें मत आह्मी निर्दिष्ट केलें आहे त्याला हरताळ लावणारा, स्वतंत्रता, व भूतदया व सत्यता याचा केवळ कट्टा अभिमानी ह्मणून नावाजलेला असा एखादा तरी ब्रह्मज्ञानी या पृथ्वीवरील दोन्ही गोलार्धांत तरी सांपडेल काय? इतकें असूनही जर एखादा कोणी वरच्या उलट मत प्रतिपादन करण्याचें धाडस करीत असेल तर शाबास त्याची. मगमात्र त्यानें एका नवीनच तत्वाचा शोध लावला ह्मणून त्याचें सर्व श्रेय त्यालाच दिलें पाहिजे. आजपर्यंत जे पंडित झाले ते केवळ खुळे होते असें ह्मटलें पाहिजे. कारण राज्य ह्मणजे काय, त्याचें स्वरूप काय, त्याचे उद्देश काय, वगैरे गोष्टींचें खरें खरें ज्ञान झालें नव्हतें. त्याचें ज्ञान इतके दिवस कोठेंसें दडून राहिलें होतें पण तें आज हुडकून काढल्याचें सारें फळ वरच्याच महा गृहस्थांना दिलें पाहिजे. त्यांना जो शोध लागला तो असा आहे. सरकार ह्मणजे एक फांशी चढविणारें आहे! त्याचें काम जबर व अब्रू घालविणाऱ्या अशा शिक्षा प्रजेला द्यावयाच्या! ह्मणजे कोणाचे हातपाय तोडावयाचे! कोणाचे डोळे काढावयाचे! मिठाचें पाणी लावून कोणाच्या अंगाचीं चामडीं सोलावयाचीं! कोणाला दगडानें ठेचावयाचें! ( पुढें चालूं )

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER, 18, 1893

## A FRANK CONFESSION

Among the important changes this week in the Educational Department is the appointment of Mr. Waman Raghunath Joshi to the temporary post of Deputy Educational Inspector Buldana during the six months' leave of Mr. B. N. Mudholkar. We certainly congratulate Mr. Joshi on his elevation. We also wish him success and permanency in his new career. Though we may be aware of some failures of the officer proceeding on this post we would gladly pass them over. In subordinate grades failures are overlooked by kind and generous officers. If such sympathy and appreciation are evinced by officers towards their subordinates in every department by whomsoever managed we cannot understand why our local contemporary should so invidiously bring forward as his most invulnerable weapons against one single individual a few years' disappointing results. Ten or even twelve years' brilliant results maintained by Mr. Aitkin in a school competing with another against all odds peculiar to a growing, advancing, and populated and wellcultured town are disgracefully set at defiance in consideration of a few years' bad results incidental to circumstances which will sooner or later be explained at full length in their due and proper time! But wisdom fails when self—interest works. This is no doubt a trite truth but we are often forced to draw consolation from the commonplace, insipid but useful truths! We call them insipid because they are often felt but never improved upon.

When a man is declared incompetent in any particular branch of service either in some foreign Department or in the Educational Department itself owing to the merciful and lenient construction which the Head of the Department puts on every thing connected with his subordinate promotion is sure to be forthcoming. But often a new principle once established is most rigorously adhered to. This was always an immense consolation to us whenever there were deviations from the till then footpath. But we frankly confess we cannot understand the principle on which this appointment was made. Some eight months ago on the demise of Mr. K. B. Palekar—may his soul rest in peace—the Deputy Educational Inspectorship of Ellichpur consequently vacant was conferred on Mr. G. R. Pitke B. A. whose active service in the Department extended to nealy three years. We till then erroneously believed that the line of the Inspecting Branch was reserved for the masters on the various Middle School establishments. We had discovered our error when Mr. Pitke was nominated to the vacancy. We thought graduates would be chosen to the posts ever after. Inspite of various things which we know but we do not like to publish, inspite of the public and solemn declaration of the Director of Public Instruction in his Annual report that Mr. Purshotam Ganesh Kelkar had fairly established his claims to a permanent Deputy educational Inspectorship, this out—of—way nomination almost surprised us. The surprise was still greater as the declaration came in the Educational report received 3 months before Mr. Pitke's first temporary appointment We then thought that the Director of public Instructions meant to open this Branch to the graduates whose number is fortunately ever increasing under him. Himself being a graduate and no non—Univrsity man like his predecessor Rao Bahadur Dandekar we thought he naturally meant to provide for better men if they could be had. All other Departments close their doors with perfect immunity on this poor class, nay are often afraid to secure its services. The Headmasters of both the High Schools are always anxious to have as many of it as possible. Baobahadur Jatar would like to have *a graduate or an L. L. B. if possible* for the first standard. We at least understand by his proviso that he will have such a man if he were willing to work hard and to acquiesce in all his ovrsights and supersessions meant to please all.

To turn to our point, this Department is exclusively narrow owing to the limited area of this province. Vacancies in this Deparment are always rare. If a new principle of selection were adopted every time on such few and rare occasions the miseries of the hopeful men vigorously serving here in this almost a colonial and hot province can never be too accurattely described. We sympathise with the few whose claims have been overlooked and whose hopes have been purely whimsically crushed. This is the only poor explanation we can present to the sufferers. We are at least equally earnest in congratulating Mr. Josi on his perferment. We end this with a frank confession that we can not make out the head and tail of the principle on which such high and responsible posts are filled up, from which, even selections are made to the highest place as they were once made and are likely to be made if an outsider were not brought in, this time.

---

The following is the descriptfon of the new system of excise introduced in Berar as an experimental measure. This is restricted at present to the Ellichpur District and the Amraoti Taluk:—

"The monopoly of manufacture and sale is granted to the person who guarantees to pay duty on the greatest number of gallons of spirit. The area of each contract is large, correspronding usually with the limits of a district, and the period of duration is three years The monopolist is selected by the local authorities and there is no public competition, but from the circumstances of the case only men of substance can afford to take a contract. The principal conditions of manufacture and sale are that all spirit must be distilled at the central distillery and must be distilled twice; that no spirit may be issued from a distillery of strength greater than 25o U. P. nor of strength below 60o U. P.; spirit issued ot strength above 60o U. P. and below 25o U. P. is charged with the duty on 25o U. P.; that the spirit sold at any shop must be derived exclusively from the authorized distillery or depots; that it must be pure and undiluted and only one or other of the two streugths above mentioned, and be sold within the fixed maxima price. And to protect the contractor from compitition from cheap imported liquor, the sale of foreign spirit of strength below 15o U. P. mithin the monopoly area is prohibited. One distillery, the property of Government, suffices for each district; it is kept in repair by the contractor who supplies his own plant. The number of shops is regulated by the Collector in accordance with local demand, and may vary from year to year. The contractor is bound to keep all shops irrespective of their situation adequately spupplied, and for these purposes he is required to mantain a minimum stock of liquor always in store. An Inspector on good pay resides at each distillery who tests the liquor before it is issued to the depots or shops. During transit from the ditillery to the depots the liquor is protected by a pass, must be carried by a prescribed route, and on arrival at its destination is again tested. The contractor is bound to maintain servants of his own for preventive purposes. And in addition to the special abkari establishment attached to each district, the superior officers of the administration, the Tahsildars, police officers and patels are all utilized and invested with various powers as abkari officers."

## PLEADERS EXAMINATION

1893.

Paper No 1.

Hindu and Mahomedan Law &c.

1 What exceptions are there to the rule of Hindu Law that a donee must be in existence at the time of the gift? What does Mayne say about gifts to a class of whom some cannot take?

2 Is a Hindu mother entitled to a share, and if so to what share on partition?

3 In what cases does an adoption devest an estate?

4 What conflict of opinion is there between the Madras, Bombay and Bengal Courts regarding the right of a coparcener to sell his share of the coparcenary property

5 Who are excluded from inheritance under Hindu law

6 Discuss "exclusion from inheritance" under Mahomedan Law

7 What does Mayne say about the order of succession in the case of property inherited by a female from a female

8 Under what circumstances may a grant of probate be revoked

(*a*) Under the Probate and administration act(V of 1891)

(*b*) Under the Succession act ( X of 1865 )

9 A dies having a widow, 3 grand sons by his deceased son B, 2 grand sons by his deceased daughter C, and 1 granddaughter by his deceased son D who will succeed to his property

(*a*) Under Hindu Law

(*b*) Under Mahomedan Law

(*c*) Under the Succession act (X of 1865)

10 A dies leaving a widow B, a brother C, a sister D, his widow's mother E and his widow's brother F. The widow B dies before distribution.

How will the estate be divided between C, D, E and F.

(*a*) Under Hindu Law

(*b*) Under Mahomedan Law

(*c*) Under the Succession act (X of 1865)

Marks 100 10 for each question with literty to the examiners to increase or decrease the marks for any question

Time allowed 3 hours

---

## वऱ्हाड.

हवामान— ह्या आठवड्यांत पाऊस पडतच आहे पाऊस आता कांहीं दिवस उघडेल तर उत्तम होईल आणि त्या प्रमाणें काल परवा पासून उघाडी होत आहे. कांहीं पिकें पिंगट पडूं लागलीं आहेत. गावांत ताप खोकला वगैरेचे तुरळक आजार अद्याप आहेतच.

रा. रा. बळवंत नरसिंह मुधोळकर हे सहा महिन्यांच्या फर्लोवर आजपासून जात असल्या मुळें त्यांच्या बुलढाण्याच्या डेपुटी इनस्पेक्टरच्या जागीं रा. रा वामन रघुनाथ जोशी प्रिन्सिपाल ट्रेनिंग कालेज यांस नेमिलें.

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार बी. ए. डायरेक्टर हे किरकोळ सात दिवसांच्या रजेवर गेल्या मंगळवारी पुण्यास गेले आहेत

नायब तहशिलदार लोकांच्या बदल्याः— मि. रामराव गोविंद नायब तहशिलदार यांस केळापूरास, मि. सेख मुनीर यांस केळापूराहून आकोटास. मि. मुरशोदोद्दिन यांस आकोटाहून मेहेकरास बदललें. व तसेंच जळगांवचे नायब तहासिलदार मि. महमद साहेब यांस उमरावतीस व त्यांचे जळगांवचे नायब तहसिलदारीचे जागेवर मि. दवलत ह्यावाजी देशमुख यांस नेमिलें.

पातुर शेखबाबू येथील एक गृहस्थ कळवितात कीं तेथें तीन महिन्या पुरते असलेले आक्टींग हास्पिटल असिस्टंट मीर अबदूल राहिमान यांस जातेवेळीं गेल्या मंगळवारीं त्यांच्या लोकप्रियते बद्दल गांवकऱ्यांनीं लायब्ररींत पानसुपारी दिली.

पातूरचे चिफ कानस्टेबल मीर ताहवर अली यांनीं बैल गाड्यांतून माल लूटणाऱ्या पैकीं चार वंजारीं पकडले आहेत.

डांका — सरकारी पोस्टल टांगा एका उतारू निशी कण्हेर गांवाहून वाशिमाकडे येत असतां वाटेंत लुटला गेला. डांकेखोरांनीं दोघा इसमांस जायबंद करून सोडलें आणि पोस्टाची थैली लांबविली. मोंगलाईच्या हद्दींत राहणारे हे चोरटे असावेत असा तर्क आहे.

---

## वर्तमानसार.

हिंदुस्थानचें हल्लाची जी स्थिती आहे ती हिंदु मुसलमानांनीं आपसांत भांडण्याची नसून त्यांणीं एकोप्यानें वागण्याची आहे. हिंदुस्थानांतल्या हिंदुधर्माचा नायनायटा करण्याकरितां एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत समशेर घेणाऱ्या बादशाहांचा काळ निघून जाऊन मुसलमानांस अटकेच्या पलीकडे हाकून लावण्याचा निश्चय करणाऱ्या शिवाजीचा काळही आज राहिला नाहीं. आज ते दोन्ही काळ नष्ट होऊन तिसराच एक पांढरा शुभ काळ आला आहे. व त्या काळाच्या हातांत कुराण किंवा वेद हें कांहीं एक नसून बायबल हें तिसरेंच आहे व हा नवा तिसरा काळ त्या जुन्या दोन्ही लोकांस बिन्दाताच्या अजगराप्रमाणें मिळून टाकून झाडास विळखा घालण्याकरतां जाण्याची तयारी करीत आहे. तेव्हां अशा स्थितींत हिंदु व मुसलमान हे जर आपसांत वैरभावान वागूं लागतील व संधी साधेल तेव्हां एकमेकांच्या शरिरांतले मांसाचे लचके काढण्यास प्रवर्तक होतील तर त्या दोघांपैकीं एकाचेंही यत्किंचित हिताहित न होतां त्या दोघांच्याही शरिरांतल्या रक्त मांसाचा निकाल होऊन हाडांचे पिंजरे मात्र शिलक राहतील, आणि तसें झालें ह्मणजे त्यांस पुनर्जन्म देण्याकरतां संधी पाहात बसलेल्या त्या वगळ्या तिसऱ्या काळास आपलें हित करून घेण्यास जागा होईल. दोघांतील सख्य न वाढतां बितुष्ट वाढण्याकरितां राजकर्त्यांच्या कित्येक लोकांचा जो उद्योग चालू आहे तो त्यांचा उद्योग आह्मां हिंदु मुसलमानांच्या फायद्याकरतां नसून त्यांच्या स्वतांच्या फायद्याकरतां आहे, पण त्यांची ती कृती हिंदु मुसलमानानी पक्की ध्यानांत अणून चेव येणारे लेख प्रसिद्ध करण्याचें बंद केलें पाहिजे. हिंदुस्थानांतले हिंदु मुसलमान एकदिलानें वागतील तर या चालू इंग्रजी राज्यपद्धतीचा फायदा घेऊन आपलें व आपल्या देशाचे ह्मणजे हिंदुस्थानचें हित करून घेण्यास त्यांस चांगली संधी सांपडेल, आणि ते तसं न वागतां जर यादवी करूं लागतील तर हिंदुस्थानची स्थिती अमेरिकेसारखी होण्यासही उशीर लागणार नाहीं. तेव्हां आमच्या हल्लींच्या मुसलमानांनीं आपल्या वंशजांच्या हिताकरतां तरी आपसांत तंटे करण्याचें सोडून गुण्यागोविंदाने राहावें हें चांगलें आहे.

मुंबईचा यंदाचा गोकुळाष्टमीचा गोविंदा फारच गमतीचा झाला. दरसाल थोडे कोकणी लोक मात्र हा गोविंदा नाचत असतात पण यंदा फारच आश्चर्य वाटण्या सारखा फार मोठा समाज जमून हा गोविंदा खेळला. एकंदर सुमारें चाळीस पन्नास हजार लोक वेगळाल्या आंगास गोविंदा नाचत होते. हे गोविंदा खेळणारे मेळे मुंबईशहरांतल्या सर्व रस्त्यांनीं म्हणजे गेल्या दंग्याच्यावेळी जे रस्ते प्रसिद्धीस आले त्या रस्त्यानाही मिरवत फिरत होतें, पण कोठे कोणत्या ही प्रकारची यत्किंचितही गडबड सडबड झाली नाहीं.

हा गोविंदा खेळणारा मेळा जेव्हां प्रसिद्ध जुमामशिदीजवळच्या रस्यावर आला तेव्हा तेथील मारुतीच्या देवळांतला मोठा नगारा त्या गोविंदा खेळणाऱ्यांनीं रस्त्यावर आणला आणि बडवरडव वडवडा असें ही प्रसिद्ध झालें आहे.

हिंदुस्थानांत असणारे इंग्रज लोकही आपसांत एकमेकांचे खून करूं लागले असें दिसतें. मुरादाबाद येथें एलियट नांवाचा एक सरकारी इंजनेर होता. हकीन नांवाचा एक साहेब त्याच्या हाताखालीं असि. इंजनेर होता उभयतांचें सख्य नव्हतें व त्या मुळें हकीन यास सरकारांतून बडतर्फ करण्याचा हुकूम झाला. त्या वरून तुझा चार्ज घेण्याकरतां ३० व्या तारखेस तुझ्या कामावर मी येणार आहे त्या वेळीं तूं तेथें हजर रहा असा एलियट यानें हकीन यास हुकूम पाठविला. हकीन हजर झाला व त्याच्याजवळ कामाच्या मापाचें बुक मागण्यांत आलें. हकीन याणें तें बुक एलियट याच्या हातांत न देतां जमिनीवर टाकलें. इलियट तें उचलण्या करतां खालीं वाकला त्या बरोबर हकीन याणें त्याच्या पाठींत पिस्तुलाची गोळी घातली. एलियट उठून पाहूं लागला तों दुसरीही गोळी सोडली, त्या मुळें एलियट जमिनीवर पडला असें पाहून हकीन याणे तिसरी गोळी घालून त्यास ठार केलें व तो आपल्या बंगल्यांत निघून गेला नंतर शिपायी प्यादे घेऊन त्यांणी त्यास कैद केलें व विचारपूस करतां जो माझ्या वाटेस जाणार नाहीं त्यास मजकडूनही कांहीं उपद्रव होणार नाहीं असें त्याणे उत्तर दिलें पुढील विधी रीतीप्रमाणें होईलच, पण आमच्या ?र राजसत्ता चालविणाऱ्याच्या या कृती पाहून फार वाईट वाटतें.

सक्कर येथील हिंदुस्त्रियांनीं दिवे तयार करून नदींत सोडण्याचा नुकताच समारंभ केला असतां कित्येक आडदांड मुसलमानांनीं त्या दिवे सोडणारांच्या समक्ष ते दिवे घेऊन त्यांतील तेल आपल्या जोड्यास लावलें! पोलिसानें त्यांतील पाच मुसलमान कैद केले व त्यांच्यापासून चांगल्या वर्तणूकीचे जामीन घेण्याचें ठरविलें.

सयाम व फ्रेंच यांच्या प्रांतांच्या दरम्यानच्या संस्थानच्या बाबतींत फ्रान्स व इंग्लंड यांच्या दरम्यान कांहीं संगमन झालें आहे असें दिसतें.

रशियानें भूमध्यसमुद्रांत जीं नवीं लढाऊ गलबतें रवाना केलीं तीं टोलन येथें दाखल झालीं.

आफ्रिकेंत गेलेली इंग्रजकंपनी सरकारच्या परवानगीनेच फौज वाढवीत आहे असें मि. ग्लडस्टन यांणीं सांगितलें. ठा०अ०

रशियन लोकांच्या मनांत लौकरच हिरात घ्यावयाचें आहे असें कळतें.

मुंबईच्या दंग्याबद्दल पार्लमेंटमध्यें प्रश्न विचारले होते तेव्हां हिंदुस्थान सरकाराकडून सर्व रिपोर्ट मागवावा व या सर्व दंग्याचें कारण काय असावें असेंही कळविण्यास सांगितलें आहे.

मुंबईतील दंग्याचें कारणः— कलकत्ता स्टेटसमन् पत्राचा बातमीदार त्या पत्राम असें कळवितो कीं दिल्हीहून ४ मौलवी मुंबईस आले व त्यांनीं आपल्या लोकांचीं मनें दंग्यास उद्युक्त करावयास आरंभ केला व जेव्हां त्यांचीं मनें क्षोभ पावलीं असें दिसलें तेव्हां ते चार मौलवी बायकांचा पोशाख करून परत दिल्हीस गेले व ते अद्याप लपून बसले आहेत याचप्रमाणें त्यांनीं दिल्हीस केलें होतें असें ह्मणतात खरें खोटें कांहींच समजत नाहीं.

७०० वर्षां पूर्वीं इजिप्त मध्यें हात व पाय केलेले वापरण्यांत येत होतें. हें बहुतेक पाद्रीलोक करीत होतें.

नेटिव कलेक्टरः— अनंतपुर येथें मि. मनदेव राजा यास तेथील कलेक्टर नेमिलें हें कळविण्यास आह्मांस फार संतोष वाटतो.

सु० प०

अमिरास देण्यासाठीं हिंदुस्थान सरकारानें दोन उत्तम जातीचे अरबी घोडे घेतले, ते ड्युरांड मिशन बरोबर पाठविण्यासाठीं पेशावरास येऊन दाखल झाले ह्या शिवाय अमिरास देण्यासाठीं पुष्कळ बहुमोल जिनसा तयार झाल्या आहेत. पैसा हिंदुस्थानचा खर्चास असल्यावर अमिराचे कोड कौतुक पुरविण्यासाठीं कामगारांनीं कां कमी करावें!

अमिराच्या राज्यांत जगदळक येथें माणकांची खाण सांपडली आहे. तींतलीं एक शेरभर माणकें अमिरानें आपल्या कलकत्ता येथील एजंटाकडे विकावयासाठीं पाठविलीं आहेत.

यंदा अमेरिकेंत ६७ लक्ष गठ्ठे कापूस होईल असें तिकडील सरकारी माहिती वरून समजतें. शु. सू.

स्पेनमध्यें टिंटो नांवाची नदी आहे, तिचे पाणी हळदीसारखें पिंवळें आहे. त्यांतील वाळूचा थोडे दिवसांत दगड होतो. जर त्या नदींत एक लहानसा दगड टाकला व तो दुसऱ्या दगडावर जाऊन बसला तर दोन्ही दगडांचा थोडे दिवसांत एक जीव होऊन एक मोठा दगड बनतो. त्या नदीच्या काठीं असलेली सगळी झाडें झडपें सुकून जातात. त्या नदींत आलेली झाडांची पानेंफुलेंही पिवळ्या रंगाची बनतात. या नदींत मासे मुळींच नाहींत.

रायचूर येथें एक म्हैसूरच्या ब्राह्मणानें दोन मुसलमानाच्या व एक बेरडाची अशा ३ मुली सुमारें १०।१२ दिवसांखालीं आणून, त्या आपल्याच आहेत असें सांगून त्यापैकीं एक मुसलमानाची थोरली मुलगी तेथील आनंदराव दिवाणी कारकून यांस ११०० रुपयांस विकली, व धाकटी ९०० रुपयांस तेथील करोडीगरा कारकुनास विकली. पुढें त्या ब्राह्मणाच्या नव्हेत असें ठरल्यावरून त्या मुली विकणाऱ्यावर खटला चालूं आहे असें समजतें.

रेल्वेंतून जाणारा माल लुटणारी एक नवी मंडळी पुनः इस्टर्न बंगाल रेल्वेवर सांपडली आहे. क. त.

हवेंत किल्ला बांधलेला कोणी ऐकिला नाहीं आणि इंग्रजी ह्मण ज्याला माहीत असेल तो तर ह्मणेल कीं हवेंत किल्ला बांधावयाचा ह्मणजे आपलें हवेंतलें मनोराज्य करावयाचें परंतु तसला किल्लाही आपल्या डोळ्यानीं लवकरच पहावयाला सांपडेल असें पाश्चात्यांच्या दीर्घ प्रयत्नावरून दिसतें जर्मनीमध्यें हल्लींच्या विमानाच्या युक्तीची सुधारणा करून असा एक किल्ला उभा करण्याचा एका शोधकाचा प्रयत्न चालला आहे एक कायमचें विमान करून ते हवेंत ५००० फुटांवर उभे करायचें, जहाजाच्या नांगरासारखा नांगर सोडून ते हवेंत तरतें राहील परंतु फिरणार नाहीं असा बंदोबस्त केला आहे यावर खालील सृष्टीचा चमत्कार पहातां येण्या सारख्या जागा केल्या असून वर जाण्या करितां खालीं विमानें तयार ठेविली आहेत यामुळें पाहिजे त्यानें वर जाऊन मजा पाहून यावें हें सर्व तयार झाल्यावर ही एक उत्तमाची बाब होणार असून लष्करी कामाकरितांही याचा चांगला उपयोग होइल. खा० वि०

युरोपियन स्टेशन मास्तरास ठोशांचा मार— मनमाड येथील दिवस पाळीचें स्टेशन मास्तर मि० उईलएम पाटर हे स्वभावानें चांगलें नसल्या बद्दल पुष्कळ गिला झाला आहे. ते तारीख २ ला सकाळीं प्लाट फार्मवर काम करीत असतां टेलिग्राफ इन्स्पेक्टरचा १७ वर्षांचा मुलगा गाडींतून उतरला त्या बरोबर मास्तरनें अद्वातद्वा बोलून त्यास एक ठोसा मारला, व त्यावर फूल तोडल्याचा आळ घातला. हें त्या मुलास सहन न होऊन त्यानें मास्तरच्या तोंडावर व नाकावर धांव घांवून ठोसे मारले व त्यांस रक्त बंबाळ केलें. ही मारामारी चालली असतां हमाल, पॉर्टर, पोलिस, हदीवोले अथवा दुसरे कोणीही धांवून गेले नाहींत. मात्र सोल्जरानें मुलावर चाल केली, तेव्हां तो मुलगा तेथून पळाला हें प्रकरण कोर्टांत जाईल व साहेब लोकांत बरीच चळवळ होईल असें ह्मणतात. दी. बं.

---

आति आनंदकारक जाहीर खबर.

सर्वत्र लहान थोर वऱ्हाडी व इतर लोकांस या आनंदकारक बातमीनें कळविलें जातें कीं मौजे विरणी तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणा येथील रा. रा. गणपतराव वा. संभाजी पाटील ह्यांचा मोठ्या क्रूरतेनें खून झाला याजबद्दल सर्वांस माहिती आहेच. परंतु दुःखांत सुख त्यांच्या मागे राहिलेल्या माणसांस हेंच कीं परमेश्वरकृपेनें त्यांची बायको नामें नबाबाई ही गरोदर होती. व आज सुमारें वीस बावीस दिवस झाले. नबाबाई प्रसूत होऊन पुत्र झाला ही मोठी आनंदाची व ईश्वरकृपेची गोष्ट झाली. कैलासवासी गणपतराव संभाजी पाटील हे मोठे मर्द, व नामांकित, व संपन्न होते. यांची सर्वांस माहिती आहेच मेहेरबान रेसिडेंट साहेब, कमिशनर साहेब ज्युडिशिअल कमिशनर, सानिटरी कमिशनर साहेब जिल्हेचे डेपुटी कमिशनर व त्यांच्या हाता खालील सर्व दर्जाचे लहान मोठे कामगार व सर्व शेट साहुकार, गृहस्थ, वगैरे सर्वांस हे माहित होते एवढेंच नाहीं तर बहुतेक सर्वांचा चांगला परिचय होता हें सर्वांस कळावें.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर " • " १।८
किरकोळ अंकास ........................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस •१०६
दुसरे खेपेस .......•१

Single copy ...........................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over10... 4 as.
Repetition per line 3as.

VOL. XVII | AKOLA MONDAY 25 SEPTEMBER 1893 | NO 38

वर्ष २७ | आकोला सोमवार तारीख २५ माहे सप्टेंबर सन १८९३ इ० | अंक ३८

## नोटीस.

नोटीस बेशर्म. मोहनलाल गंगादीन कलाल राहणार छावणी परतवाडों जिल्हा इलीचपूर यास– ठिकाणा परतवाडा छोटा बजार खालीं सही करणार या- जकडून नोटीस देण्यांत येतें कीं छावणी इंगोलीचा मक्ता सन १८९२ सुरू जानेवारी ते सन १८९३ अखेर मार्च पर्यंत पंधरा महिन्यांचा मक्ता तुमचे आमचे निमे निमे शराकतींत घेतला व सरकारांतही उभयतांचीं नांवें दाखल आहेत. मक्त्याची मुदतही पुरी होऊन साहा महिने झाले आपणास पु- ष्कळ वेळां हिशोब करून नफा नुक- सानीचा एकंदर हिशोब देण्याकारितां तुह्मास ह्मटलें असतां आजपर्यंत हिशोब ही केला नाहीं व पेशगीबद्दल ऐन रक- म रुपये २५०० तुह्मापाशीं आनामत असून तेही आजपर्यंत दिले नाहीं क- रितां आपल्यास पोष्ट मार्फत नोटीस दिली असून जबाब दिला नाहीं सबब आपणांस या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं मक्त्याबद्दल एकंदर सर्व हिशोब व वर लिहिलेली पेशगीची रक- म असलेली तेही तुह्मी आठ दिवसांचे आंत येऊन आमची जी बाकी आप- णाकडे निघेल ती आह्मास देऊन आमची रसीद घ्यावी या प्रमाणें तुम- चे कडून न झाल्यास तुमचेवर कोर्टमार्फत तजवीज करणें भाग पडेल. त्याचा सर्व नोटिसीचे खर्चा सुद्धां पैसा तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख १८।९।९३ इ०

सही.

आजोध्या प्रसाद लालमण
कलाल छावणी इंगोली
दस्तूर खुद्द

## शिक्षण पद्धति.

### ( इतिहास )

चवथ्या इयत्ते पासून इतिहास शिक्षणाला आरंभ होतो. तिसरी इयत्ता पासहोऊन मुलें चवथ्या इयत्तेंत आल्यावर प्रथम दिवशीं त्यांच्या पाशीं इतिहासाचीं पुस्तकें नसतात. जरी पुस्तकें असलीं, तरी पूर्व दिवशीं त्यांतून धडा नेमून दिलेला नसतो या कारणानें त्या दिवशीं वेळापत्रकांत इतिहासा करितां जो वेळ नेमून दिलेला असतो, त्या वेळांत कांहींच काम होतनाहीं. शिक्षक इमानी, वेळच्या वेळीं काम करणारा असा असला तर तो प्रथम दिवशीं देखील मुलां कडून इतिहासाचे पुस्तकाचें एक पान वाचून घेईल, आणि तें मुलांस चांगलें समजावून देईल. दुसरे दिवशीं त्यांतून मुलांस प्रश्न विचारून पुढील पान वाचवून समजावील अशा रीती- नें इमानी शिक्षक" शनैः पंथाः शनैः पंथाः" या न्यायानें सावकास परंतु चांगलें काम करील. इतर शिक्षकांची रीत ह्मटली ह्मणजे परीक्षा झाल्यावर कित्येक दिवस पर्यंत ते आपला वेळ आळसांत घालवितात. याच वेळीं ते स्वदेशीं किंवा इष्टमित्रांच्या भेटी करितां जावयाचें असल्यास रजा घेतात. इतक्यांत कोणी विचारलें कीं, परीक्षा होऊन दोन महिने झाले तरी अद्याप अभ्यास कांहींच झाला नाहीं, असें कां? तर ते लागलेच ह्मणतात कीं लोक गरीब असल्या कारणानें नवीन पुस्तकें विकत घ्यावयास फार वेळ लागला, शिवाय मी रजेवर गेलों होतो. हें उत्तर सयुक्तिक असल्यामुळें विचारणारा स्तब्ध होतो.

वास्तविक पाहतां मुलें वरच्या वर्गांत गेल्यावर कांहीं दिवस पर्यंत त्यांस मोठा उत्साह वाटतो. "वस्तू वाटे नवी जो –इ." या अन्योक्ती प्रमाणें, पुस्तक नवें, स्थळ नवें शिक्षक नवा, या सर्व गोष्टी बद्दल त्यांस कौतुक वाटत असतें मुलांमध्यें हा उत्साह जागृत आहे तो पर्यंत, शिक्षक त्यांस जें जें सांगतो तें तें मन लावून ऐकतात त्याच्या आज्ञेंत राहतात आणि तो वळवील तशीं व- ळतात. मुलांमध्यें जर एखाद्या चांगल्या संव- यीचा प्रचार सुरू करावयाचा असेल, तर त्यांस हीच संधी उत्तम होय. आईबाप ग- रीब असले किंवा नेहमीं लवकर फी वसूल होत नसली, तरी या वेळां करितां व नवीन पुस्तकां करितां पैसे लवकर वसूल होतात, असा अनुभव आहे. तात्पर्य, जे शिक्षक ही अमोलिक संधी वाया घालवितात ते आपलें व मुलांचें अति नुकसान करितात, असें ह्म- णावें लागतें.

ही प्रस्तावना येथेंच पुरी करून आरं- भीं यत्किंचितही वेळ वाया न घालवितां आपलें काम मोठ्या उत्साहानें एकदम सुरूं करावें अशी शिक्षकांस प्रार्थना करून आज- चा विषय इतिहास कसा शिकवावा हें य- थामति दाखवितों. शिक्षणाचें व्याख्यान प- द्धति आणि प्रश्नोत्तर - पद्धति असे मु- ख्य दोन मार्ग आहेत. त्या पैकीं व्याख्यान पद्धतीनें कालेजांत शिक्षण होतें. खालच्या प्रतीच्या शाळांतून व्याख्यानपद्धतीचा फार- सा उपयोग होत नाहीं तेथें प्रश्नोत्तर - प- द्धतीनेंच शिकविलें पाहिजे. इतिहासास आ- रंभ करितांना मी याच पद्धतीचा उपयोग केला आहे.

गु०— तूं आज लिहिलेली पुस्ती इकडे आण पाहूं. ( मुलानें पुस्ती आणल्यावर ) अरे, या पुस्तीवर आजची तारीख कां रे नाहीं लिहिली? आतां येथें तारीख लिही. ( मुलानें तारीख लिहिली ती – तारीख १० सप्टेंबर १८९३. ) मुला, तारीख १० सप्टेंबर असें जें तूं येथें लिहिलें आहेस त्याचा अर्थ तुला समजला आहेना!

वि०— होय, गुरुजी. वर्षाचे महिने बारा त्यां पैकीं हल्लीं सप्टेंबर महिना असून त्यांतील नऊ दिवस झाले. आजचा दिवस सप्टेंबर महिन्यांतला दहावा होय,

गु०— १८९३ हें काय!

वि०— १८९३ हें काय आहे, तें मला ठाऊक नाहीं. इतकें मात्र मला ठाऊक आहे, कीं दिसेंबर पर्यंत बारा महिने झाले, ह्मण- जे जानेवारी महिना पुन्हां सुरू होतो, तेव्हां पूर्वी १८९२ असेल तर जानेवा रीच्या पहिल्या तारखे पासून १८९३ ह्मणा वयाचें.

गु०—ठीक. या प्रमाणें प्रत्येक जानेवारींत एक वाढतां वाढतां मागील जानेवारींत १८९३ झालें, हें तुला समजलें. अशा रीतीनें जाने वारी महिना १८९१ वेळां होऊन गेला, हें तुला समजतें ना!

वि०— होय गुरुजी. जसा जानेवारी १८९३ वेळां होऊन गेला, तसा फेब्रुआरी मार्च वगैरे प्रत्येक महिना १८९३ वेळां होऊन गेला, असें होतें.

गु०— शाबास; ही तारीख लिहिण्याची रीत इंग्रजी आहे. आपले लोक गहाणखत कीर्दिखतावणी, कर्जरोखा, खानगीपत्रें वगैरे लिहितांना नुसती तारीखच लिहितात काय!

वी०— नाहीं, गुरुजी. तिसऱ्या पुस्तकांत गहाणखताचा आणि खानगीपत्राचा नमुना दिला आहे त्यांत मित्ती देखील लिहिली आहे. पु. चा.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध १५ शक १८१५

## हिंदु मुसलमानांची मैत्री.

हिंदु व मुसलमान या मध्यें मैत्री असली पाहिजे हें इंग्रजी राज्य आल्या पासूनच वाटूं लागलें असें नाहीं किंबहुना इंग्रजीच्या पूर्वी कित्येक शतकें हा मित्रभाव नव्हता ह्मणूनच इंग्रजी राज्याची संस्थापना झाली. मुळा पा- सून ही मैत्री कशी व्हावी हा प्रश्न होता. इंग्रजीच्या पूर्वी हा प्रश्न निकालास लागला नाहीं तरी चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिआ यांच्या राज्यांत या प्रश्नाचा खुलासा होईल अशी आशा वाटूं लागली आहे इतकेंच ना- हीं तर कांहीं निमित्त मात्रा पुरतीं मित्रभाव नसण्याचीं कारणें अवशिष्ट राहिलीं आहेत तीं दूर होतील तर हिंदू मुसलमानांची मैत्री बनलीच आहे असें आह्मी पक्केपणीं समजतों. इंग्रजी राज्याच्या काळांत हिंदुमुसलमानांची- च मैत्री काय पण या देशांत 'नेटीव' या अतिव्यापक संज्ञेखालीं येणाऱ्या प्रजासमूहा- च्या मैत्रीचा योग येत चालला आहे. इंडिया तील जनसमूच्चयास एक राष्ट्रीयत्व येण्याचा संभव असेल तर तो काळ प्रस्तुतच्या राज्य- कर्त्यांखालीं आला आहे. आणि इंग्रजी रा- ज्याच्या मजबूतीवर व चिरस्थायीपणावर हें एकराष्ट्रत्व निभावणार आहे.

हिंदू मुसलमानांची मैत्री न होण्यास जीं कारणें आहेत तीं केवळ नामशेष आहेत असें आह्मीं ह्मणतों. हिंदू व मुसलमान ऐक्यभा- वानें वागले नाहींत तर परस्परच ते आत्मघा- तक होतात हें राष्ट्रीय सभेच्या मंडपांत ज- मत असलेल्या हिंदूमुसलमानांनीं आपल्या शहाणपणाच्या वर्तनानें सर्व जगास विदित केलेंच आहे. इसापनीतींतील मांजरापमाणें सर्व खवा हातांत घेऊन गिळंकृत करणाऱ्या राज्यकर्त्यांसमोर आम्ही हिंदूमुसलमानांनीं मित्रभावानें जोडगोळीचा सामना केला पाहिजे असें प्रस्तुत चाललेला जीवनकलह स्पष्टपणें शिकवीत आहे, आणि कालमाहिमा असा विलक्षण आहे कीं हा धडा आपण मुकाट्यानें न कळत शिकत आहों. लाभा- लाभाच्या गोष्टींत, राजकीय प्रकरणांत, राज्यकारभाराच्या प्रकरणांत 'राष्टीय सभेनें हिंदूमुसलमानच काय पण सर्व देशहितवाले नेटीव लोक एका राष्ट्रत्वाला पोंचविले आहेत.

तेव्हां आपसांत यादवी माजवून आत्म- क्षय करून घेण्या पुरती हिंदुमुसलमानामध्यें मैत्री न होण्याचीं कारणें उरलीं आहेत. हीं कारणें नामशेष आहेत ह्मणजे पूर्वी प्रमाणें त्यांचें यथार्थ स्वरूप राहिलें नाहीं, आणि हिंदुमुसलमानांतील वरिष्ट वर्गांच्या लोकांनीं जो मित्रभाव फैलावला आहे त्या मुळें बहुतेक वैमनस्याच्या नाड्या तुटल्या सारख्याच झाल्या आहेत. ज्यांस सुशिक्षण मिळालें नाहीं, ज्यांची धर्मश्रद्धा आंधळी, हेकेखोरपणा- ची व दुराग्रहाची आहे, आणि जे आळशी, उद्योगपराङ्मुख, व कालक्षय करणारे आहेत त्या त्या हिंदूनां व मुसलमानांनां नामशेष राहिलेलीं कारणें वैमनस्यें दुणावण्यास चां- गला आश्रय देतात. या खेरीज जे राज्य- कर्ते आंग्लो–इंडियन हिंदूच्या व मुसलमाना- च्या दुहीनें, फाटाफुटीनें व कलहानें इंग्रजी राज्याचा चिरस्थायीपणा राखूं इच्छितात त्या शहाण्याच्या कांद्यांस स्मृतिविषय तेपत पोंचलेल्या कारणांचें पुनर्जीवन करणें अत्या- नंदाचें वाटत असतें.

हीं कारणें किती व कोणतीं आहेत हें सांगणें कठीण आहे तरी त्यांचीं कार्यें आप- णाजवळ उपलब्ध आहेत त्यांचा शोधक री- तीनें विचार केला ह्मणजे त्यांचा बीमोड क- रण्याचे उपाय दर्शवितां येतील. प्रभासपट्टण व मुंबई येथें जे भयंकर दंगे झाले व शेंकडों खून पडले त्यांची हकीकत सर्वांस कळून चुकलीच आहे. कांहीं राष्टकल्याणाच्या

गोष्टी रक्तपात झाल्या शिवाय होत नाहींत. असें ह्मणतात त्याचा अर्थ इतकाच कीं जें, दुष्ट व घातुक कारणें आपलीं कार्यें यदृच्छेया करीत असतात त्यांची महती भयंकर परिणाम व राज्यक्रांत्या रक्त पातांनें डोळ्यांत अंजन घातल्या प्रमाणें घटकन करून घेतात. प्रभासपट्टण व मुंबई येथील रक्तपातानें हीं कारणें समूळ विध्वंस घालविण्याचे उपाय सुचले तर आह्मी ह्मणतो कीं आमचा राष्ट्रीयपणा बळावेल व आपल्या देशावर सौख्याचा दिवस उगवेल.

---

प्रभासपट्टण व मुंबई येथील दंग्यापासून सर्वत्र लोकांनीं जागृत व्हावें आणि हिंदु मुसलमानांतील तंट्याचीं कारणें सरकाराकडून तिऱ्हाईत या नात्यानें नाहींशीं करवावींत, असें आह्मांस वाटतें. हिंदू लोकांनीं आपल्या अडचणी, व्यत्यय, व हरकती मुसलमान संबंधानें असतील तेवढ्या सरकारास विदित कराव्या आणि मुसलमानांनीं आपल्या तक्रारी, आग्रह, व हक्क असतील ते जाहीर सभा भरवून सरकारास कळवावे. उभयता मधील निस्पृह, विद्वान, व थोर कुळांतील हिंदु व मुसलमान जमवून सरकारनें उभयपक्षाकडील लोकांच्या सल्यानें व एक विचारानें हिंदुमुसलमानांच्या तंट्यांत पडलेले हक्क कुळाचार व वहिवाटी या नियमित कराव्या. नुकत्याच झालेल्या रक्तपातानें हाच उपाय सर्व राष्ट्रास व सरकारास ध्वनित केला आहे आणि तो ज्या रितीनें अमलांत येईल त्या मानानें आपले देशाचें पुढे कल्याण होणार आहे,

आमच्या प्रांतांतील लोकांपेक्षां मुंबई पुण्याकडील लोक प्रत्यक्ष दंग्यांत सांपडल्या मुळें अधीक चळवळ करितील, असें आह्मी समजून होतो त्या प्रमाणें हल्लीं हिंदू व मुसलमान हे दंगा मिटल्या नंतर परस्पर मित्र भावानें पूर्ववत वागूं लागले असें सर्व मुंबई शहरभर जाहीर करण्यासाठी हिंदुमुसलमानांच्या मोठ्या शार्गस्ती व मिरवणुकी काढण्यांत आल्या. हिंदु मुसलमान आनंदानें परस्परांच्या हातांत हात घालून आपला ऐक्यभाव मुकेपणानेंच सांगत आहेत हें सर्वत्र शांतता व स्वस्थता झाल्याचें द्योतक होय. पण यापासून पुढें दंगा होणार नाहीं असें मात्र ह्मणवत नाहीं. दंग्याचीं कारणें गेल्याशिवाय दंग्याची भिति नाहींशी होणें नाहीं. जो किल्ला पायापासून सुटला आहे त्याची वरचेवर दागदुजी केल्यानें ढासळत चाललेली तटबंदी कितपत संरक्षण करील हें कोणासही उघड दिसेल. हिंदूनीं व मुसलमानांनीं आपापलीं भांडणें सरकारापाशीं निरनिराळीं नेलींच पाहिजेत, ह्मणजे खरी गोष्ट बाहेर निघेल आणि कांहींतरी एक निकराचा निकाल होईल. दंग्याचीं कारणें झांकून ठेऊन सलोखा होणें नाहीं आणि कदाचित् नमस्कार पुरता एवढ्यासाठींच एकोपा झाला तर अंतस्थ पेटत असलेला जाळ निखारा कोठें व केव्हां पेट घेईल याचा नेम नसतो. तेव्हां अशा नाजुक प्रकरणांत सरकार नें मध्यस्थ त्यांच्यापाशीं पृथकपृथक हिंदूनीं व मुसलमानांनीं आपल्यांतील लढा पडण्याचीं कारणें सांगावींत आणि आपसांतील वैमनस्याचा बीमोड करावा हा उत्तम राजमार्ग होय.

हा कायदेशीर पंथ पुणेकरानीं ऐन आणीबाणीच्या वेळीं व वाटेंतील काटेरी गोखरूं झुडपें यांस न जुमानतां निर्भयपणें स्वीकारला हें पाहून आह्मांस आनंद वाटतो. रावबहादुर रानडे यांनीं आपल्या कांहीं अनुयायांच्या समवेत लेखनद्वारा व अंतस्थ कारस्थानद्वारा वरील राजमार्गांत अटकाव केला व. हिंदु लोकांनीं आपल्याच पुरतीं जाहिरसभा भरवूं. नये अशा खटपटी केल्या ही त्यांच्या दीर्घदर्शीत्वाची खूण असेल. अशा चळवळीच्या प्रसंगीं पुण्याच्या लोकांनीं त्यांचें ऐकिलें नाहीं हें चांगलें झालें असें आह्मी समजतों. आपल्या विचाराच्या एकांत खोलींतून गोळी मारणाऱ्या तत्वज्ञान्याचा भेकड सल्ला संकट समयीं लोकांस फायद्याचा नसतो. मुंबईस आरंभीं मुसलमानांनीं हिंदु लोकांच्या बायका नागविल्या, पोरेंबाळें ठार मारलीं आणि अनान्वित कृत्यें केलीं तेव्हां गिरणीवाले लोक आपणच कायदा कसा हातांत घ्यावा असा विचार करून स्वस्थ बसले असते व मनुष्य स्वभावाच्या स्वाभिमानाला व आपल्या वीर्याला विसरले असते तर सर्व देशांतील हिंदु लोकांच्या मर्दपणावर किती काळिमा आला असता बरें! रागाच्या व द्वेषाच्या भरांत आपल्या पत्नीशी व्यभिचार करणाऱ्या जारास ठार मारणाऱ्यास कायद्यानें शिक्षा सांगितली आहे तरी त्या हनन क्रियेंत नरस्वभावांतला जो अत्युत्तम गुण प्रगट होत आहे तो वाईट आहे असें कोण ह्मणेल! राज्यक्रांती करणारा नेपोलियन बोनापार्ट नृपसिंहासनावर बसला पण तीच राज्यक्रांती फसली असती तर तो सूळावर गेला असता. तेव्हां युक्तिवादानें व कायद्याच्या कोटीनें ज्या गोष्टी वाईट ठरतात त्या केव्हां व कोणी पतकराव्या हें ज्या त्या स्वभावसिद्ध व मनुष्य शिकतो. त्या प्रमाणें मुंबईच्या दंग्यानें पोळलेल्या पुणेकरांनीं हिंदूंचीच सभा भरवून असें ठरविलें कीं:—

“सरकारी कामगारांनीं कोणत्या धोरणानें नेहमीं वर्तन करावें याबद्दल कोणत्याही तऱ्हेचे स्पष्ट हुकूम नसल्यामुळें व धार्मिक आणि सामाजिक बाबतींत कोणाकोणाचे कसे कसे हक्क पूर्वापार चालत आले आहेत याचा कोठेंही स्पष्ट दाखला नसल्यामुळें अगर सन १८५८ सालच्या राणी सरकारच्या जाहिरनाम्याप्रमाणें सर्व प्रजेस सारखा व निष्पक्षपातीपणाचा न्याय मिळेल ह्मणून जें आश्वासन दिलें आहे, त्याचा जातीजातींत तंटे होण्यासारखा चुकीचा अर्थ करण्यांत येत असल्यामुळें—होतात असें या सभेस वाटतें, आणि अशा तऱ्हेचे तंटेबखेडे न होतां सरकारास या सभेची अशी प्रार्थना आहे कीं, त्यानीं आज कित्येक शतकें बंधुप्रेमानें एकत्र रहात आलेल्या दोन ज्ञातींत इतउत्तर तंटे झाल्यास ते आपआपसांत सलोख्यानें मिटविण्याची कांहीं तरी व्यवस्था करण्याकरितां असल्या दंग्यांच्या कारणांची स्वतंत्र चौकशी करण्याची मेहेरबानी करावी.”

या ठरावांत कांहींच बेकायदाचें व गैरसमजूतदारीचें नाहीं. असला हितावह ठराव करणाऱ्या सभेबद्दल जे लोक कुतर्क पसरवितात त्यांस हितशत्रू ह्मणू नये तर त्याहून सौम्य संज्ञा काय द्यावी हें आह्मास समजत नाहीं. आमचे बंधु वैदर्भ कर्ते यांनींही पुण्याच्या हिंदूच्या सभेवर व मुख्यत्वें करून राजश्री टिळक व नामजोशी यांजवर आपल्या गालिदानाचे प्रयोग केले आहेत हें पाहून जरी त्यांस नाहीं तरी आह्मास एकव्यवहारवात्सल्यामुळें खेद वाटतो. पुण्याकडील इतिवृत्ता विषयीं वैदर्भ कर्ते आपल्यास वाचनकलेनें सर्वज्ञ करितात आणि पुण्याच्या रावबहादूरांशी व टिळक नामजोश्यांशीं आपला एवढा निकट संबंध ठेवितात हें त्यांच्या जगन्मित्रत्वाचें लक्षण होय. राजश्री टिळक व नामजोशी यांनीं वैदर्भकारांचें मित्रत्व व कटू उपदेश हीं कितपत ग्रहण करावीं हें त्यांस कळविण्या जोगा त्यांस जात्या अगर बाह्य कारणोपलब्ध पेंच नाहीं असें आम्ही मानीत नाहीं. मात्र आह्मास एवढेंच लिहिणें जरूर वाटतें कीं ता० १० रोजीं पुण्यास भरलेल्या हिंदु लोकांच्या जाहिरसभेनें केलेले ठराव सर्वमान्य असून सरकारास बोधपर आहेत इतकेंच नाहीं तर त्यास एका प्रकारचा एका पक्षा कडील हा इषारा आहे.

---

## फारच तारीफ करण्या जोग्या नेमणुका.

आह्मी गेल्या अंकीं मि. वामन रघुनाथ जोशी यांच्या नेमणुकी संबंधानें लिहिलेंच आहे. त्यांच्या येथील ट्रेनिंग कालिजच्या प्रिन्सिपालच्या रिकामे जागेवर मि. बळवंत विष्णु वैद्य यांस नेमिलें असून त्यांच्या फर्स्ट आसिस्टंटच्या जागेवर शेगांवच्या हेडमास्तरांस सारखेच पगारावर नेमिलें. ट्रेनिंग कालेज ह्मणजे दोन हायस्कुलांप्रमाणेंच मराठी भाषेच्या संबंधानें या प्रांतांतील फार मोठें विद्यालय आहे. याबद्दल मेहेरबान रा. ब. जटार यांस फारच अभिमान असावा अशी आमची त्यांच्या नेहेमीच्या भाषणांवरून व लेखावरून पूर्ण खात्री आहे. त्याची स्थिती सुधारण्यास योग्य लोकांचीच नेमणूक होणें रास्त होतें आह्मास असें वाटलें होतें कीं या जागेवर तरी एखादा ग्राज्वेट नेमण्यांत येईल. हल्लीं ट्रेनिंग कालेज मधून निदान अगदीं अलीकडे मि० निळकंठराव भट बदलल्यापासून तरी एकही तारीफ करण्या जोगा अगर सुविचारानें किंवा बऱ्याच माहितीनें संस्कार असा नांव घेण्या सारखा विद्यार्थी बाहेर पडला नाहीं. उघडच आहे; पाणी मूळ खजिन्यापेक्षां जास्त चढतच नाहीं. सृष्टींतील नियम जसे कडक आहेत तद्वत् ज्ञानप्राप्ति करून घेणाऱ्या व देणाऱ्या विद्यार्थ्यां संबंधानेंही नियम आहेत. एकंदर व्यवहारिक कामाकरतां तयार होणाऱ्या मंडळीस चांगले विद्वान व सुशिक्षित शिक्षक उपलब्ध असतां नेताबाताचेच शिक्षक नेमणें ह्मणजे एखाद्या व्यक्तीकरितां लष्कराच्या कामिसारिअटचीच उपासमार करण्या सारखें आहे. कॉन्ट्राक्टर लोकांची पोळी पिकेल परंतु सैन्य उपाशी मरून देशरक्षण होणें कठीण आहे. मि. वैद्य हे या जबाबदारीच्या जागेस हक्कदार आहेत किंवा नाहींत हा आमच्या वादाचा विषय मुळींच नसून ज्या कोणास आपल्या हक्कांचें दुर्लक्ष झालें असें साहजीकच वाटत असेल त्यांनीं खुशाल आपले ठिकाणीं भिऊन चुरमुरे खात बसावें. प्रस्तुत प्रसंगीं आह्मास त्यांचें नुकसान पुढील पिढ्यांचें व होतकरू मातापित्रादि वृद्ध आप्तवर्गांच्या आशातंत्वाचें त्यावर आशिक्षित शिक्षक गेल्यानें जें नुकसान होणारें आहे त्यापुढें कांहींच वाटत नाहीं. जर आह्मास या प्रसंगीं वाईट वाटत असेल तर या होतकरू शिक्षक वर्गाबद्दल व त्याही पेक्षां सहस्रपटीनें त्यांच्या हातून जो बटु शिशुशिष्य वर्ग तयार होणार त्याबद्दल वाटत आहे, हल्लीं ट्रेनिंग कालेज मधून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांपैकीं एकतरी पूर्ण स्वातंत्र्याभिमानी, स्वावलम्बी व शुद्ध नवीन मराठी भाषा लिहिणारा असा आढळेल किंवा नाहीं याचा संशय आहे. पोलीस खात्याच्या चवकशीची, पोलीसनें पकडलेल्या गुन्हेगारांची व त्या खात्याच्या व्यवस्थेची बाह्य टापटीप व या कालेज संबंधाचा मे. डिरेक्टर साहेबांच्या रिपोर्टाचा भपका व त्याच्या परीक्षांची टापटीप हीं जवळ जवळ एकच आहेत. हें आमच्या शोधक व मार्मिक डायरेक्टर साहेब बहादूरांसही उत्तम प्रकारें अवगतच असेल. असें असूनही अशा नेमणूका होत आहेत या बद्दल खेद वाटून वऱ्हाडची स्थिती पुढें तरी सुधारेल किंवा नाहीं याबद्दल आह्मास वारंवार विवंचना पडते. प्राथमिक शिक्षण सर्व शिक्षणाचा पाया—तें देणारे मिळतील तितके तरी चांगले शिक्षक असावेत हा साहजीक विचार मनांत येतो—परंतु सत्तेपुढें शहाणपण नाहीं—वृथाभिमानी मनुष्य वारंवार आपली चूक दुरुस्त करीत नसतो, इतकेंच नव्हे तर त्यास दुसऱ्यानें कितीही निष्कपटपणानें, उदार बुद्धीनें, कळकळीनें व प्रेम व आदर बुद्धीनें चूक दाखविली असतां विलक्षण द्वेष येतो व दुसऱ्यांवर सूड उगवण्यासाठींच ह्मणून तो तीच गोष्ट वारंवार करीत सुटतो. तशी गोष्ट आमच्या शिक्षणभारधुरंधराची नाहीं ह्मणून निदान आमच्या लेखाची कळकळ तरी मनांत आणून ते या गोष्टीचा जरूर विचार करतील. इतर प्रत्येक सज्जन मनुष्याप्रमाणें आमची त्यांचे ठायीं विलक्षण पूज्य बुद्धी असून आह्मास त्यांचें कौतुकही वाटतें. परंतु असा कोणता थोर गृहस्थ आहे कीं प्रसंग विशेषी व व्यक्तिविशेषी तो कधीं कधीं स्खलन पावत नाहीं! अशा वेळीं निष्प्रांजलपणें जें योग्य दिसेल तें न लिहिणें ह्मणजे आमची कामगिरी आह्मी बजावली असें होणार नाहीं. आमचें ह्मणणें योग्य असल्यास राव बहादूर तिकडे लक्ष पुरवल्या वाचून रहाणार नाहींत अशी आमची व त्यांच्यापाशीं परोक्ष अगर अपरोक्ष संबंध असणाऱ्या प्रत्येकाची निःसंशय खात्री आहे ह्मणूनच आम्हीही जें योग्य दिसेल तें लिहित असतो—तसेंच ज्यांस ट्रेनिंग कालेजादि संस्थाचें महत्व समजण्या इतका संस्कारच झालेला नाहीं असे आमचे अव्यवसायबंधु स्वस्थ बसतां आह्मीच विनाकारण गडबड करीत असतो हा आमचेवर कोणी दोषारोप केल्यास तो दोष मुंबई युनिव्हर्सिटीचा असून आमचा नाहीं. तो आमच्या ज्ञानप्रीतीचा आहे. व तो आम्हास जी ब-

ऱ्हाड प्रांतांच्या उत्कर्षाची उत्कट इच्छा आहे ती समजून सर्व लोक आह्मास दोषमुक्त करितील.

शवटीं इतकेंच लिहिणें आहे कीं या नेमणुकीच्या योगानें एका व्यक्ती करितां जरी पुष्कळांच्या हक्कांची पायमल्ली झाली आहे तरी त्यांत विशेष नाहीं. हें खरें आहे कीं शिक्षाखात्यांत अलीकडे बरेच विद्वान, होतकरू व निर्मळ आचरणाचे लोक येऊं लागले आहेत अशांचा जरा जास्त न्यायदृष्टी अमलदार आल्यावर वाव येईलच. परंतु हल्लींच्या रामराज्यांत न्याया पेक्षां भूतदया अधीक असल्यामुळें परोपकार करण्याची संधि वाया न जाऊं देणें हें रितीचें आहे. सबब त्यांत फारसें आश्चर्य नाहीं परंतु खेदाची गोष्ट एवढीच कीं अशा रितीनें खात्यांत नाखुषी, सुस्ती, ढिलेपणा, परावलम्बन इत्यादि गोष्टी आपोआप नैसर्गिकपणें सार्वत्रिक होण्याचा रंग दिसत आहे. या भयंकर परिणामाचा दोष कोणाकडे?

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER, 25, 1893

## THE GOVERNMENT OF THE TONGUE

It is proverbial to say that pen is mightier than the sword but the tongue is still mightier than either of the two. There are sometimes mysterious causes at work that remind us of our duty as a public functionary to lecture in the common and every-day philosophy of 'the Government of the tongue.' A king Frog will make a handsome man if he but governs the tongue. The theme we have chosen today never wears out its significance and it gains a surer welcome with every new repetition. It is one of the few golden rules that ought to be proclaimed from the house-top. The world will at least be tenfold wiser if people learn the simple lesson 'bridle the tongue'.

The faculty of speech is a boon to mankind. It enables us to convey our thoughts. Such a vehicle of thoughts ever pioneers the onward march of learning and knowledge. Besides this primary use it serves a secondary but valuable purpose. In the latter form speech goes by the house-hold word 'conversation'. It administers to our joys and creates a fellow-feeling which enlivens our joys and lightens our sorrows because they are shared in common with others.

But like every other faculty it has its abuses as well. It is a powerful engine of mischief, injury and injustice. A licensious tongue is like a sword in the hand of a mad man. But the faults and follies of an unbridled tongue with its alarming habits which ripen, and mould a man's abusive powers are never so sorely felt as when they have a full signal measure of them in a man whom fortune and the whirls of life place over the destinies of his fellow-beings. We can best illustrate our argument by in—stancing in the soild good that has arisen from the right use of the tongue. These examples will negatively point out in contrast the blessings which humanity has received from the the faculty of speech. The patriotic and stirring eloquence of the Grecian statesmen Pericles and Demosthenes have built nations and diffused the light of knowledge and civilization over the rest of the world. The orations of Cicero have moulded the national life of the Roman public. Every modern student is familiar with the first-class oratory of Gladstone—his words have paved the way to the Irish Home rule. If we live in India for something we at least expect each and all of our readers to know the victory won by Babu Surrandranath Baunerjie who electrified with his masterly orations the stronghold of the obstinate English people. The move and upheaval in the national life are due to the grand effects of the advices from the lips of the speakers of the highest water—mark in the Congress—halls. We can multiply such instances by hundreds and thousands. Such exceptional gifts are denied to many and we need therefore restrict our remarks in connection with the government of the tongue. The average men of right-mindedness either inherit or acquire the proper style to use their tongues. But it is the unnumbered many of this class of ordinary ability and understanding, that want to learn this lesson most. Where men fight at their arm's length and owe to each other no sort of subordination and special unequality the tongue is checked under a penalty by the restraints of social and legal influences. Such men receive at every pit-fall their meet reward for what they speak and learn with bitter reality the good uses of the tongue.

But in the complexity of human affairs men stand to each other in different relations both inferior and superior. The correlative position of each sets him down before some and elevates him to the rank of a despot over others. That high tone of morality which teaches to respect others consistently with one's own self-diginity is, in the market of human dealings, at high discount. Moral courage which is another voice of duty and conscience is almost at nill. The survival of the fitest holds good in the long run but those turbulent spirits that fish in troubled waters disturb the equanimity of men's mind and lay down the rule—let men be time-servers. These dregs in a society but they awefully form an overwhelming majority—can please and displease every body. Honesty and truthfulness are words for cowards. They pass for nothing with such time-servers. They are like an ass in the lion's skin. They pretend to such morality as to make a successful appearance of it. But where does the evil lie? It lies in the wild use of the tongue. If one big man talks sense and nonsense in the same breath those who ought to humour him, interpret everything as sense. We are familiar with many so-called gentlemen whom the iniquities of fate place over their fellow-men. They are more brutal than human in their behaviour towards others. Action either good or ill takes its initiative in the words the actor utters. The words i. e. voices which a tongue articulates form a mint where actions are coined. Suppose a high officer accosts a gentleman with rough questions and dismisses him at once with some such form of etiquette as the following:—

**"YOU DAM RASCAL**

**मादरचोद चले जाव ह्यासें**

(adulterous with mother, Walk off hence).

What shall we as men expect of such a monster of mankind? If the highest magistrate pelts stones at a witness or humbugs him with corporeal punishment what truths shall we exepect him to elicit and what judgment from the pen of his Majesty—The improper use of the tongue and the consequent absence of reason and right action have led many in a run of folly and mischief and have rendered them incapable of serving mankind and aug—menting the glory of God.

If those who have some position and and dignity in life defy every good point in the government of the tongue it is no wonder that their preaching and example circulate, in free use, perjury, false faith, and total ruin of self—respect. If education exists for any good it ought to teach men to observe the obvious occasions of silence. This lesson we have a strong mind to infuse and we shall recommend the deserving students to learn it with our esteemed Director Rao Bahadur Jathar B. A. who knows best how to *educate* the faculty of speech.

## वऱ्हाड.

हवामान — एक आठवडाभर पाऊस नसल्यामुळें हवा स्वच्छ व निरोगी झाली आहे. आजपर्यंत १९ इंच पाऊस पडला आतां हस्त नक्षत्राचे कांहीं पाऊस चांगले पडले ह्मणजे यंदा रब्बीचीं पिकें उत्तम येतील.

पोलीस आक्टाचें ३४ वे कलमाचा अनर्थ—येथील वकील रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांच्या गाडीवाल्यानें गाडीखान्याचा रस्ता श्रीगणपतीच्या वाहनानें अडला असल्या मुळें घराला लागूनच रस्त्याच्या बाजूस गाडी सोडली. ही गोष्ट शुक्रवारीं सायंकाळीं घडली. पुढें रात्रौ अकरा वाजल्यावर त्या रस्या वरील वाहनें निघून सामसूम झाल्या नंतर एका पोलीस कानस्टेबलानें ३४ वे कलमा खालीं राजश्री व्यंकटराव यांस कैद करून पोलिस स्टेशनमध्यें नेऊन जातमुचलक्यावर मोकळें केलें. दुसरे दिवशीं फिर्यादीची चौकशी होऊन फिर्याद माजिस्ट्रेटांनीं काढून टाकिली. कोणत्या क्षुद्र, खण्याखोल्या व गैरकायद्याच्या कारवाईनें पोलिस आफिसर कोणाची अब्रू घेईल याचा नेम नाहीं. लोकांनीं सावध व हुषार राहावें!

कानस्टेबलची बेकायदा दांडगाई — एक पोलीस शिपाई मुनसिपालिटीच्या हद्दींतील कांहीं झाडांची खाडतोड करितांना त्या वेटाळांतील मुनसिपल शिपायास आढळला तेव्हां मनाई करणाऱ्या मुनसिपल शिपायावर कानस्टेबलानें यथेच्छ तोंडसुख व हस्तसुख घेऊन त्यास हातकड्या घालवून उलटी आपणच कोर्टांत बोंब केली. माजिस्ट्रेटांस पोलीसचा पुरावा खोटा वाटून खरा मुनसिपल शिपाई दोषमुक्त झाला. पोलीसांस अन्याय करण्याचा परवाना नोकरीवर चढते वेळीं सरकारच देतात कीं काय!

रा. रा विठ्ठल नारायण काळीकर तहशीलदार मेहकर यांस दुसरे वर्ग माजिस्ट्रेटीचा अधिकार देण्यांत आला.

क्याप्टन आर. पी. कोलंब यांचे कोर्टास असिस्टंट कमिशनर वर्ग २ चे अधिकार दिले.

लेफटेनंट हार्सब्रव असिस्टंट कमिशनर यांस माजिस्ट्रेट वर्ग १ करण्यांत आलें.

वऱ्हाड प्रांतांत नव्यानें पोलीस स्टेशनें मुक्रर केलीं त्या अन्वयें ७७ पहिल्या वर्गाचीं व ५३ दुसऱ्या वर्गाचीं मिळून १३० एकंदर पोलीस ठाणीं केलीं.

आम्हास लिहिण्यास दुःख वाटतें कीं राव साहेब फकीरचंद असिस्टंट इंजिनिअर वऱ्हाड हे रजेवर स्वदेशी जात असतांना मिरत मुक्कामीं मरण पावले.

दुसरी एक दुःखाची वार्ता अशी कीं रा. रा. बापूजी यादव देवीखात्या कडील सुपरिनटेंडंट हे उमरावतीस गेल्या आठवड्यांत निवर्तले.

आकोला जिल्ह्यांतील तहशीलदारांची सभा डेपुटी कमिशनर यांच्या अध्यक्षेत खालीं जमून जागले शिपाई पोलीस खात्याच्या ताब्यांत द्यावे किंवा देऊं नये या प्रश्नाची वाटाघाट झाली.

येथील ट्रेनिंग कालेजचे फर्स्ट असिस्टंटच्या स्थळीं शेगांवचे हेडमास्तर रा. रा. शिवराम रघुनाथराव कुळकर्णी उर्फ गुरुजी यांस बदलून हायस्कूलांतील असि. मास्तर रा. रा. जनार्दन केशव नगरकर यांस शेगांवास धाडलें आणि हायस्कूलांतील जागेवर नाशी काहून एक ग्याजुएट रा. रा. आठवले यांस बोलावलें आहे.

मलकापूरचे फर्स्ट असिस्टंट मास्तर रा. रा. बळवंत श्रीपत ढोले हे रजेवर असल्यामुळें त्यांच्या जागीं आकोटचे असि. मास्तर रा. रा. गणेश बाबाजी एकबोटे बी. ए. यांस नेमिलें.

### नोटीस.

रा. बालाप्रसाद रामदत्त परदेशी ब्राह्मण रहणार खेकडी ता॰ अकोला जि. मजकूर यांसः—

नोटीस देणार नारायण शामराव जोगी राहणार पातुर्डा ता॰ जळगांव याज कडून—या नोटीशीनें कळविलें जातें कीं, तुह्मी तारीख ११—९—९३ इसवीची नोटीस दिली ती पावली.

तुमचे वडील नामे रामदत्त बिसनदत्त यांनीं आह्माला दोनशे २०० रुपयाचें गहाणखत करून दिलें होतें त्या गहाणखतावरून तुमच्याकडे काय बाकी निघते त्याचा पंचा समक्ष हिशेब करून तुमच्याकडे आमची किती बाकी निघतें हें काढलें तुमच्या कडे निघणाऱ्या बाकींत तुमच्या विनंती वरून सूट आणि बाकी, बाकी राहिलेल्या ३२५ रुपया बदल तुह्मी आपल्या राजीखुषीनें नवीन गहाणखत करून दिलें. व तुमच्या वडिलांनीं पूर्वीं करून दिलेले असल गहाणखत व त्यांनीं दिलेल्या पावत्या मज पासून परत नेल्या व तुह्मी नवीन करून दिलेले गहाणखत रजिष्टर करून आमचे हवाली केलें असें असतां तह्मी लिहितां कीं, हा ३२५ रुपयाचा दस्तऐवज तह्माला थापा देऊन घेतला आहे व तो तुह्माला कबूल नाहीं या करितां तुह्माला इतकेंच कळवितों कीं, हें तुमचें ह्मणणें लबाडीचें आहे आणि या नोटीशीनें आणखी असें कळविण्यांत येतें कीं, सदरहू ३२५ रुपयाच्या गहाणखताच्या शर्ती प्रमाणें तुह्मी रुपयाची आदाई करावी. न केल्यास आह्मी कायद्या प्रमाणें तजवीज करूं. आमची कांहीं नुकसानी झाल्यास भरून घेऊं. कळावें तारीख १९-९-९३ इ०

( सही )

नारायण शामराव जोगी

दस्तुर खुद.

## वर्तमानसार.

हल्लींची हिंदुस्थानची स्थिती अशी कांहीं चमत्कारीक झाली आहे कीं, आमच्या शेजाऱ्याच्या घरांत काय होतें हें आह्मास कळण्यापूर्वीं ती बातमी विलायतेस जाते व मग तिकडून आह्मास कळत्ये. हा असा प्रकार होण्यांत आमचा कांहीं दोषही नाहीं. निझामच्या दरबारचे इंग्रजी रेसिडन्ट मि० प्लौडन यांस थोड्या दिवसांपूर्वीं कोणी विषप्रयोग करण्याचा यत्न केला होता असें गेल्या २१ व्या तारखेस विलायतच्या पार्लमेन्टसभेंत त्या संबंधाचा एक प्रश्न झाल्यावरून समजतें. त्या प्रश्नास सरकारी अधिकाऱ्याकडून जो जबाब देण्यांत आला त्यावरून समजतें कीं, हैदराबादच्या एका मुसलमानानें तसा विषप्रयोग करण्याचा यत्न केला होता असें बाहेर आल्यावरून निझामच्या दोघां न्यायाधिशांनीं त्या प्रकरणाचा इनसाफही केला व त्याबद्दल आतां जास्त चवकशी करण्याचें कारणही नाहीं. या प्रकरणाची अशा रीतीनें निकाल झाला हें चांगलें झालें, पण यावरून निझामाची स्थिती मल्हाररावासारखी करण्याचा कोणाचा इरादा होता कीं काय हें समजत नाहीं.

पोष्टखात्यांत जी काटकसर चालली आहे त्याच्या योगानें लोकांचे पगार वगैरे तर कमी झालेच, पण त्याशिवाय कशा अडचणी झाल्या आहेत हें दाखविण्याकरतां एकानें ही पुढील गोष्ट केली आहे. तो सांगतो मी एके दिवशीं एका खेड्यांतल्या पोष्टआफिसांत गेलों, पण पोष्टमास्तर आफिसांत नव्हता. तपास करतां शेजारच्या एका झाडाखालीं बसला आहे असें समजलें. मी त्याच्याकडे गेलों व तेथें काय करतां असें विचारलें. पोष्टमास्तर ह्मणाला आमच्या खात्यांत जी काटकसर चालली आहे. त्यामुळें पाकिटें चिकटविण्यास गोंद मिळत नाहीं व त्याकरतां या बाभळीच्या चिकानें मी तें चिकटवीत आहे व दररोज कित्येक वेळ या झाडाची प्रार्थना करण्यास यावें लागतें

मुखत्यार वकिलांची रीत बंद करणें अवश्य आहे, मुखत्यार वकिलांच्या योगानें फार त्रास व नुकसान होतें वगैरे ओरड चालली आहे. साहेब लोक बहुधा मुखत्यारांस घेत नसून मामलेदार व अवलकारकून हे त्यांस घेतात व त्यांच्यापुढें सनदी वकील आले ह्मणजे ते कायद्याच्या तत्वास धरून बसतात आणि मुखत्यार असले कीं, त्यांची पाहिजे तशी स्तुती करून त्यांस घोड्यावर बसवितात व त्यामुळें ते त्या मुखत्यारांस घेतात अशीही कित्येकांची ओरड आहे.

रंगून येथें उपयोगांत आणण्याकरतां तयार केलेली एक फार मोठी तोफ येत्या महिन्यांत मुंबईस यावयाची आहे.

इंग्रज वकील मंडळ काबुलांत जाण्याचा चमनपासून कंदाहारपर्यंत रेल्वे करण्याची अमिराजवळ परवानगी मागावी, हा एक हेतु आहे असें सांगतात. हा फाटा ६०।६५ मैल लांबीचा असून त्याकरतां लागणाऱ्या सर्व सामानसुमानाची अगदीं तयारी आहे व तीन महिन्यांत काम पुरें करण्याची व्यवस्था आहे असें सांगतात.

काबुलास जाणारें इंग्रज वकील मंडळ शुक्रवारीं चालूं झालें. अमिराचें पत्र बुधवारीं दाखल झालें. या वकील मंडळाबरोबर फौज फाटा जरी थोडा आहे तरी सामान सुमान नेण्याकरतां उंटें खेचरें मिळून ४१५ जनावरें लागलीं आहेत. २८ अक्टोबरच्या सुमारास हें मंडळ काबुलाहून परत यावयाचें आहे.

मिमेनासिंगचा डिस्ट्रिक्ट मजिस्ट्रेट मि. फिलीप याणें तेथील नेटीव राजास फार वाईट रीतीनें वागविलें, अन्यायानें त्याच्यावर खटला केला, साधारण कैद्याप्रमाणें त्यास उभा केलें, वगैरे प्रकार झाल्याचें प्रसिद्ध असून आतां समजतें कीं, त्या राजानें त्या फिलिपवर त्या अन्यायाच्या वर्तनाच्या नुकसानीबद्दल कोडतांत फिलिप याच्यावर ६०,००० रुपयांचा दावा लावला होता पण फिलिप याणें माफी मागितल्यावरून राजानें दावा काढून घेतला. हें चांगलें झालें, पण असल्या अन्यायी वर्तन करणारास कांहीं पैशाचा चट्टा लागला असता तर त्याहूनही चांगलें झालें असतें. ठा. अ.

खिलातच्या खानास नेमणूक— खिलातच्या पदच्युत खानानें लोरालई ह्या ठिकाणीं रहावें, आणि त्यास दरमहा १००० रुपये व त्याच्या अझिमजान नांवाच्या मुलास ३०० रुपये, नेमणूक द्यावी असें हिंदुस्थान सरकारानें ठरविलें आहे.

प्रचंड कुटुंब — सयामच्या राजाच्या कुटुंबा एवढें प्रचंड कुटुंब पृथ्वीवर कोठेंही नाहीं. ह्या राजाच्या दोन पट्टराण्या, आणि दुसऱ्या ८८ मिळून ९० बायका, भाऊ आणि बहिणी मिळून ५०, चुलते आणि चुलत भाऊ मिळून २२६, आणि ७२ मुलें आहेत. मिळून ह्या राजाच्या एका कुटुंबांत जेवणारीं ४३८ मनुष्यें आहेत. सकाळ संध्याकाळ ह्या बृहत् कुटुंबाचा स्वयंपाक करण्यासाठीं २०० स्वयंपाके आहेत.

सुगंधाचा उपयोग — सुगंधी पदार्थ गरम आणि कोंडलेल्या हवेस थंड करून सांधीच्या रोगांस ही बंद करितात असें आलीकडील शास्त्रीय शोधावरून समजलें आहे ह्यावरून उष्ण व समशीतोष्ण प्रदेशांतील वरच्या प्रतीचे लोक सुगंधी पदार्थांचा उपयोग करितात, तो अशाच फायद्या साठीं करितात, व तो फायदा आमच्या प्राचीन पूर्वजांनीं शोध करून ठरविला आहे असें दिसतें. शु. मू.

हैदराबादचे रेसिडेंट मि. प्लौडन यांस ठार मारण्याचा व डायनामाईटनें रेसिडेन्सी उडविण्याचा बेत केल्याबद्दल पुढारी ह्मणून जवाद हुसेन नांवच्या इसमास पकडलें असून याबद्दलची चौकशी निजाम हायकोर्टाच्या २ जज्जांकडून होणार आहे.

मि. माणिकशा कासवजी बामजी, एल. सी. ई., बी. एस. सी. यांस अमेरिकेंतील हारवर्ड युनिवर्सिटीमध्यें केमिस्ट्रीचे असिटीचर नेमिलें.

दिल्ली म्युनिसिपालिटीनें विषारी जानवरें धरण्याच्या कामावर एक मुसलमान ठेवला आहे. त्याच्यापाजवळ निरनिराळ्या तऱ्हेचे अनेक नाग व विषारी प्राणी आहेत. त्या सर्वांचे विषाचे दांत कायम आहेत. सापाच्या पुढें एका हातानें एक चिंधी तो फडकावतो व दुसऱ्या हातानें त्याला थापट मारतो. असा खेळत खेळत एकदम त्याची मान धरून तोंड उघडून त्या नागाच्या तोंडांतील विषारी सुळे तो दाखवितो. त्याच्या अंगावर पुष्कळ ठिकाणीं नागें चावल्याच्या जखमा आहेत. त्याचें विष न बाधण्याची त्याजजवळ औषधी आहे. नाग अगर असलें विषारी जनावर कसें धरावें व तें चावल्यास बरें कसें व्हावें ही विद्या ज्याला पाहिजे असेल त्याला शिकविण्यास तो तयार आहे.

चिकागो प्रदर्शनांत एक अतिशय जलद बोलणारे गृहस्थ आले आहेत. त्यांचें नांव हर पोलाक. त्यांनीं एका २०,००० शद्बांची यादी केली आहे. त्या शद्बांचा मूळीं कांहींच अर्थ होत नाहीं. ही मालिका ते ४० मिनिटांत बडबडतात. हें बोलत असतांना जो कोणी हे शद्ब टिपून घेईल त्याला ते ४०,००० डालरिन्सचें बक्षीस देण्यास तयार आहेत.

सरकारी दवाखान्यांत ज्यास औषध द्यावयाचें असेल त्याणें डाक्टरापुढें समक्ष आलें पाहिजे, एरवी औषध मिळणार नाहीं असा सरजन जनरल साहेबांकडून हुकूम सुटल्याचें समजतें.

अलहाबाद येथील २९ आगष्टच्या तारेवरून समजतें कीं, बुदन (वायव्य प्रांत) येथील मुनसफ मुनशी ज्वालाप्रसाद यांणीं मशीदीविरूद्ध निवाडा दिला ह्मणून मुसलमानांनीं सदर्हू मुनसफाचा भर दिवसा खून केला ! !

कर्ज.— निजाम सरकार हैदराबादच्या सावकारांपाशीं ४० लक्ष रुपये कर्ज मागत आहे. परंतु टांकसाळ बंद झाल्यामुळें आपश्योस रक्कम देतां येत नाहीं व टांकसाळ सुरू झाल्यास पैसे देऊं असें सावकारांनीं सांगितलें आहे.

हिंदुस्थानांत कोळसा सांपडल्यापासून विलायतचा कोळसा इकडे येण्याचा कमी झाला.

राकेलची विहिर केटाजवळ सांपडली आहे व तो खणण्याचा विचार करण्याकीरतां केटा येथील श्रीमंत लोकांनीं चार असामींची मंडळी नेमली आहे. वायव्यप्रांतांतील रेल्वेनें, बाहेरच्या तेलापेक्षां हें स्वस्त पडलें तेव्हां हें विकत घेण्याचें कबूल केलें आहे. हिंदुस्थान ह्मणजे सगळें जग आहे. पण कोणाला? उद्योग करणाराला ! क. त.

साखरेपेक्षां गोड अशा एका वस्तूचें मागें एकदां वर्णन दिलेंच आहे. डल्साईन या नांवाचा आणखी एक पदार्थ हल्लीं डाक्तरलोक साखरेच्या ऐवजीं उपयोगांत आणू लागले आहेत पचास फार उत्तम असून याचे तीस ग्रेन एक पाउंड साखरेपेक्षा अधिक गोड असतात. ज्या रोग्यास साखरे पासून फार उपद्रव होतो, त्यांस डाक्तरलोक हल्लीं डल्साइन देतात व अनुभव असा आहे कीं या पासून वाईट परिणाम मुळींच होत नाहीं.

विनिओ बेटांत एका ठिकाणच्या लोकांस एका रात्रीं फार विलक्षण गर्जना ऐकूं आली ती हूबेहूब वाघासारखी होती यामुळें सर्व लोकांस असें पक्कें वाटलें कीं, आसपास कोठें तरी वाघ आहे. सर्व लोक हवालदील होऊन गेले. कारण त्या बेटातले वाघ फारच भयंकर चोरटे असतात. अर्थातच पुढें सर्व लोकांनीं मिळून शोध चालविला त्या शोधाचा निकाल असा झाला कीं, त्या डुरकण्या फोडणारा वाघ नसून एक बेडूक होता, तो सांपडला. हा बेडूक तरी लहान सहान नव्हता. त्याचा एकंदर घेर साडेचवदा इंच होता.

इंग्रजी भाषेंत २,५०,००० शद्ब आहेत ह्मणजे फ्रेंच, जर्मन, स्पानिश आणि इटालियन या चार भाषांत मिळून जितके शद्ब आहेत त्यांच्यापेक्षां ७०,००० जास्त आहेत.

एका रशियन शास्त्रज्ञानें असा शोध लावला आहे कीं, मनुष्याला जे रोग होतात ते सारे अंगांत कपडे घालण्यामुळें होतात.

फ्रन्सांमध्यें बंदुकीचे चाप ओढण्याला विजेचा उपयोग करितात, त्याच्या योगानें काम जलद व बिनचूक होतें.

जगांतील अतिशय मोठी घंटा 'मॉस्को' शहरीं आहे. तिचा घेर ६८ फूट आहे, उंची २१ फूट आहे आणि वजन ४,४३,७७२ रत्तल आहे.

रिजेंट्स पार्क मधील पशुसंग्रहालयांत एक पोपट ५२ वर्षे पाण्याचा एक थेंबही न पितां जगला होता. क० णु०

लार्ड सभेंत होमरूलबिल नामंजूर झालें!

सर्व युरोपिअन लोकांना चीन देशांतून हांकून लावण्याचा त्यांचा विचार आहे

१९०० सालांत पारिस येथें मोठें जंगी प्रदर्शन व्हावयाचें आहे

रिपोडेजेनेरो येथें पुनः दंगा सुरू झाला आहे व आड. डि. मेलो हें कांहीं लष्करी लोकांनीशीं उठले आहेत.

बंगाल्यांत ३,८२,०१९ नावाडी, १,७७,९११ भंई, व १,०७,५१ छटारेवाले आहेत.

४६ लक्ष रुपये खिलात तिजेरीतून इंग्लिश सरकारानें घेतले होते ते लवकरच परत केले जातील. सु० प०

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल कारितां येण्यासाठीं सरटाफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ मिसल. नंबर ७/९३

वि. सिविलज्यडज्य साहेब बहादूर जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

नांव— जानकीराम

बापाचें नांव — मोरेश्वर

राहणार— माटरगांव ता० खामगांव

जिल्हा— आकोला यांस मयत

मोरेश्वर बापाचें नांव राजाराम राहणार माटरगांव खामगांवतालुके जिल्हा आकोला यांचें कर्ज वसूल कारितां येण्यास ठीं सर्टीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदारनें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचें मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा अपेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता. २८ माहे सप्टेंबर सन १८९३ इ० रोजीं सदर्हू अर्जाचा चौकशी होईल. त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी. ता. १९ माहे सप्टेंबर १८९३ इ.

V. N. Dandeker

शिक्का सिव्हिलजडज

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.